सत्यमेव जयते

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पुणे

३८४/अ, भवानी पेठ, पुणे–४११००२, फोन : ०२०–२६४४३२४६,
ई–मेल आयडी : dietpune@maa.ac.in, वेब साईट : www.dietpune.org

## नवोपक्रम सारांश पुस्तिका

# सृजनवेध

## २०२३-२४



शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पुणे

# सृजनवेध

(नवोपक्रम सारांश पुस्तिका)

२०२३-२४

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पुणे

# सृजनवेध (नवोपक्रम सारांश पुस्तिका) २०२३-२४


**प्रवर्तक**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

**प्रेरणा**

**मा. रनजीत सिंह देओल** (भा.प्र.से.)
अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन

**मा. सुरज मांढरे** (भा.प्र.से.)
आयुक्त (शिक्षण ), महाराष्ट्र शासन

**मा. प्रदीप डांगे** (भा.प्र.से.)
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

**मा. राहूल रेखावार** (भा.प्र.से.)
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

**संपादक व प्रकाशक**

**डॉ. नेहा बेलसरे,** प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे

**सहसंपादक**

**श्रीमती अर्चना विश्वंभर नलावडे,** अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे

**संपादन समिती**

**डॉ. प्राची चौधरी,** सेवासदन अध्यापक विद्यालय, कुमठेकर मार्ग,सदाशिव पेठ, पुणे

**डॉ. प्रतिमा करकरे,** भास्करराव कर्वे अध्यापक विद्यालय,एरंडवणे, पुणे

**श्रीमती शुभांगी कुऱ्हाडे,** अध्यापक महाविद्यालय, अरणेश्वर, पुणे

**संपादन समिती सहकार्य**

**नामदेव शेंडकर,** वरिष्ठ अधिव्याख्याता
**बाळकृष्ण वाटेकर,** वरिष्ठ अधिव्याख्याता
**विकास गरड,** वरिष्ठ अधिव्याख्याता
**डॉ. प्रभाकर क्षीरसागर,** वरिष्ठ अधिव्याख्याता
**श्रीमती सुवर्णा तोरणे,** अधिव्याख्याता
**श्रीमती प्राची पाटील,** अधिव्याख्याता
**श्रीमती वैशाली बच्छाव,** अधिव्याख्याता
**श्रीमती राजश्री तिटकारे,** अधिव्याख्याता

**श्रीमती शिल्पा मेनन,** अधिक्षक
**नामदेव जगताप,** लेखापाल
**भानुदास खेडकर,** कार्यशाळा सहाय्यक
**श्रीमती मंजुषा राउळ,** ग्रंथपाल
**श्रीमती वैशाली गजरमल,** सांख्यिकी सहाय्यक
**श्री. विरेंद्र रावते,** तंत्रज्ञ
**श्री. गणेश देव,** साधनव्यक्ती

**मुद्रक : डीआर एंटरप्रायझेस, प्रति-२००**

सर्व अधिकारी व कर्मचारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पुणे

# संपादकीय



**डॉ. नेहा बेलसरे**
प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व
प्रशिक्षण संस्था, पुणे

आजचे शिक्षण हे अतिशय गतिमान आहे. समाज बदलाचे एक मुख्य कारण म्हणून आपण शिक्षणाकडे बघतो तत्त्वज्ञान समाज आणि ज्ञान यांच्यातील बदलाचे प्रतिबिंब शिक्षणातच दिसून येते. आजच्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी शाळेने शिक्षकाने पारंपारिक चौकट सोडून बदलत्या काळानुसार स्वतःला आधुनिक करून घेणे गरजेचे आहे. यामध्ये अध्ययन अध्यापन ज्ञानरचनावादी दृष्टिकोन कृतीयुक्त अध्ययन अध्यापन पद्धती नाविन्यपूर्ण अध्यापन इत्यादी पद्धती वापरल्या पाहिजेत.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यामार्फत राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२३ - २४ आयोजित करण्यात आली. यामध्ये राज्यातील सर्व उपक्रमशील शिक्षक व अधिकारी हे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सतत प्रयत्नशील आहेत. याचबरोबर राज्यातील उपक्रमशील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या अध्ययनात खंड पडू नये यासाठी नवनवीन उपक्रम तसेच कल्पनांचा विचार करीत आहेत. तसेच प्रत्येक मूल प्रगत होण्यासाठी शिक्षक व अधिकारी प्रयत्न करीत आहेत. त्यांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती राज्यातील शिक्षण क्षेत्रातील सर्वच स्तरावरील शिक्षक व अधिकारी यांच्या उपक्रमशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी सदर स्पर्धा एकूण ५ गटात घेण्यात आली.

यामध्ये पूर्व प्राथमिक गट यामध्ये अंगणवाडी कार्यकर्ता सेविका व पर्यवेक्षिका यांचा समावेश आहे. प्राथमिक गट यामध्ये उपशिक्षक पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापक यांचा समावेश आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक गटात उच्च माध्यमिक शिक्षक व मुख्याध्यापक यांचा समावेश आहे. विषय सहाय्यक, विषय साधन व्यक्ती, समावेशित साधन व्यक्ती, विशेष शिक्षक व ग्रंथपाल यांचा समावेश विषय साधन व्यक्ती या गटात होतो. तसेच अध्यापकाचार्य व पर्यवेक्षीय अधिकारी गटात अध्यापकाचार्य केंद्रप्रमुख ते शिक्षणाधिकारी, अधिव्याख्याता, वरिष्ठ अधिव्याख्याता यांनी आपल्या नवोपक्रमाचे सादरीकरण करावयाचे आहे.

सदर स्पर्धा दोन टप्प्यात घेण्यात आली. पहिल्या टप्प्यामध्ये पाचही गटामधून आलेले नवोपक्रमाचे ऑनलाइन मूल्यांकन करण्यात आले व प्रत्येक गटातून पहिले सात नवोपक्रम अहवाल हे दुसऱ्या फेरीसाठी पात्र ठरले. पहिल्या फेरीमध्ये पाच गटांमध्ये एकूण ५६ प्रस्ताव आलेले होते. त्यामधून वीस प्रस्ताव हे दुसरा फेरीसाठी पात्र ठरले. दुसरी फेरी ही प्रत्यक्ष सादरीकरण द्वारे घेण्यात आली यामधून २० उपक्रम अहवालातून १७ उपक्रम अहवाल हे दुसऱ्या फेरीसाठी पात्र झाले.

यातील उत्कृष्ट असलेल्या नवोपक्रमाची पुस्तिका तयार करण्याचे निश्चित केले. त्यानुसार प्रत्येक गटातील प्रथम पाच क्रमांक व उत्तेजनार्थ नवोपक्रम अहवालांची पुस्तिका ही प्रकाशित करण्यात आली. ज्याचा हेतू फक्त राज्यातील सर्व शिक्षकांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल, आणि विद्यार्थ्यांसह शिक्षकाची पण गुणवत्ता वर्धीत होईल. जेणेकरून संपूर्ण राज्याची शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत होण्यास मार्ग प्रशस्त होईल. विद्यार्थ्यांच्या जीवनात बदल घडवून आणण्यासाठी संपूर्ण शैक्षणिक समुदायाच्या विकासासाठी ही पुस्तिका निश्चितच मदत करेल.

# प्रस्तावना



**अर्चना विश्वंभर नलावडे**
अधिव्याख्याता, जिल्हा
शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणेच्या मार्फत राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा २०२३-२४ आयोजित करण्यात आली.

राज्यातील सर्व नवोपक्रमशील शिक्षक व अधिकारी हे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सतत प्रयत्न करीत असतात. याच बरोबर राज्यातील नवोपक्रमशील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या अध्ययनात खंड पडू नये यासाठी नवनवीन उपक्रम तसेच कल्पनांचा विचार करीत आहेत. तसेच प्रत्येक मूल प्रगत होण्यासाठी सिक्षक व अधिकारी प्रयत्न करीत आहेत. त्यांनी राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाची माहिती राज्यातील शिक्षक क्षेत्रातील सर्व घटकांना व्हावी तसेच सर्वच स्तरावरील शिक्षक व अधिकारी यांच्या नवोपक्रमशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी सदर स्पर्धा एकूण पाच गटांत घेण्यात आली.

१. पूर्व प्राथमिक गट यामध्ये अंगणवाडी कार्यकर्त्या/सेविका व पर्यवेक्षिका यांचा समावेश आहे.

२. प्राथमिक गट या मध्ये उपशिक्षक, पदवीधर शिक्षक व मुख्याध्यापक यांनी आपले नवोपक्रम सादर केले.

३. माध्यमिक, उच्च माध्यमिक गटात माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व मुख्याध्यापक यांनी सहभाग नोंदविला.

४. या गटात विषय सहायक, विषय साधन व्यक्ती, समावेशित साधन व्यक्ती, विशेष शिक्षक व ग्रंथपाल यांचा समावेश होतो.

५. अध्यापकाचार्य व पर्यवेक्षकीय अधिकारी गटात अध्यापकाचार्य, केंद्रप्रमुख ते शिक्षणाधिकारी, अधिव्याख्याता व वरिष्ठ अधिव्याख्याता यांनी आपल्या नवोपक्रमाचे सादरीकरण केले.

सदर स्पर्धेसाठी दोन टप्प्यात प्रस्ताव मागविण्यात आले. पहिल्या टप्प्यातील जिल्हा व विभाग स्तरावरील मूल्यांकन प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पूर्ण झाली. दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष सादरीकरण करण्यात आले. यातील उत्कृष्ट असलेल्या नवोपक्रमांची पुस्तिका तयार करण्याचे ठरले. त्यानुसार प्रत्येक गटातील प्रथम पाच क्रमांक व उत्तेजनार्थ पुरस्कार प्राप्त नवोपक्रम अहवालाची पुस्तिका प्रकाशित करण्यात आली. ज्याचा हेतू फक्त एकच आहे की राज्यातील सर्व शिक्षकांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळेल आणि विद्यार्थ्यांसह शिक्षकांची पण गुणवत्ता वर्धित होईल. जेणेकरून राज्याची पण शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत होण्यास मार्ग प्रशस्त होईल.

**श्रीमती अर्चना विश्वंभर नलावडे,**
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटकाचे नाव | लेखक | पृ क्र |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | **प्राचार्य डॉ. नेहा बेलसरे** | ३ |
| २ | प्रस्तावना | **अर्चना नलावडे** | ४ |
| I | **गट-१ पूर्व प्राथमिक** | | |
| १) | शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास | **रोहिणी अमित शिर्के**<br>शारदाबाई पवार विद्यामंदिर,बारामती,पुणे | ७ |
| II | **गट-२ प्राथमिक-उच्च प्राथमिक व मुख्याध्यापक** | | |
| २) | सणोत्सवाला स्पर्श शिक्षणाचा | **खोपडे शिवाजी रघुनाथ**<br>जिल्हा परिषद शाळा,आबडे,भोर,पुणे | १० |
| ३) | Enrichment of Students English language through learning Activities | **संतोष महादेव सातपुते**<br>जिल्हा परिषद शाळा,काटेवाडी, बारामती,पुणे | १६ |
| ४) | स्वनिर्मित शिकाऊ शैक्षणिक साहित्यातून अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी करणे | **प्रितम संतोष सातपुते**<br>जिल्हा परिषद शाळा, आडफाटा,पुणे | २० |
| ५) | चला रोखुया प्लॅस्टिकच्या भस्मासुराला | **पल्लवी रमेश शिरोडे**<br>जिल्हा परिषध शाळा,कोंढवे धावडे,हवेली,पुणे | २२ |
| ६) | पालकांचा कृतीयुक्त अध्यापनात सहभाग | **रामकृष्ण देवराम वाटेकर**<br>जिल्हा परिषद शाळा,टेमगिरवाडी,राजगुरूनगर,पुणे | २६ |
| ७) | रेषांनी दिला मुलांच्या आवडीला आकार | **दिपाली मिलन सांळुके**<br>जिल्हा परिषद शाळा,उंडवडी,सुपे,पुणे | ३० |
| ८) | Colours of Unity discovering neighbours & their symbols | **पुनम सचिन कडलग**<br>जिल्हा परिषद शाळा,येवलेवाडी,हवेली,पुणे | ३४ |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटकाचे नाव | लेखक | पृ क्र |
|---|---|---|---|
| **III** | **गट-३ माध्यमिक-उच्च माध्य व मुख्याध्यापक** | | |
| ९) | Play with the Ray | **श्वेता भामरे,** सिटी प्राईड स्कूल,पुणे | ३७ |
| १०) | चला शिकुया खेळातून संस्कृत भाषेतील वाक्यरचना | **भक्ती वैभव मोहोळ** सिटी प्राईड स्कूल,पुणे | ४० |
| ११) | विद्यार्थ्यांच्या कलागुण-कौशल्य विकसनसाठी स्पर्धांच्या माध्यमातून प्रेरणा देणे | **नगरकर नंदकिशोर दत्तात्रय** अभिनव विद्यालय हाय.,कर्वे रोड,पुणे | ४३ |
| १२) | इंग्रजी भाषेतील कौशल्यांचा विकास | **जरमीन अश्पाक सय्यद** लक्ष्मणराव आपटे प्रशाला,पुणे | ४६ |
| १३) | अक्षरबाग | **पदमश्री प्रदयुम देशपांडे** बापूसाहेब भोंडे हाय.,लोणावळा,पुणे | ५० |
| १४) | वैदिक गणिताची करामत सोडविती गणितातील संकल्पना भन्नाट | **विद्या माधवराव माळी** एम.व्ही.एम. रामचंद्र राठी मराठी माध्य.विद्यालय,पुणे | ५५ |
| **IV** | **गट-४ विषय सहाय्यक विशेष शिक्षक, विपय आघातव्यक्ती व ग्रंथपाल** | | |
| १५) | चला परसबाग बनवूया मुलांचे सदृढ आरोग्य करुया | **गणपत देवलू पवार** विषय साधनव्यक्ती,खटाव, जि. सातारा | ६० |
| १६) | शनिवार माझ्या आवडीचा | **भारत चिंतामणी बंडगर** विषय साधनव्यक्ती एनएनपी, जि.सांगली | ६४ |
| १७) | हसत खेळत पद्धतीने विद्यार्थ्यांना वृत्तपत्र वाचण्याची सवय लावणे | आशा रामदास थोरात (ग्रंथपाल) सिल्व्हर क्रेस्ट स्कूल,पुणे | ६८ |
| **V** | **गट-५ अध्यापकाचार्य व पर्यवेक्षीय यंत्रणा** | | |
| १८) | चला करू प्रगतवर्ग अभियान | **गणपती बंडा कमळकर** गट शिक्षणाधिकारी ता. कागल,जि.कोल्हापूर | ७२ |
| १९) | केंद्रशाळा प्रशासन व केंद्रप्रमुख बदलती भूमिका | **संतोष पंतगराव पवार** केंद्रप्रमुख कवठे महाकाळ,जि. सांगली | ७६ |
| २०) | सजग व संवेदनशील नागरिकत्वासाठी शालेय विद्यार्थ्यांना संविधान शिक्षण | **अश्विनी सोनवणे** गटशिक्षणाधिकारी, ता.भोर, जि.पुणे | ८० |

I

गट-१

पूर्व प्राथमिक

# शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास

- **नवोपक्रमाची गरज व महत्त्व -**

पूर्व प्राथमिक विभागातील मुलांचा वयोगट 3 ते 6 वर्ष असा आहे. लहान मुले अनुकरणशील असतात मोठी व्यक्ती जी कृती करेल ती कृती करण्याचा प्रयत्न करत असते. लहान मुलांची निरीक्षण क्षमता खूप चांगली असते. शिकणे ही प्रक्रिया खरं म्हणजे जन्मापासूनच सुरू होते घर कुटुंब यांच्यातील आंतरक्रियांमधून मुलं शिकण्याचा प्रयत्न करते या कुटुंबापासून मूल जेव्हा घरातून पहिल्यांदा शाळेत जाण्यासाठी बाहेर पडते तेव्हा त्या शाळेमध्ये सर्व मुले त्याच्यासाठी नवीन असतात. लहान मुलांना खेळाची खूप आवड असते विविध प्रकारची खेळणी मेकॅनो मुलांना खेळायला दिली तर मुले त्या खेळामध्ये रमून जातात व या खेळाची ओढ लागल्यामुळे मुलांना शाळेची आवड निर्माण होते. लहानातली लहान वस्तू मुलांना सहज पकडता येते त्यामुळे मुलांचे अक्षर सुधारते व हातांच्या बोटांचा चांगल्या प्रकारे विकास होतो मूलं जेव्हा स्वतः कृती करतात तेव्हा ते अधिक ज्ञानग्रहण करतात. आपल्या जीवनामध्ये शालेय अभ्यासक्रमाला खूप महत्त्व आहे त्याचबरोबर मुलांचा शारीरिक, मानसिक, भौतिक विकास होणे तेवढेच गरजेचे असते, मी शाळेमध्ये भाजी निवडून घेते, शेंगा सोलून घेते, शेंगदाणे कुटणे, पीठ मळणे, कपड्याच्या घड्या घालणे, चपाती लाटणे, धान्य पाखडणे या सर्व जीवन व्यवहाराच्या कृती शाळेत मुले आवडीने करतात. या लहान वयातच मुलांना याची आवड निर्माण झाली तर आईला घरात घर कामात मदत होते आणि यातूनच मुलांना स्वच्छतेचे महत्व कळते आणि मुले स्वावलंबी बनतात तसेच शारीरिक कौशल्य विकसित होते.

- **शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास याचे वेगळेपण-**

साधनांची माहिती झाल्यानंतर मुले सुद्धा ती साधने हाताळू लागली व स्वतः त्याची वेगवेगळी मांडणी करू लागली. सर्व मुले एकत्र खेळत असल्यामुळे सहकार्याची वृत्ती निर्माण झाली होती. सुरुवातीला त्या साधनांचा वापर कसा करायचा हे मी त्यांना सांगत होते, परंतु नंतर मुले स्वतःच एकमेकांशी चर्चा करून त्यामध्ये वेगळेपण घडवून आणत होते. पालकांशी संवाद वाढला पालक सुद्धा घरी जीवन व्यवहाराच्या कृती मुलांना द्यायला लागले त्यामुळे मुले जास्त वेळ गुंतून राहिली.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे**

1. लहान मुलांच्या शारीरिक हालचाली होणे.
2. शाळेची आवड निर्माण होणे.
3. खेळाच्या माध्यमातून शारीरिक भौतिक विकास घडवून आणणे.
4. मुलांना विचार करायला प्रवृत्त करणे.
5. मुलांना मनोरंजनाद्वारे अध्ययनाकडे वळवणे व सहकार्य वृत्तीत वाढ होणे.

- ## नवोपक्रमाचे नियोजन

**1. उपक्रम स्थितीचे निरीक्षण -**

लहान मुले आई-बाबांना सोडून थोडा वेळही कोठे राहत नाहीत, आपले घर आणि आई-बाबा हेच विश्व असते. गावाकडची मुले तरी बाहेर मुलांबरोबर खेळत असतात पण शहराच्या ठिकाणी लहान मुलं चार भिंतीच्या बाहेर नसतात एकटेच घरात असतात त्यामुळे घरातील व्यक्तींची त्यांना सवय लागते अशावेळी अशी मुले घर सोडून शाळेत येण्यासाठी घाबरतात 3 ते 6 वर्ष वयातील मुलांचा इतर लोकांशी समन्वय होत नव्हता शिक्षकांचा पालकांशी जेव्हा जेव्हा संवाद होत असे तेव्हा अनेक पालकांकडून असे समजले होते की मुले इतरांच्यात मिसळत नाहीत सुरुवातीला मुले जेव्हा शाळेत येतात तेव्हा खूप रडतात शाळेमध्ये मुलांचे मन कसे रमले जाईल या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आला मुलांच्या बौद्धिक विकासाला आणि शारीरिक विकासाला चालना मिळावी या हेतूने या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली मुलांना अनेक प्रकारे कृतीतून त्यांची विचार क्षमता वाढावी या हेतूने उपक्रम राबविण्यात आला.

**2. संबंधित व्यक्ती व तज्ञ व्यक्तींशी चर्चा-**

या संदर्भात आमच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. अमोल घोडके सर, वर्षाताई गायकवाड यांच्याशी चर्चा होत होती हा उपक्रम मी करण्याचे ठरवल्यानंतर सर्व सहशिक्षकांशी चर्चा केली हा उपक्रम राबवत असताना माननीय शरद पवार फेलोशिप पुरस्कार प्राप्त श्री .अमोल घोडके सर,वर्षाताई गायकवाड यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

**3. आवश्यक साधनांचा विचार-**

मुलांचे शाळेमध्ये मन रमण्यासाठी विविध प्रकारची खेळणी मुलांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला मुले स्वतःची खेळणी दुसऱ्या मुलांना घेऊ देत नाहीत अशावेळी दुसऱ्या मुलाला गुंतवून ठेवण्यासाठी जीवन व्यवहारा सारख्या वेगवेगळ्या कृती देण्यात आल्या मुलांच्या हाताला काम दिले की मुले गुंतून राहतात लहान मुलांना मातीत खेळायला आवडते त्यामुळे एका बाटलीमध्ये टोपणाने माती भरणे, मातीत अक्षर गिरवणे, अंक लिहिणे, चित्र काढणे, मातीचा किल्ला बनवणे, मातीची भांडी तयार करणे अशा प्रकारे मुलांचे मातीमध्ये घेण्यात येणाऱ्या खेळाचे नियोजन केले.

**4. करावयाच्या कृतीचा क्रम-**

सुरुवातीला जेव्हा मुले शाळेत आली तेव्हा त्यांचे मन रमण्यासाठी विविध प्रकारची खेळणी मुलांना देण्यात आली. यानंतर जेव्हा मुलांचे मन शाळेमध्ये रमायला लागले तेव्हा त्यांचा बौद्धिक विकास कसा होईल याचा विचार करून तशा पद्धतीची कृती मुलांना करण्यासाठी देण्यात आल्या. अंकावर, अक्षरावर खडे, बिया लावणे यातून मुलांना अंकाची व अक्षराची ओळख होते व त्या अक्षरांचे वळण मुलांना समजते. तसेच मणी ओवताना त्याचा पॅटर्न तयार करणे किती मण्यांचा पॅटर्न तयार झाला हे मुलांना समजते अशाप्रकारे मुलांना खेळाच्या माध्यमातून शिक्षणाकडे वळवता येते.

- ## नवोपक्रमाची कार्यवाही

**अ) पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी-**

1. मुलांना वर्गात फक्त गाणी, गोष्टी, अभ्यास घेत असल्यामुळे मुले कंटाळताना दिसले.
2. विद्यार्थ्यांचे गैरहजर राहण्याचे प्रमाण वाढत चालले होते.
3. विद्यार्थ्यांबद्दल पालकांच्या खूप तक्रारी येत असत.

**ब) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन-**

1. या उपक्रमामध्ये मुले आनंदाने कार्यरत होते.
2. खेळाच्या माध्यमातून मुलांचा शारीरिक विकास घडत होता.
3. मुले स्वावलंबी बनली. स्वतःची कामे स्वतः करू लागली. उदा. स्वतःच्या कपड्यांची घडी घालणे, स्वतःच्या वस्तू जागेवरती ठेवणे.
4. मुले एकमेकांना मदत करू लागली.

- **कार्यवाही करताना आलेल्या अडचणी-**

1. सुरुवातीला होणारा पालकांचा हस्तक्षेप.
2. मुलांना सुरुवातीला साधनांची कमी होते त्यामुळे प्रत्येक मुलाला खेळणी हाताळता येत नव्हती.
3. एखाद्या मुलाला कोणतीच कृती करायची नसते नुसतेच रडत असते सर्व मुलांचे लक्ष त्या मुलाकडे जात असते ते पाहून दुसरी मुलेही रडायला लागतात.

- **नवोपक्रमाची यशस्वीता व फलनिष्पत्ती**

मुले वर्गात रमू लागली. मुले प्रत्येक वस्तूचे निरीक्षण करू लागली. मुलांच्या शारीरिक विकासात वाढ झाली. मुले एकमेकांशी संवाद साधू लागली. शाळेत येण्याची ओढ निर्माण झाली. मुले स्वतः कलाकृती तयार करू लागली. मुलांमध्ये सहकार्याची भावना निर्माण झाली. मुले विचार करू लागली. मुलांचा शारीरिक विकास झाला. मुलांच्या बोटांच्या स्नायूंचा विकास झाला. मुलांना शाळेची आवड निर्माण झाली.

- **नवोप्रकमाचा समारोप**

शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास हा उपक्रम मुलांमध्ये आलेल्या अडचणीतून राबविण्यात आला. खेळाच्या माध्यमातून मुलांना शिक्षणाकडे वळविण्यासाठी एक नवी दिशा मिळाली. मुलांमध्ये व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले. मुलांच्या विचार क्षमतेला चालना मिळाल्यामुळे मुलांच्या सृजनशीलतेला वाव मिळाला मुले नवी आव्हाने स्वीकारू लागली. त्यांना शाळेची गोडी लावू शकली अशा पालकांच्या प्रतिक्रिया मिळाल्या. उपक्रम स्पर्धेच्या माध्यमातून शिक्षणाचा पाया स्नायूंचा विकास हा छोटासा उपक्रम सादर करताना अत्यंत आनंद होत आहे. हा उपक्रम शाळेमध्ये कायमस्वरूपी राबवित राहील.

**सादरकर्ती- सौ. रोहिणी अमित शिर्के**
हुद्दा- शिक्षिका
शाळेचे नाव ः शारदाबाई पवार विद्या मंदिर, शारदानगर





II

## गट-२
## प्राथमिक व उच्च प्राथमिक व मुख्याध्यापक

# सणोत्सवाला स्पर्श शिक्षणाचा

- **नवोपक्रमाची गरज आणि महत्त्व**

विविध सर्व जाती धर्माच्या महत्त्वाच्या सर्व सण उत्सवांना शाळांना सुट्टी असते. मुले हे सण उत्सव आपल्या पालकांबरोबर, समाजाबरोबर घरीच साजरे करीत असतात. या सण उत्सवात आनंदाने सहभागी होत असतात. पालकां कडून साजरे होणाऱ्या सण उत्सवांचे बारकाईने निरीक्षण करीत असतात .रुढी,परंपरा, आधुनिकता व समाजाची संस्कृती विचारात घेऊन हे सण उत्सव साजरे करीत असतात .विद्यार्थी या सण उत्सवाचे आपल्या निरीक्षणातून वक्तृत्व वा निबंध लेखन रूपाने लेखनातून व्यक्त होत असतात.

सद्यस्थितीमध्ये शाळा, शिक्षण आणि सण उत्सव यांचा प्रत्यक्ष संबंध येत नसतो .शाळेत विद्यार्थ्यांना निबंध लेखनातून सण उत्सवाबाबत माहिती विचारण्यात येत असते . खरे तर शाळेबद्दल हे सर्व शिक्षणाशी जोडण्याची गरज आहे .मात्र जाती धर्मातील परंपरा, संस्कृती जपण्याचा प्रयत्न करावा. सणांच्या दिवशी व दुसऱ्या दिवशी याच सण उत्सवांना शैक्षणिक टच देऊन यातील काही सण शाळेत साजरे करण्याची आज गरज वाटते. यातून विद्यार्थ्यांमध्ये विविध नीती मूल्ये जपण्याचा प्रयत्न होत असतो. सण उत्साहातून शैक्षणिक ज्ञानात भरत पडत असते .वर्षभरातील काही सण उत्सवांना शैक्षणिक टच देऊन शाळेत साजरे करण्यावर सर्वप्रथम शिक्षक, विद्यार्थी, पालक यांच्यामध्ये विचार मंथन झाल्यानंतर त्याचे अनेक फायदे, महत्व लक्षात घेऊन कार्यवाहीस प्रारंभ करण्याचा श्री गणेशा करण्याचा ध्यास घेतला. या नवोपक्रमातून पर्यावरण रक्षण, राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण, विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव, मूल्यांची जोपासना, शाळेत सण उत्सव एका वेगळ्या पद्धतीने साजरे केल्याचे समाधान तर मिळतेच. शिवाय विद्यार्थ्यांचा मनोरंजनातून अभ्यास ही होत असतो .त्यांना निर्भेळ असा आनंद मिळत असतो.

मनात विचार आले की, या सण उत्सवांना रुढी, परंपरा व आधुनिकता जपून शाळेची शिक्षणाची जोडता येईल का? यातून उद्याच्या भावी पिढीला समाजाला नकळत काही संदेश देता येईल का ? पर्यावरण रक्षण, इको फ्रेंडली असे सद्यस्थितीला गरज असणारे मोठे लाभ मिळवता येतील का ? विचारांती लक्षात आले की, होय . .हे नक्कीच शक्य आहे.

निश्चितपणे या "सण उत्सवांना स्पर्श शिक्षणाचा" हा नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम यापूर्वी शाळांमध्ये असा वेगळा विचार करून कार्यान्वित केला असल्याचे दिसून आले नाही. केवळ या सणांना सुट्टी देऊन या सणांचे महत्त्व निबंध लेखनातून व्यक्त होणारी मुले आजवर आपण पहात आलेलो आहे .त्यामुळेच काही सण उत्सवांना शैक्षणिक टच देण्याचा प्रयत्न नक्कीच वेगळा व आदर्शव्रत आहे. याशिवाय हे नवोपक्रम पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्या विचार मंथनातून व पूर्व विचाराने साजरे केल्याने, तसेच समाजाच्या रूढी, परंपरा व संस्कृतीला कोणत्याही प्रकारची बाधा न पोहोचविता केवळ शाळेत शिक्षणाला स्पर्श करण्याचा प्रयत्न केल्याने या नवोपक्रमाला नक्कीच एक वेगळेपण आहे.

## • उपक्रमाचे क्षेत्र

पुणे जिल्ह्याच्या दक्षिण हद्दी वर असलेली पूर्णतः ग्रामीण डोंगरी भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंबाडे तालुका भोर जिल्हा पुणे येथील शाळेत शिक्षण घेत असलेले इयत्ता पहिली ते सातवीचे वर्गातील एकूण 73 विद्यार्थी. शाळेत हिंदू धर्मातील मुले शिक्षण घेत आहेत. हिंदू धर्मातील काही महत्त्वाचे सण गणेशोत्सव, दहीहंडी, दीपावली, होळी, गुढीपाडवा इत्यादी सणांचा या उपक्रमात समावेश करण्यात आला आहे . या सर्व सणांना शिक्षणाचा स्पर्श करण्याचा प्रयत्न करण्याचे निश्चित केलेले आहे.

उपक्रम कालावधी -शैक्षणिक वर्ष - 2022-23.

## • नवोपक्रमाची उद्दिष्टे :-

1 . विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्यामध्ये हा नवोपक्रम कार्यान्वित करण्याबाबत विचार मंथन करणे.
2 . समाजाच्या रूढी, परंपरा, संस्कृती, रीती रिवाज लक्षात घेऊन सण उत्सवांची निवड करणे.
3 . सण उत्सवातून पर्यावरण, तसेच राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण करणे.
4 . शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनात सर्वांगीण विकासासाठी सुप्त कलागुणांना पुरेशी संधी उपलब्ध करून देणे.
5 . शाळेत सण उत्सव एका वेगळ्या पद्धतीने, हेतूने साजरे केल्याचे समाधान वाटणे.
6 . दप्तराविना शाळा या शाळेच्या महत्त्वकांक्षी उपक्रमात वर्षभरातील काही सण उत्सवांना शैक्षणिक स्पर्श करण्याचा प्रयत्न करणे.
7 .या उपक्रमात सर्व सामाविष्ट उपक्रमातून मिळणारे अनेक फायदे विद्यार्थ्यांना होणे.

## • नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाही

1) सर्वप्रथम माहे एप्रिल 2021 मध्ये शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्याबरोबर या वैशिष्ट्यपूर्ण व नाविन्यपूर्ण उपक्रमांबाबत चर्चा केली रुढी, परंपरा, संस्कृती, रिती रिवाज जपून शाळेत सण उत्सव साजरे करण्याच्या व त्यांना शैक्षणिक स्पर्श करण्याच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाला सर्वांनी विचार मंथन करून एक विचाराने संमती दिली. त्यानंतर अनेक सण उत्सवांपैकी 1) ज्ञान आरोग्य गुढी 2) इको फ्रंडली गणेशोत्सव 3) प्रश्नहंडी 4) पर्यावरणपूरक दिपावली 5) कच-याची होळी या सण उत्सवांची निवड या नवोपक्रमासाठी करण्यात आली.

याशिवाय रक्षाबंधन सण उत्सवा पूर्वी राखी निर्मिती कार्यशाळा घेऊन वृक्ष व वर्ग मित्रांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा करणे. नवरात्र उत्सवात भोंडला, फॅशन शो या पारंपरिक सणावर आधारित उपक्रमांची आयोजन करणे . दीपावली दरम्यान रांगोळी, भेटकार्ड स्पर्धा व त्यांचे प्रदर्शन तसेच दीपोत्सव या उपक्रमांचा सहभाग तसेच मकर संक्रात रोजी शाळेत तिळगुळ वाटप करून बंधुभाव जपण्याचा प्रयत्न. गुरु पौर्णिमेला आई, मातांचे व गुरुजनांचे पूजन करणे.

2) एक सण उत्सव कार्यवाहीपूर्वी त्या त्या सण उत्सवाची परिपूर्ण पूर्व तयारी करण्यासाठी नियोजन करणे .तसेच इयत्ता सहावीच्या पूर्ण वर्गांकडून नवीन कार्याचा परिचय देण्याच्या हेतूने कार्यानुभव, कला विषयांतर्गत विद्यार्थ्यांची आवश्यकते नुसार वेळोवेळी मदत घेणे. शिक्षकांचे मार्गदर्शन घेणे.

3) उपक्रमाची कार्यवाही- आपला देश हा सर्व जाती धर्म, पंथ यांनी एकत्रित नांदणारा धर्मनिरपेक्ष असा विविधता असलेला देश. प्रत्येक धर्माचे रीती रिवाज, चालीरीती, प्रार्थना स्थळे, भाषा, सण उत्सव, पोषाख वेगवेगळे .सण उत्सवातून रूढी परंपरा व संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला जातो .मनात विचार आले की, या सण उत्सवांना रुढी परंपरा व आधुनिकता जपून शाळेशी शिक्षणाची जोडता येईल का ?यातून भावी पिढीला समाजाला न कळत काही संदेश देता येईल का ?विचार करता लक्षात आले. होय. हे नक्कीच शक्य आहे.

आमच्या जि. प .प्राथमीक शाळा अंबाडे येथे सणोत्सवाला शैक्षणिक टच देऊन परंपरा जपून ते साजरे करण्याचा प्रयत्न केलेला आहे .यातून पर्यावरण रक्षण, राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण, विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना संधी,शाळेत सण उत्सव एका वेगळ्या पद्धतीने साजरे केल्याचे समाधान, फायदे, मूल्यांची जोपासना, विद्यार्थ्यांचा मनोरंजनातून अभ्यास, असे विविध फायदे होत आहेत .दप्तराविना शाळा अंतर्गत सणोत्सवाला स्पर्श शिक्षणाचा या नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमातून प्रत्यक्ष काही सण उत्सव शाळेत साजरे करून एक वेगळेपण जपण्याचा प्रयत्न केलेला आहे .शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी करून घेतले आहे.

- **1) शाळेत इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करणे.**


बालचमूकडून पर्यावरणपूरक गणेश मूर्ती

प्रभात

सर्वप्रथम सर्व विद्यार्थ्यांना इको फ्रेंडली गणपती उत्सवा बाबत माहिती देऊन जनजागृती केली. उत्सवापूर्वी पाच-सहा दिवस अगोदर शाळेत गणेश मूर्ती बनविणे कार्यशाळा घेतली .वारुळाची चिकन माती चांगली मळून आणण्यास सांगितली. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना गणेश मूर्ती कशी बनवावी? याबाबत मार्गदर्शन केले .विद्यार्थ्यांनी छान प्रतिसाद देऊन सुबक, सुंदर अशा गणेश मूर्ती तयार केल्या.

तयार मूर्तींचे स्पर्धात्मक दृष्टीनेही निरीक्षण केले. त्यानंतर त्या सर्व मूर्ती सुकविण्यास पुरेसा वेळ दिला. पोस्टर कलर वापरून मूर्ती रंगवण्यास सांगितले. विद्यार्थ्यांनीही मार्गदर्शन परस्पर सहकार्य व स्व कल्पना वापरुन आकर्षक रित्या मूर्ती रंगविल्या. त्यामुळे या स्वनिर्मित मूर्तींचे सौंदर्यमूल्य अधिकच वाढले. शेवटी गणेश चतुर्थीला या स्वनिर्मित गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना करून एक वेगळाच आदर्श निर्माण केला. स्वनिर्मितीचा /गणेश मूर्ती बनवणे कार्यशाळेचा निर्भेळ असा आनंद मिळाला. पर्यावरण रक्षण होऊन इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा झाला. पारंपारिकता, रुढी जपण्याचाही प्रयत्न झाला व खऱ्या अर्थाने गणेशोत्सव सणाला शैक्षणिक स्पर्श झाला.

- **2 ) शाळेत प्रश्न हंडी साजरी करणे.**

कृती टप्पे.... शाळेत दहीहंडी या सणाच्या दिवशी शाळेच्या भव्य उंच व्हरांड्यात पूर्वतयारी करून आकर्षक अशी दहीहंडी म्हणजेच प्रश्न हंडी बांधण्यात आली. यामध्ये दहीकाल्या ऐवजी चिठ्ठ्यांवर सामान्य ज्ञानाचे प्रश्न लिहिलेल्या चिठ्ठ्या टाकल्या. या चिठ्ठ्यांचेही आकार मासा, त्रिकोण, षटकोन, पक्षी, प्राणी, पतंग, भौमितिक आकार यांसारखे ठेवले. प्रश्न संख्या विद्यार्थी पटाच्या दुप्पट ठेवली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना एकत्र करून विद्यार्थ्यांचे थर लावण्यात आले. या मनोऱ्यासाठी अनेक विद्यार्थ्यांना संधी दिली. सुरक्षिततेकडे विशेष लक्ष दिले. शेवटी प्रश्न हंडी फोडण्यात आली. सर्वांना प्रश्न रुपी प्रसाद मिळाला. त्यानंतर प्रश्नोत्तर कार्यक्रम पार पडला. सामान्य ज्ञानातील विविध प्रश्नांचा सराव झाला. या प्रश्नहंडी उपक्रमामुळे सामान्य ज्ञान प्रश्नांचे सराव व दृढीकरण झाले. प्रश्न हंडी साजरी केल्याने शाळेत सण साजरा झाल्याचा आनंद मिळाला. सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला .दहीहंडी सारख्या या प्रश्नहंडी उपक्रमास शैक्षणिक स्पर्श झाला.



- **3) पर्यावरण्पूरक फटाके मुक्त दिपावली सण शाळेत साजरा करणे.**



कृती टप्पे.... किल्ले बनवा उपक्रमात विद्यार्थ्यांचे वर्गवार गट तयार करून पूर्वनियोजन केले. पटांगणात जागा नेमून दिल्या. वेगवेगळ्या किल्ल्यांच्या प्रतिकृती आकर्षकरित्या तयार होतील याकडे लक्ष दिले. बुरुज, तटबंदी, पाणीसाठे, शिवप्रतिमा व शिवसैनिक तसेच किल्ले माहितीचे तक्ते याची प्रत्येक गटाने तयारी केली. विद्यार्थ्यांनी प्रतापगड, सिंहगड, रायगड, शिवनेरी इत्यादी किल्ले प्रतिकृती तर बनविल्याच याशिवाय इयत्ता सहावीने खाली प्लास्टिक कागद टाकून सिंधुदुर्ग या पाण्यातील किल्ल्याची प्रतिकृती बनविण्याचा प्रयत्न केला. आकाश कंदील बनविणे कार्यशाळेत विद्यार्थ्यांकडून विविध आकाराचे आकाश कंदील /स्टार बनवून घेतले .रंगीत कागदापासून बनविलेले सुंदर असे आकाश कंदील व स्टार वर्गात व विद्यार्थ्यांच्या घरी लावण्यास दिले.

त्याचप्रमाणे दोऱ्या, वाक, कापडी पट्ट्या, भात काड्या इत्यादी एकत्रित विणून त्यापासून आसूड तयार करून घेतले. पक्की बांधणी साठी पालकांची ही मदत घेतली. बहुतांश विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. या आसूडाला हवेत जोराचे झटके दिल्यानंतर फटाक्यासारखा आवाज घुमू लागला .त्यामुळे फटाके फोडण्याचा आनंद मिळाला. प्रदूषणमुक्त व फटाके मुक्त दिवाळी काही अंशी साजरी झाली. आसूड फिरवताना इतरांना कोणत्याही प्रकारची इजा होणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचना दिल्या.या उपक्रमामुळे शिवरायांचा ऐतिहासिक वारसा गड किल्ले याविषयी जनजागृती झाली स्वनिर्मितीचा आनंद मिळाला. समूहात निष्ठेने काम करण्याचे प्रत्यक्ष अनुभव मिळाला. मनोरंजन झाले. विकतच्या आकाश कंदीलापेक्षा स्वनिर्मित आकाश कंदीलाचे मोल मोठे असते हे सिद्ध झाले. असुडांचे प्रदूषण विरहित फटाके छान वाटले. खऱ्या अर्थाने इको फ्रेंडली दिवाळी सण साजरा झाला.



- **4) पर्यावरण पूरक होळी सण साजरा करणे.**

**कृती टप्पे-** विद्यार्थ्यांना शाळा परिसर, सार्वजनिक ठिकाणे, घर परिसर येथील कचरा संकलन करण्यास सांगितले . या साठी पालकांची ही मदत घेतली. त्यानिमित्ताने परिसर स्वच्छ झाला. जमा झालेला सर्व कचरा शाळेच्या पटांगणात एकत्रित गोळा केला. त्या

भोवती रांगोळीने सुशोभित केले. होळीचे पूजन केल्यानंतर ती पेटवण्यात आली .नैवेद्य, श्रीफळ होळीत न टाकता तो होळीला दाखवून प्रसाद म्हणून वाटण्यात आला. याशिवाय आपल्या मनातील वाईट विचार, दोष होळीला अर्पण करण्याचेही आवाहन केले. इत्यादी राष्ट्रीय संपत्तीची बचत झाली. परिसर स्वच्छ झाला. परिश्रमाची सवय झाली. कचऱ्याची होळी, नैवेद्याचा प्रसाद यातून विद्यार्थ्यांच्या मनात एक चांगला संदेश गेला .गरिबांना नैवेद्य दान यातून कृतीयुक्त आत्मिक समाधान मिळाले .परंपरेला छेद देऊन होळी सण शिक्षणाला स्पर्श देऊन साजरा झाला.

- **सण उत्सव नं.5. शाळेत ज्ञान आरोग्य गुढी उभारून नववर्षाचे स्वागत करणे.**

कृती टप्पे... गुढीपाडवा सणाप्रमाणे गुढीची संपूर्ण पूर्व तयारी केली. नवीन शैक्षणिक वर्षाच्या म्हणजेच शाळेच्या पहिल्या दिवशी ही ज्ञान आरोग्य गुढी उभारण्यात आली. या गुढीला उपक्रम पट्ट्या चिकटवून सुशोभित केली. शिवाय गुढीला उपक्रम माला बांधण्यात आली. शाळा प्रवेशोत्सवाला गुढीचे पूजन झाले .शिवाय कडुलिंब पाने,गूळ यांचे मिश्रण विद्यार्थ्यांना प्रसाद म्हणून दिले. नवीन शैक्षणिक वर्षाचे स्वागत गुढी उभारून झाले.उपक्रममाला व उपक्रम पट्ट्यांनी गुढी सजविल्याने शैक्षणिक संदेश देता आला .कडुलिंब सेवन यातून आरोग्याचा संदेश मिळाला. शाळेत प्रेरणादायी वातावरण तयार झाले. गुढीपाडवा सणाप्रमाणे या उपक्रमाला शिक्षणाचा स्पर्श झाला.

एकूणच सणोत्सवाला स्पर्श शिक्षणाचा या नावीन्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमामुळे पर्यावरण व राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण, विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना संधी, स्वनिर्मितीचा निर्भेळ आनंद, मूल्यांची जोपासना, इको फ्रेंडली, मनोरंजन, कृतीयुक्त कार्यशाळा, शाळेत सण उत्सव शिक्षणाला स्पर्श करून साजरे करणे .असे असंख्य फायदे झाले.

## • उपक्रमाची यशस्वीता

सणोत्सवाला स्पर्श शिक्षणाचा या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमामुळे शाळेत सण उत्सव साजरे झाले. रुढी, परंपरा, व संस्कृती जपून सण उत्सवांना शैक्षणिक टच देण्याचा प्रयत्न झाला. पर्यावरण आणि राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण झाले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलांना वाव मिळाला. आपली कला प्रदर्शित करण्यासाठी संधी व व्यासपीठ उपलब्ध झाले. स्व निर्मितीचा निर्भेळ आनंद झाला. इको फ्रेंडली संकल्पना प्रत्यक्षात उतरली .प्रत्येक सण उत्सवांचे वेगवेगळे फायदे या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे शक्य झाले .विद्यार्थ्यांचे मनोरंजन झाले .शाळेत विविध प्रकारच्या कृतीयुक्त कार्यशाळा या निमित्ताने संपन्न झाल्या.

एकंदरीत परंपरागत रूढी परंपरा संस्कृती जपून सण उत्सवाला शैक्षणिक स्पर्श झाला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे अनुभव, सहभाग व यशस्विता विचारात घेता" सण उत्सवाला स्पर्श शिक्षणाचा "हा उपक्रम 100% यशस्वी झाला .

- **निष्कर्ष व सूचना—**

शाळेतील सर्व विद्यार्थी या उपक्रमात आनंदाने उत्साहाने सहभागी झाले.

खऱ्या अर्थाने शाळेत सण उत्सव, रुढी, परंपरा व संस्कृती जपून एका वेगळ्या पद्धतीने साजरे करून शिक्षणाला स्पर्श झाल्याचे दिसले.

सण उत्सवाला स्पर्श शिक्षणाचा या शाळेत कार्यान्वित केलेल्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना हे वर्ष आनंदाचे, सर्वांगीण विकासाचे, अनुभव विश्व वाढीचे, नवनवीन शिकण्याचे गेले.

अशा प्रकारचे उपक्रम भारतातील सर्व शाळांमध्ये साजरे करता येणे शक्य आहे .पर्यावरण व राष्ट्रीय संपत्तीच्या रक्षणासह सण उत्सवांना खऱ्या अर्थाने शिक्षणाचा स्पर्श करून अनेक फायदे मिळवून देऊ शकता.

- **नवोपक्रमाचा समारोप**

गावामध्ये साजरे होणारे सण उत्सव प्रत्यक्षात शाळेमध्ये शिक्षणाचा स्पर्श देऊन साजरे झाले. विद्यार्थी शिक्षक, पालक अशा सर्व संबंधित घटकांना एक वेगळेपण देऊन गेले .विद्यार्थ्यांना प्रत्येक सण उत्सवाचे अनेक फायदे झाले. रुढी, परंपरा, संस्कृती यांची जपणूक केल्यामुळे पालकांनाही ते भावले. विद्यार्थ्यांना निर्भेळ आनंद देता देता मूल्यांचा विकासाबरोबरच

गुणवत्ता वृद्धी होण्यास मदत झाली. सण उत्सवातून पर्यावरण रक्षण, राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण होण्यास मदत झाली.

प्रत्यक्षात विविध सण उत्सवांना अभ्यासाची जोड दिल्याने मनोरंजनाबरोबर अनेक फायदे झाले. मनात तयार झालेल्या संकल्पना प्रत्यक्षात उतरल्याने मनाची अस्वस्थता दूर झाली.

**सादरकर्ता - श्री. शिवाजी रघुनाथ खोपडे**
हुद्दा ः पदवीधर शिक्षक तथा प्रभारी मुख्याध्यापक
शाळा ः जि. प. केंद्रशाळा आंबाडे, ता. भोर, जि. पुणे
(सध्या शिक्षण विस्तार अधिकारी, पं. स. भोर)



# "Enrichment of Students English Language through Learning Activities"

( By using self created E-Content, Handmade Teaching Aids.)
Youtube link of Initiative :- https://youtu.be/Omoqa7MDgag

- **Need and Importance of Innovation**

Due to the use of various educational materials of the English subject in the study and teaching, the fear of the English subject was removed and the students got a scope for innovation and the interest of the students in the English subject was created.Using this activity in the classroom has increased the vocabulary of the students, helped in reciting poetry, helped students in reciting things, and learning English subject grammar.

- **Objectives of Innovation**


1. To develop students productive speaking writing and respective skills reading and listening and enhance their ability to use the language communicatively and effectively.
2. To revise and deepen students linguistic knowledge and vocabulary.
3. To develop creative thinking in English language.
4. To develop group interaction skills .

- **Planning and proceedings of Innovation**

- **1. Dramatization :-**

By using dramatization method in teaching learning of English subject in classroom student take active participation in each activities. Class 3rd and 4th dramatized the story of English subject and uploaded it on Smartगुरू - YouTube channel. Teaching stories of English




subject with the help of dramatization makes students interested in English subject. By dramatizing the story and asking the students to recite the dialogues, the students happily recite them all and the interest in the English subject becomes successful in teaching and learning.

- **2. Poetry singing and recitation :-**




All English poems of class 3rd and class 4th in English subject are recited with the help of acting students and their videos are uploaded on YouTube channel. Students' interest in English subject has increased by reciting poems through dancing and acting. By reciting the poem, the students' knowledge of English subject has increased by remembering all the things such as word collection, picture name in English. The vocabulary of the English subject is enriched by reciting poetry.





- **3. Use of flash cards :**

Flash cards provide students with a portable learning tool. Rather than having to carry around a book or notebook, flash cards allow students the opportunity to transport as many cards as they need.







- **4. Use of self created Teaching Aids :-**

Students are taught using self-made English materials to inculcate interest in English subject among students . Using these educational materials while teaching English in the classroom helps students identify new words and help them learn.

- **5. English Language Conceptual Resource Learning Material :-**



To develop English language skill in students this type of material in English kit is very useful in classroom. By using self learning material and teaching learning material in the classroom students are able to acquire the basic language skill in English language i.e. listening,

speaking, reading and writing.

- **Use of Mobile Apps :-**

Read along by Google, Google Translate, DUOLINGO Learn Languages, Learn English Grammar, British Council English Score, DIKSHA for school education. By using this mobile app Read along by Google, students study various sentences and games in English at home with their parents, so students get familiar with picture words and increase vocabulary. Reading knowledge and practice improves. Every day, parents of students use this mobile app to practice reading at home.

- **Outcomes**

1. The learners are associates words with pictures.
2. The learners are recites poems with actions.
3. The learners are responds orally to comprehension questions related to stories, poems.
4. The learners are performs in events such as role play, skit in English with appropriately expressions.

- **Success of the initiative**

Since I started to implement this activity activity in English subject from last year in my school and class, the students of my class and school benefited a lot because of this, students became interested in studying English subject, learned new words, became interested in doing the things in the textbook. It helped them to understand the grammar of English. Students came forward to recite poetry with interest.

- **How can we universalize this success story**

"Enrichment of English Language through Learning Activities" This initiative I implemented in my school and classroom is available online to other students and all teachers. Smart गुरू - YouTube channel :- videos are also uploaded on YouTube channel for all students and teachers of my cluster, my block Baramati, my district Pune and State to use even on their mobile phones at home.

**सादरकर्ते : श्री. संतोष महादेव सातपुते (उपशिक्षक)**
MA. B.Ed. MA(Edu) appear,
हुद्दा : DSM, HR. TAG CO-ORDINATOR
शाळा : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा काटेवाडी
केंद्र :- काटेवाडी , तालुका :- बारामती , जिल्हा :- पुणे .

# स्वनिर्मित टिकाऊ शैक्षणिक साहित्यातून अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी करणे

- **नवोपक्रमाची गरज व महत्त्व**

प्राथमिक गटाला प्रत्येक घटक शिकवत असताना शैक्षणिक साहित्याचा वापर करणे अनिवार्य आहे . कारण शैक्षणिक साहित्याचा वापर केल्यामुळे एखादा संबोध, संकल्पना अधिक दृढ होण्यास मदत होते आणि कायमस्वरूपी तो घटक, तो संबोध विद्यार्थ्यांच्या स्मरणात राहतो .शैक्षणिक साहित्य बनवताना ते कसेही न बनवता दीर्घकाळ टिकणारे म्हणजेच टिकाऊ मजबूत आणि इतरांनाही उपयोगी कसे असेल याकडे मी बारकाईने लक्ष दिले .फक्त ऑफलाईनच नाही तर Smart गुरु या स्वतःच्या यूट्यूब चॅनल वर अनेक शैक्षणिक व्हिडिओंची निर्मिती करून डिजिटल शैक्षणिक साहित्यही मी तयार केले.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे**

१) विद्यार्थ्यांसाठी स्वतः उपयुक्त, दर्जेदार शैक्षणिक साहित्य निर्मिती करणे .

२)तयार केलेल्या शैक्षणिक साहित्याचा अध्ययन अध्यापनात प्रभावी वापर करणे .

३) विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य हाताळण्याची संधी देऊन स्वयंअध्ययनास प्रवृत्त करणे

- **नवोपक्रमाची कार्यपद्धती :-**

१) सर्वप्रथम इयत्ता पहिली ते चौथीच्या विविध विषयातील अध्यापन घटक निवडून त्यासाठी लागणाऱ्या शैक्षणिक साहित्याची यादी तयार केली .

२) शालेय वेळे व्यतिरिक्त वेळेत घटक निहाय साहित्य तयार करायला सुरुवात केली . उदा. इयत्ता पहिलीसाठी चौदाखडी वही, लाईट फिटिंगच्या पट्ट्यांपासून शब्द सरक पट्टी, चढता उतरता क्रम मॉडेल, कागदी कप पासून शब्द फुले, दशक माळा, सुटे एकक, बोलक्या पताका, फिंगर पपेट्स, चित्रशब्द कार्ड, शब्द कार्ड, शब्दकोडे इ. शैक्षणिक साहित्य बनवले .

3) तयार केलेले शैक्षणिक साहित्य हाताळण्याची संधी विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त उपलब्ध करून दिली

- **तयार केलेले शैक्षणिक साहित्य :-**

मराठी. अक्षर कार्ड, शब्द पट्ट्या, सरकपट्टी, अक्षर लॉलीपॉप, चौदाखडी वही, शब्द वाक्य चक्र 'कागदी कप पासून बनवलेली शब्द फुले, शब्दकोडे, शब्द कार्ड

English Compound words, शब्द कार्ड, लेटर लॉलीपॉप, गार्डन ऑफ वर्ड्स, फ्रुट्स अँड व्हेजिटेबल्स

गणित अंककार्ड, बेरीज खेळ, दशक माळा व सुटे एकक, चढता -उतरता क्रम मॉडेल .

प. अभ्यास. बोलक्या पताका, बोलक्या भिंती, कडधान्य धान्य संग्रह

- **नवोपक्रमाची यशस्विता**

माझा नवोपक्रम 'स्वनिर्मित टिकाऊ शैक्षणिक साहित्यातून अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी करणे 'हा पूर्णपणे यशस्वी झालेला आहे .

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आठफाटा, तालुका बारामती, जिल्हा पुणे येथील 33 विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा खूपच फायदा झालेला आहे .






शैक्षणिक साहित्य प्रदर्शनास तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सन्माननीय श्री संपतराव गावडे साहेब यांची भेट

- **माझ्या नवोपक्रमाची उद्दिष्टानुरूप फलश्रुती पुढीलप्रमाणे :**

१)विद्यार्थ्यांसाठी स्वतः उपयुक्त, दर्जेदार शैक्षणिक साहित्य निर्मिती केली .

२)शैक्षणिक साहित्याचा वापर करून अध्यापन केल्यामुळे ते निश्चितच प्रभावी झाल्याचे दिसून आले .

३) माझ्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तनात उद्दिष्ट अनुरूप अपेक्षित बदल झाल्याचे दिसून आले .

४ ) शाळेमध्ये मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती केल्याने ते साहित्य शाळेस उपलब्ध झाले .

५ )या उपक्रमाचे इतर शिक्षकांनी अनुकरण केले. त्यामुळे त्यांच्या वर्गासाठी ही भरपूर साहित्य निर्मिती झाली .

- ***संदर्भग्रंथ :**


१. उपक्रम शील ते कडून कृती संशोधनाकडे - श्री . एस् . आर . माशाळे

२ . जीवन शिक्षण - ऑक्टोबर 2020



**सादरकर्ते : सौ. प्रितम संतोष सातपुते**


हुद्दा- M.A. D.Ed B.Sc.( appear) DSM उपशिक्षिका

शाळा- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आठफाटा, केंद्र :- आठफाटा तालुका :- बारामती, जिल्हा :- पुणे

U-DISE CODE :- 27250206602


तालुक्याचे गटविकास अधिकारी माननीय श्री बागल साहेब त्याचबरोबर बारामती तालुक्याचे तहसीलदार माननीय श्री गणेश शिंदे साहेब यांची शाळेला सदिच्छा भेट .





# चला रोखुया प्लास्टिकच्या भस्मासुराला..

**एक नया सवेरा लायेंगे...**
**हम मिलकर पुरे भारत को**
**प्लास्टिक मुक्त बनायेंगे..**

नवोपक्रमाची गरज व महत्त्व

आज पर्यावरणासंबंधी समस्यांनी सर्व जग त्रस्त झालेले आहे. जागतिक तापमान वाढ, ओझोन थराचा नाश,अवकाळी पाऊस, ऋतूतील अनियमित्ता, प्लास्टिक आणि ई-वेस्ट कचरा, नदी, समुद्र प्रदूषण या सर्व पर्यावरणविषयक समस्यांना आपण सामोरे जात आहोत. रस्त्यावर कचऱ्याचे ढिगच्या ढीग पडलेले दिसतात. कचऱ्याची विल्हेवाट ही एक मोठी समस्या आपल्यापुढे आहे. घरात रोज तयार होणाऱ्या कचऱ्याचे ओला कचरा व सुका कचरा असे विलगीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती झाली. परंतु आपल्या घरात शाळेत, गावात रोज निर्माण होणाऱ्या प्लास्टिक कचऱ्याचे काय?

प्लास्टिक पर्यावरणाल घातक आहे. त्याचे विघटन वर्षानुवर्ष होत नाही .त्यामुळे सागरी जिवांना धोका निर्माण झाला आहे, जमीन प्रदूषण होत आहे अशावेळी प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी प्लास्टिक कचऱ्याचे विलगीकरण, सिंगल युज प्लास्टिक न वापरणे, प्लास्टिकला विकल्प म्हणून इतर साधने वापरणे या सर्व गोष्टी विषयक जनजागृती जनसहभाग घेणे मला महत्त्वाचे वाटू लागले. जनजागरण हा कोणत्याही परिवर्तनाचा आधार असतो हे लक्षात घेऊन प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी प्लास्टिक कचरा व ई- कचरा यांचे पर्यावरणावरील दुष्परिणाम कमी करून पर्यावरण संवर्धन व संरक्षण यासाठी चला रोखूया प्लास्टिकच्या भस्मासुराला ...हा उपक्रम गाव पातळीवर, शाळा पातळीवर जनजागृती करून हाती घेतला..

- **नवोपक्रमाचे वेगळेपण-**

कचरा व्यवस्थापनात ओला कचरा व सुका कचरा वेगळा करणे, कंपोस्ट खत तयार करणे यावर भर दिला जातो. परंतु कचऱ्यातील जमा होणारे प्लास्टिक व इलेक्ट्रॉनिक कचरा, त्याचे पर्यावरणावरील दुष्परिणाम हा विषय दुर्लक्षिला जातो. म्हणूनच प्लास्टिकमुक्त भारत बनवण्याच्या दृष्टीने प्लास्टिक व ई कचऱ्याचे संकलन करून त्याचे विलगीकरण करणे, प्लास्टिक वापरास नकार देणे Refuse,प्लास्टिकला विकल्प म्हणून इतर साधने वापरणे, Reduce,पुनर्वापर करणे Reuse व त्यापासून इतर उत्पादन करणे Recycle या 4R संकल्पना शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये रुजवून विद्यार्थ्यांना, गावकऱ्यांना पर्यावरण स्नेही करण्यासाठी उपक्रम हाती घेतला

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे-**

1. विद्यार्थ्यांमध्ये प्लास्टिकचे पर्यावरणावरील दुष्परिणाम, सजीवांवर होणारे घातक परिणाम याबाबत जागरूकता निर्माण करणे.
2. विद्यार्थी पालक व नागरिक यांच्याकडून शाळा, घर व गाव पातळीवर तयार होणारा प्लास्टिक व ई कचऱ्याचे संकलन करणे व पुनर्वापराकरता देणे.
3. विद्यार्थी पर्यावरणस्नेही होण्याच्या दृष्टीने योग्य सवयी रुजवणे.प्लास्टिक वापरास नकार देणे, कमीत कमी प्लास्टिकचा वापर करणे, प्लास्टिकला विकल्प शोधणे, प्लास्टिक कचऱ्याचे संकलन व पुनर्वापर या 4R बाबत विद्यार्थ्यांना जागरूक करून कार्य योजनेत सामील करून घेणे.
4. विद्यार्थी, शिक्षक व पालक यांची निसर्गाशी जवळीक साधून पर्यावरण पूरक कार्यपद्धतीचा अवलंब करणे.

- **नवोपक्रमाचे नियोजन-**

घरात किंवा शाळेत कचरा डस्टबिन मधील कचऱ्याचे निरीक्षण केल्यास त्यात प्लास्टिकचा जमा होणारा दैनंदिन

कचरा मोठ्या प्रमाणात आढळतो. शाळेत जवळपास 300 विद्यार्थी असल्याने त्यांचा रोजचा खाऊ खाल्ल्यानंतरचा प्लास्टिक पिशव्यांचा कचरा हवाबंद प्लॅस्टिकची पाकिटे, चॉकलेटची वेष्टने शाळेत सर्वत्र पडलेली दिसायचे.भारतात दररोज 100 टन प्लास्टिक कचरा निर्माण होतो. अशा वेळी पर्यावरण गतिविधि संस्थेच्या लोकांशी चर्चा करून मी माझ्या शाळेत माझ्या कार्यक्षेत्रातील गावात प्लास्टिकच्या कचऱ्याच्या दुष्परिणामाबद्दल जनजागृती करण्याचे ठरवले.

- **नवोपक्रमाची कार्यवाही-**

उपक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यार्थी, पालक प्लॅस्टिक आणि इलेक्ट्रॉनिक कचरा व त्याचे पर्यावरणावरील, सजीवांवरील घातक परिणाम याबाबत अनभिज्ञ होते. शाळेत सर्वत्र प्लास्टिकच्या रॅपर्स, चॉकलेट, खाऊची वेष्टने इतरत्र कोठेही पडलेली दिसायची. जमीन प्रदूषण, जल प्रदूषण यामध्ये प्लास्टिक कचऱ्यामुळे कशी भर पडते याबाबत विद्यार्थ्यांना माहिती नव्हते.

प्रबोधन /जागृती-विद्यार्थ्यांना सातत्याने परिपाठात दररोज निर्माण होणारा प्लास्टिकचा कचरा व त्याचे पर्यावरणावरील घातक परिणाम याबाबत माहिती सांगितली. तसेच जागतिक पर्यावरण दिन 2023 ची थीम Solution to Plastic Pollution यावर भर देऊन जागृती केली. तसेच पालक सभा घेऊन पालकांशी देखील या विषयावर चर्चा करून त्यांचे प्रबोधन केले.

**१) व्हिडिओद्वारे जाणीव जागृती-**

प्लास्टिक कचरा त्यामुळे होणारे जमिनीचे प्रदूषण, प्लास्टिक कचरा नदी, समुद्रात जमा होऊन पाणी प्रदूषण कसे होते सागरी जीवन कसे धोक्यात येते याबद्दल मार्गदर्शनपर व्हिडिओ मुलांना वर्गनिहाय दाखवण्यात आला.

प्रश्नोत्तरे/ चर्चा तज्ज्ञांशी संवाद

PEHEL प्लास्टिक पुनर्वापर Recycle करणाऱ्या संस्थेच्या तज्ञांना आमंत्रित करून विद्यार्थ्यांशी प्रश्न उत्तराच्या माध्यमातून संवाद साधण्यात आला व त्यांना प्लास्टिकच्या दुष्परिणाम बद्दल जाणीव करून देण्यात आली.



**२) प्लास्टिक व ई कचरा संकलन मोहिमेबद्दल गावात जनजागृती-**

शाळेत व गावात प्लास्टिक व ई कचरा संकलन अभियानाचे पोस्टर जागोजागी लावून जनजागृती केली.

शाळेमध्ये पालक सभा आयोजित करून प्लास्टिकचा वाढता वापर व त्याची योग्य विल्हेवाट करण्याविषयी उदासीनता यामुळे पर्यावरणाला निर्माण झालेला गंभीर धोका या विषयावर प्रबोधन व जागृती करण्यात आली.

ई कचरा किंवा इलेक्ट्रॉनिक कचऱ्यामध्ये बॅटरी, संगणकाचे भाग, तारा कोणत्याही प्रकारचे विद्युत उपकरण, इलेक्ट्रॉनिक खेळणी, रिमोट, घड्याळे, सेलफोन बल्ब ट्यूबलाइट्स यांचा समावेश होतो.

**३) चित्रकला स्पर्धेचे आयोजन-**

पर्यावरण संवर्धन विषयावर शाळेत स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन व संरक्षण विषयावर

चित्रकलेच्या माध्यमातून मुक्त अभिव्यक्त होण्याची संधी दिली.

**४) 4R तंत्राचा अवलंब-**

Refuse- सिंगल युज (एकल वापर) प्लास्टिक वापरू नये यासाठी जागृती निर्माण केली.

Reduce- प्लास्टिक पिशवीचा कमीत कमी वापर करून भाजी, किराणा आणण्यासाठी कापडी पिशवीचाच वापर करण्याचे विद्यार्थी व पालकांच्या मनावर बिंबवले.

Reuse- प्लास्टिकच्या बाटल्यांचा वापर रोपे लावण्यासाठी करणे, वर्गात शाळेत खाऊ खाल्ल्यानंतरचे प्लास्टिक रॅपर्स चॉकलेटचे वेष्टने आणि इतर प्लास्टिक बाटल्या, पिशव्या शाळेतील व्हरांड्यात वेगळे पोते लावून जमा करण्यासाठी सुरुवात केली. इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत सर्व विद्यार्थी प्लास्टिक डस्टबिन मध्ये न टाकता स्वतंत्रपणे पोत्यात जमा करू लागले. सर्व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

Recycle- दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी शाळेत जमा झालेले प्लास्टिक व ई कचरा, तसेच गावातील नागरिक,पालक घरी देखील प्लास्टिक कचरा वेगळा जमा करून महिन्याच्या शेवटच्या रविवारी संकलन केंद्रामध्ये आणून देऊ लागले असा जमा झालेला सर्व प्लॅस्टिक व ई कचरा पुनर्वापरासाठी देण्याचे व्यवस्था करण्यात आली.

**५) कागदी पिशवी निर्मिती कार्यशाळा-**

**कापडी /कागदी पिशवी घरोघरी**
**पर्यावरणाचे रक्षण करी...**

12 जुलै रोजी world Paper bag day त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणासाठी प्लास्टिक पिशवीच्या वापरा ऐवजी कागदी पिशवी वापरण्यास प्रोत्साहित केले. इयत्त चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना कागदी पिशवी कशी बनवावी याचे प्रात्यक्षिक दाखवून कागदी पिशव्या विद्यार्थ्यांकडून तयार करून घेतल्या.

**६) राष्ट्रीय छात्र पर्यावरण प्रतियोगिता 2023 सहभाग-**

राष्ट्रीय पर्यावरण स्पर्धेत भाग घेतल्याने पर्यावरण संरक्षण, प्लास्टिक प्रदूषण याबाबत जागृती निर्माण झाली व विद्यार्थ्यांना केंद्रीय शिक्षा मंत्रालयाकडून ऑनलाइन प्रशस्तीपत्रक प्राप्त झाले. शाळेतील जवळपास पहिली ते पाचवीच्या 40 व सहावी, सातवीच्या 35 विद्यार्थ्यांना राष्ट्रीय छात्र पर्यावरण प्रतियोगिता 2023 चे प्रशस्तिपत्रक प्राप्त झाले.



**७) इको ब्रिक्स तयार करणे-**

पॉलिथिन, प्लास्टिक यांचे नियमन करण्यासाठी इको ब्रिक्स हा पर्याय विद्यार्थ्यांपुढे ठेवण्यात आला. इको ब्रिक्स तयार करण्यासाठी प्लॅस्टिकच्या रिकाम्या बाटल्यांमध्ये पॉलिथिन, औषधांची वेष्टने आणि चॉकलेट चिप्सची वेष्टने सर्व घट्ट बसेल अशी बाटली भरून इको ब्रिक्स तयार करून घेतले.

**८) माझा प्लॅस्टिकचा खाऊ-**

शाळेमध्ये माझा प्लॅस्टिकचा खाऊ या नावाने एक बॉक्स बनवण्यात आला. यामध्ये वापरून झालेले फेकून द्यावयाचे पेन, रिफील, टोकयंत्र खराब झालेले

प्लास्टिक पट्टी या बॉक्समध्ये जमा करण्याबाबत विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती करण्यात आली. कारण अशा छोट्या छोट्या प्लास्टिकच्या वस्तू सहजपणे कचऱ्यात जात होत्या. प्लास्टिक वस्तूंचे असे कलेक्शन रिसायकलिंग साठी नंतर देण्यात येते.

**९) Say NO to Plastic-**

प्लास्टिक मुक्त भारत संकल्पना प्रत्यक्षात यावी यासाठी प्लास्टिकला विकल्प म्हणून इतर वस्तू आपण कशा पद्धतीने वापरू शकतो याबाबत प्रात्यक्षिक व उदाहरणे देण्यात आली. जसे की पेन स्टँड, प्लास्टिक कंपास पेटी पेन, प्लास्टिक बाटल्या, सिंगल युज प्लास्टिक टाळून इतर वस्तूंचा वापर करणे.

**१०) दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी प्लास्टिक,ई -वेस्ट कचरा संकलन मोहीम-**

वापरलेल्या प्लास्टिकच्या वस्तूचे संकलन करणे व संकलित केलेल्या प्लास्टिक व प्रक्रिया करून नवीन वस्तू तयार करणे म्हणजेच पुनर्वापर ही बाब पर्यावरणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असल्याने घरोघरी, गावातील नागरिकांनी विद्यार्थ्यांनी शाळेत वेगळा जमा केलेला प्लास्टिक व ई-वेस्ट कचरा संकलन मोहीम शाळेत दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी राबवण्यात येते व जमा झालेला प्लॅस्टिक व इलेक्ट्रॉनिक कचरा पुर्नवापरासाठी पर्यावरण दक्षता कृती मंच यांच्याकडे देण्यात येतो.

- **नवोपक्रमाची यशस्विता-**

i. विद्यार्थी, पालक प्लास्टिकच्या पर्यावरणावरील दुष्परिणाम, सजीवांवर होणारे घातक परिणाम या बाबत जागरूक होतात.
ii. विद्यार्थी पॉलिथिनचा कमीत कमी वापर करतात प्लास्टिकला विकल्प शोधून कागदी /कापडी पिशवी पर्यायांचा अवलंब करतात.
iii. विद्यार्थी व पालकांकडून शाळेत व घरी तयार होणाऱ्या प्लास्टिक व इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचे स्वतंत्रपणे संकलन करून संकलन केंद्रात जमा करतात.
iv. विद्यार्थी पर्यावरण स्नेही कृतींचा अवलंब करून योग्य सवयीद्वारे आचरणात बदल करून निसर्गाशी जवळीक साधतात .

विद्यार्थ्यांमध्ये प्लॅस्टिक पिशव्या, चॉकलेटची वेष्टने डस्टबिनमध्ये न टाकता स्वतंत्रपणे जमा करण्याची सवय अंगी रुजली आहे. त्यांच्या मनामध्ये ही कृती रुजल्याने घरी देखील विद्यार्थी पालकांना सांगून स्वतंत्रपणे प्लास्टिक कचरा वेगळा करतात व इतरांना देखील करण्यास सांगतात.

- **स्थानिक वृत्तपत्रांनी उपक्रमाची घेतलेली दखल:-**

पुढारी व लोकमत या स्थानिक वृत्तपत्रांनी उपक्रमाची दखल घेऊन 'पर्यावरणासाठी विद्यार्थ्यांचा हातभार' व 'कोंढवे धावडे येथे प्लास्टिक आणि ई-वेस्ट संकलन केंद्र सुरू' या मथळ्याखाली उपक्रमाला प्रसिद्धी दिली.

- **नवोपक्रमाचा समारोप-**

विद्यार्थ्यांना प्लास्टिक कचरा व इलेक्ट्रॉनिक कचरा पर्यावरणाला घातक आहे याबाबत जागृती नव्हती. अशा वेळेस विद्यार्थ्यांच्या मनात निसर्गाबद्दल जिव्हाळा कसा निर्माण करावा या समस्येने मी अस्वस्थ होते .या नवोपक्रमाच्या कार्यवाहीनंतर माझी अस्वस्थता दूर झाली. माझ्या नवोपक्रमाच्या दरम्यान चांगले परिणाम दिसून आल्याने याबाबत मी समाधानी आहे.. विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक अशा चांगल्या सवयी लागल्या . त्यांच्या आचरणात व कृतीत बदल होऊन भविष्यामध्ये नक्कीच पर्यावरणाच्या समस्या कमी होतील असा आशावाद नक्कीच वाटतो..

**सादरकर्ते -पल्लवी रमेश शिरोडे.**
शाळा - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोंढवे धावडे
तालुका- हवेली. जिल्हा- पुणे

# ‘पालकांचा कृतियुक्त अध्ययनात सहभाग’

## • प्रस्तावना

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा 2022 मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या घटकांपैकी पालक सहभागाचा विद्यार्थ्यांच्या /पाल्याच्या अध्ययनातील सहभाग यास महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. त्यामध्ये बाल्यवस्थेतील काळजी व शिक्षण हा घटक पालकांच्या सहकार्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही हे अधोरेखित झाले आहे .

पालकांना पाल्याच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून दिल्यास, पालकांच्या मदतीने विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक वाढविता येते. शाळेचा वेळ सोडून सकाळी व संध्याकाळी पालकांच्या मदतीने विद्यार्थी घरी अध्ययन करू लागतात. मुलांची अभ्यासाची ओढ व आवड पाहून पालकही त्यात सहभागी होऊ लागले. तीन ते दहा वर्ष पर्यंतच्या विद्यार्थ्यांना परिसर, निसर्ग, समाज व कुटुंब यातून शिक्षणाचे खूप उत्तम अध्ययन अनुभव पालकांच्या मदतीने उपलब्ध होऊ शकतात . त्यांच्या अध्ययन प्रक्रियेला उत्तम गती मिळू शकते . पालक व शिक्षक यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचे ' शिकणे आणि जगणे ' ( learning & living ) उत्तम प्रकारे घडू शकते .

## • नवोपक्रमाची गरज व महत्त्व

विद्यार्थ्यांचा शाळेत शिकलेल्या संकल्पनांचा सराव होणे आवश्यक असते. शालेय वेळेत हे शक्य होत नाही. घरी सराव झाल्यास त्या संकल्पनांचे दृढीकरण होते. विद्यार्थी प्रत्यक्ष कृतीतून या संकल्पना शिकतात.पालक, कुटुंबीय सुद्धा आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना सूचना देऊन कृती करून घेतात. घर,परिसरात अध्ययन समृद्ध वातावरण व सातत्यपूर्ण मार्गदर्शनाचा स्रोत यामुळे मुलांच्या अध्ययनात मनोरंजकता येऊन त्यांना स्वयं -अध्ययनाची सवय लागते. द्विशिक्षकी शाळेत शैक्षणिक उपक्रमात पालकांची मदत होते. शाळा पालक समाज एकत्र येतो. चांगले शैक्षणिक वातावरण तयार होण्यास मदत होते. शाळेतील उपक्रमांची माहिती पालकांपर्यंत पोहोचते. पालकांच्या सूचनांचा स्वीकार करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया व शाळेतील भौतिक सुविधा अधिक समृद्ध करता येतात. अध्ययनातील रुची वाढल्यामुळे विद्यार्थ्यांचा मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान ( FLN ) हे उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होते.

## • नवोपक्रमाची उद्दिष्टे :

१ .विद्यार्थ्यांच्या कृतियुक्त अध्ययनात पालकांचा सहभाग वाढविणे .
२.पालक व पाल्यांकरिता कृती कार्यक्रमांचे विकसन करणे .
३.इयत्ता पहिली ते चौथीच्या पाल्य - पालकांसाठी निश्चित केलेल्या कृती कार्यक्रमाची परिणामकारकता तपासणे .

## • नवोपक्रमाचे नियोजन

**अ . उपक्रम पूर्वस्थिती चे निरीक्षण -**

१. शैक्षणिक वर्ष २०२१ – २२ मध्ये शाळा सुरू झाल्यानंतर कोविडच्या पार्श्वभूमीवर मुलांची अध्ययन पातळी अतिशय खालावलेली होती.
२. मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्या वाचन,लेखन, संख्याज्ञान,गणन यासारख्या अध्ययन क्षमताचा ऱ्हास झालेला होता/ विसर पडलेला होता.
३. सर्व विद्यार्थी अध्ययन अध्यापन प्रक्रियेपासून दीर्घकाळ वंचित राहिल्यामुळे अध्ययनातील रूची व त्यामधील सातत्य कमी झालेले होते .

**आ .उपक्रम सुरु करण्यापूर्वी केलेल्या कृतींचा क्रम: -**

१) पालक सभा

२) माता पालकांच्या गटांची निर्मिती

३) शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा

४) घरोघरी समृद्ध अध्ययन कक्ष

५) पालकांना अध्ययन अध्यापन पद्धती विषयी गृहभेटी द्वारे मार्गदर्शन .





सर्वप्रथम ABL अध्यापन पद्धतीनुसार विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी घेऊन त्यानुसार त्यांचा अध्ययन स्तर निश्चित करण्यात आला. १ ते ४ वर्गांचे ए.बी .सी .डी . ई या पाच बहुस्तर अध्ययन गटात विभाजन करण्यात आले . प्रत्येक विद्यार्थ्याच्या अध्ययन स्तरानुसार पालकांसाठी भाषा, गणित विषयांची शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा घेऊन विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य तयार करण्यात आले. पालकांच्या मदतीने टाकाऊ पासून टिकाऊ असे मोठ्या संख्येने शैक्षणिक साहित्य शाळेत तयार करून विद्यार्थ्यांच्या घरी अध्ययन कक्षामध्ये देण्यात आले. अध्ययन कक्षामधील किंवा घरामधील भिंतीवर अध्ययन विषयक तक्ते, चित्रे, कोडी, पाढे, चित्ररूप तक्ते, सूत्रे लावण्यात आली. गणित विषयक मॉडेल बनवण्यात आली. त्यामध्ये तराजू, घड्याळ प्रतिकृती, अंक व अक्षर ठोकळे, अक्षर संच,भौमितिक आकार इत्यादींचा समावेश होता.

- **नवोपक्रमाची कार्यवाही**

'कृतिशील शिक्षणात पालकांचा सहभाग ' या उपक्रमात कुटुंब, समाज यांचा सहभाग महत्त्वपूर्ण असल्याने त्यांची परवानगी घेणे महत्त्वाचे होते . यामध्ये विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारणार असल्याने सर्व पालक वर्ग व शालेय

व्यवस्थापन समिती त्यासाठी तयार होती .

१) पालकांच्या मदतीने शैक्षणिक साहित्य निर्मितीची कार्यशाळा आयोजित करून शैक्षणिक साहित्य निर्मितीचे मार्गदर्शन केले .

२) घरामध्ये समृद्ध अध्ययन कक्ष निर्माण करण्यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य मॉडेल, कार्ड, तक्ते, अक्षर व अंक संच, अंक व अक्षर ठोकळे इत्यादी शाळा स्तरावरून पुरवण्यात आले .

३) जुलै २०२२ ते सप्टेंबर २०२२ या कालावधीत सर्वच मुलांचे अध्ययन कक्ष उत्तम प्रकारे तयार झाले .

४) कृतियुक्त शिक्षणात पालकांचा सहभाग या उपक्रमांतर्गत पालकांच्या मदतीने विविध क्षेत्रभेटी, रेशीम उद्योग, पॉलिहाऊस, परिसर सहल, वनविहार, ॲग्रो टुरिझम इ. विविध कला, क्रीडा- कौशल्यांचे धडे विद्यार्थ्यांना देण्यासाठी पालक व माजी विद्यार्थी यांनी शाळेत येऊन हा उपक्रम राबविण्याबाबत आराखडा तयार केला.

५) शालेय पोषण आहार (अन्नपूर्णा उपक्रम) उपक्रमात पालक सक्रीय सहभागी असल्यामुळे शालेय पोषण आहार योजनेतून सर्व विद्यार्थ्यांना सकस आहार नियमितपणे मिळण्यासाठी वर्गनिहाय माता- पालक भेटीचे नियोजन करण्यात आले .

**माहितीचे विश्लेषण -** 'कृतियुक्त शिक्षणात पालकांचा सहभाग ' हा उपक्रम पाल्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार मुलांची अध्ययन प्रक्रिया अधिक सुलभ होण्यासाठी समुदाय आणि कुटुंबाचा सहभाग महत्त्वाचा आहे . पालक हा पाल्यांसाठी सुविधाकर्ता असल्यामुळे शाळेत ज्याप्रमाणे शिक्षक असतो त्याप्रमाणे घरात पालकांची भूमिका असते. सदर उपक्रमामुळे घरामध्ये अध्ययन पूरक समृद्ध वातावरण तयार झाल्यामुळे विद्यार्थ्यांना पुन्हा कृतीतून शिकण्याची संधी प्राप्त झाली .

- **नवोपक्रमाची यशस्विता-**

**अ. विद्यार्थ्यांच्या कृतियुक्त अध्ययनात पालकांचा सहभाग वाढवणे.**

सदर उपक्रमाचे प्राथमिक स्वरूपातील उद्दिष्ट पालकांच्या अध्ययनातील सहभागामध्ये वाढ होणे हे होते. सदर उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पालक मेळावे, गृहभेटी, पालक समुपदेशन या सारख्या उपक्रमातून पालकांना अध्ययनाचे महत्त्व पटवून दिल्यामुळे पालकांचा पाल्याच्या अध्ययनातील सहभागामध्ये वाढ होऊ लागली.

**ब. पालक व पाल्यांकरिता कृती कार्यक्रम विकसित करणे : -**

समृद्ध अध्ययन कक्ष निर्माण करणे, गृहभेटीद्वारे पालकांना मार्गदर्शन करणे, शैक्षणिक साहित्य निर्मिती कार्यशाळा, विद्यार्थ्यांना शैक्षणिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचा नियमित पुरवठा, वाचन कक्ष निर्मिती, अन्नपूर्णा उपक्रमातील पालकांचा सहभाग या सर्व कृतींचे उत्तम प्रकारे नियोजन करून अंमलबजावणी करण्यात आली .

**क. इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थी व पालकांसाठी निश्चित केलेल्या कृतीची परिणामकारकता तपासणे-**

सदर नवोपक्रमासाठी निवडण्यात आलेल्या विविध कृतींचे विकसन करून त्यांची परिणामकारकता तपासण्यात आली.

१) कृतिशील शिक्षणात पालकांचा सहभाग या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांच्या घरी समृद्ध अध्ययन कक्ष तयार झाल्यामुळे पालकांच्या मार्गदर्शनाखाली सुट्टीत व सायंकाळच्या वेळी अध्ययन विषयक समृद्ध अध्ययन अनुभव मिळू लागले. विद्यार्थी अभ्यासात गुंतून राहिल्यामुळे त्यांच्या अध्ययनात सातत्य वाढले.आपल्या पाल्यात समाधानकारक प्रगती दिसून आल्यामुळे पालक वर्गातही समाधान दिसून आले.

२) नवोपक्रमाचा कालावधी पूर्ण झाल्यावर देखील पालक स्वत: पाल्यांचा अभ्यास तपासून पुढील अभ्यास देऊ लागले. त्यामुळे संबंधित पाल्य त्यांच्या घरातील अध्ययन कक्षात गुंतून राहून अध्ययन करू लागले. या उपक्रमाबद्दल पालकांचा दृष्टिकोन सकारात्मक तयार झाला .

३) ग्रंथ आपुल्या दारी उपक्रमामुळे समाज - कुटुंबात 'वाचन चळवळ ' समृद्ध होण्यास मदत झाली .

४) माजी विद्यार्थी संघ व पालकांच्या अध्ययन अध्यापनातील सहभागामुळे विविध कलाक्रीडा विषयक कौशल्ये, अध्ययन अनुभव शालेय विद्यार्थ्यांना सहज मिळू लागले. त्यामुळे मुलांची अध्ययनातील गोडी वाढली .

५) शाळेतील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत सुरु करण्यात आलेल्या ' अन्नपूर्णा ' उपक्रमामुळे सर्व विद्यार्थ्यांना दररोज सकस व चवदार आहार मिळू लागला आहे. डॉक्टर असलेल्या माजी विद्यार्थ्यांकडून शालेय विद्यार्थ्यांची नियमित मोफत आरोग्य तपासणी केली जाते व गरजेनुसार औषधे उपलब्ध करून दिली जातात .

## • नवोपक्रमाचा समारोप

'पालकांचा कृतियुक्त अध्ययनात सहभाग' हा उपक्रम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टेमगिरवाडी मध्ये प्राथमिक स्तरावर राबविल्यानंतर त्याची यशस्विता लक्षात आली. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडून येण्यासाठी व त्यांची शैक्षणिक संपादणूक वाढण्यासाठी सदर उपक्रम उपयुक्त आहे.

या उपक्रमामुळे पालकाचे पाल्याच्या अध्ययनातील स्थान अधोरेखित झाले. शिक्षक, पालक व कुटुंब यांच्या भागीदारीतून विद्यार्थ्यांचे अध्ययन उत्तम घडू शकते हे लक्षात आले. पालक, कुटुंबाच्या मदतीने पाल्याच्या अध्ययन विषयक अडचणी बाबत उपाययोजना करता आल्यामुळे पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान ( FLN ) ची कौशल्ये विकसित होण्यास मदत झाली. द्विशिक्षकी शाळेत एक शिक्षक रजेवर असले किंवा प्रशासकीय कामात गुंतले असले तरीही पालकांच्या सहभागामुळे विद्यार्थ्यांचे अध्ययन सुरु राहिले. त्यामुळे अध्ययन प्रक्रिया खंडित न होता द्विशिक्षकी शाळेत सुद्धा पालकांच्या मदतीने मुलांची गुणवत्ता वाढविण्यास मदत झाली.

## • संदर्भसूची

१) NCERT-2019-पूर्व प्राथमिक अभ्यासक्रम

२) निष्ठा प्रशिक्षण(CPD कोर्स)
मॉड्युल क्रं – 4
FLN साठी पालक आणि समाज सहभाग

३) राष्ट्रीय शिक्षण धोरण- 2020 प्रस्तावना(पृ.क्र. ५)धोरणाची तत्त्वे संकल्पना(पृ.क्रं.६)

४) राष्ट्रीय शिक्षण धोरण – 2020भाग शालेय शिक्षण (पृ. क्रं. ३.७)अनुभवात्मक शिक्षण(मुद्दा क्रं ४.६)

**सादरकर्ते- श्री. रामकृष्ण देवराम वाटेकर**
शाळा- जि. प . प्राथमिक शाळा टेमगिरवाडी
केंद्र - काळुस ता .खेड जि. पुणे .

# रेषांनी दिला मुलांच्या आवडीला ...3-D आकार...

## • प्रस्तावना

विद्यार्थ्यांची ज्ञानाची भूक ही कायमच मोठी असते. शिक्षणाच्या ज्योतीतून अज्ञानाचा अंधार दूर करत नवभारताची सुशिक्षित पिढी घडवणारे आपले हात... मग आपले हात सशक्त अन नाविन्यपूर्ण तर असायला हवेतना... रोजच्या गोष्टीत, शिक्षणात तोच तोचपणा आला की, शिक्षणही निरस व कंटाळवाणे वाटू लागते. मग मुलांच्या आवडींना थोडासा वाव दिला की, मुले पुन्हा एकदा नव्या दमाने तयार होतात आव्हाने झेलायला, आणि मग हिरे चमकावेत ना तसे त्यांचे तेजस्वी डोळे या अनोख्या आनंदाने चमकतात.

यावर्षी माझ्याकडे इयत्ता चौथीचा वर्ग आला. तिसरीपर्यंत अगदी बोलकी अभ्यासात तरबेज असणारी ही मुले. अभ्यासातील प्रगतीची मला खात्री होती पण अभ्यासाबरोबरच चित्रकला, कागदकाम, शारीरिक शिक्षण अशा सर्व क्षेत्रात ती अशीच पुढे असावीत हा माझा ध्यास. मुलांना चित्रकलेची मुळातच फार आवड असते ही आवड लक्षात घेऊन हा उपक्रम निवडण्याचे मी ठरविले. जून महिन्यात शाळा सुरू झाली. चित्र काढा म्हटलं की त्यांच्या आवडीची चित्र ती काढायची पण त्यात साचेबद्धपणा नव्हता. सारखेपणा नव्हता. हाच साचेबद्धपणा त्यांच्या अंगी येण्यासाठी हा नवोपक्रम मला उपयोगी पडला.


मला आनंद याचा आहे की, मुलांनीच काढलेली चित्रे पुन्हा तीच 3D चित्रे पाहताना मुले आंनदून जात होती. "मॅडम किती सोप्पं असत हो चित्र ! “ हे त्यांचे शब्द मनाला सुखावून जायचे. आणि विशेष म्हणजे प्रत्येक वर्गात चांगले चित्र काढणारे..., न काढणारे अशी दरी असते. मात्र माझ्या या नवोपक्रमाने ही दरी मिटली. हे मात्र नक्की... फक्त रेषांच्या साहाय्याने 3D संकल्पना त्यांना खूप आवडली. मग चित्रकला तासाची उत्सुकता लागणार हे नक्कीच ना....

## • नवोपक्रमाची गरज व महत्त्व

स्वप्नांना आशेचे पंख देऊन आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य हे प्रत्येक शिक्षकांत असायला हवे. अभ्यासाबरोबर मुलांच्या आवडीनिवडी ही तितक्याच महत्वाच्या ... माझ्या वर्गातील मुले खेळकर, दंगाखोर मात्र अभ्यासातही तितकीच हुशार मात्र त्यांना सतत नवीन गोष्टी करायला आवडतात. मग त्या नवीन गोष्टी त्याचा अध्यापणसाठी उपयोग याची सांगड घालण्याची मोठी जबाबदारी माझ्यावर ...

अभ्यास करणारे रोबोट मला तरी बनवायचे नव्हते. त्यामुळे मुलांना कोणकोणत्या गोष्टी आवडतात यासाठी मी एक प्रश्नावली तयार केली. तुम्हाला काय काय करावेसे वाटते आणि त्यावर त्यांची उत्तरे मी घेतली. कुणाला वेगवेगळे प्रयोग





करायला, कुणाल खेळ खेळायला, कुणाला गाणी म्हणायला पण प्रत्येक मुलाच्यात मला एक गोष्ट समान दिसली. ती म्हणजे चित्र काढायला...

इयला १ लीते ३ री पर्यंत त्यांनी खूप सारी चित्रे काढली होतीच, पण 'मॅडम तुम्ही स्क्रीनवर आम्हाला दाखवता ना तशी आम्हाला, इतकी सुंदर चित्र काढता येतील का हो ? हा त्यांचा प्रश्न हीच माझ्या नवोपक्रमाची पहिली गरज होती. जून 23 महिना मुलांना सुट्टीमधून शाळेच्या प्रवाहात अभ्यासाकडे केंद्रित करण्यास गेला. मात्र जूलै 23 महिन्यापासून खऱ्या अर्थाने मी या उपक्रमाला सुरुवात केली. मुलांची आवड जोपासणे आणि शाळेत अभ्यासाची गोडी लावण्यासाठी आणि त्यांची नाविन्यतेची भूक शमविण्यासाठी हा उपक्रम राबिवण्याचे मी ठरविले.

- **उपक्रमाचे वेगळेपण -**

चित्रकला ही सर्व शाळांमध्ये शिकवली जाते घेतली जाते. मी ही इतके वर्ष घेत होतेच, मात्र साध्या शिसपेन्सिलच्या रेषांच्या साहाय्याने 3D संकल्पना, कागदावर साकारताना मुलांच्या चेहऱ्यावरचा अफलातून आनंद हेच या उपक्रमाचे वेगळेपण आहे. कारण 'आम्ही एवढे सुंदर 3D चित्र काढलं यावर त्यांचा सुद्धा विश्वास बसत नव्हता.

शाळेच्या शोकेसमध्ये ही चित्र लावल्यामुळे बाकीच्या मुलांनाही याबद्दल उत्सुकता वाटू लागली.

विद्यार्थ्यांची पुढील आठवड्यांत कोणते चित्र घेणार याची उत्कंठा वाढली. साहजिकच १००% उपस्थिती आणि अभ्यास पूर्ण असेल तरच चित्र यामुळे नव्या जोमाने मुले अभ्यासात व उपस्थित राहम्यात सरसावली.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे-**

१) विद्याथ्याना पेन्सिलच्या साहाय्याने " 3D " चित्रांच्या नवनिर्मितीचा आनंद देणे.

२) मुलांच्या मधील उत्सुकतेला पोषक वातावरण निर्मिती करणे.

३) आवडीच्या गोष्टीतून अभ्यासातील सातत्य व उपस्थिती टिकवणे.

४) एकविसाव्या शतकातील 3D तंत्रज्ञानासाठी मुलांना तयार करणे.

## • नवोपक्रमाचे नियोजन

अंकांपासून अक्षरांपासून अशी वेगवेगळी चित्रे मी मुलांना काढायला शिकवले होते. मात्र सहजच DG चैनल वर मला थ्रीडी पिक्चर्स पाहायला मिळाले. मी स्वतःचे चित्र प्रथम काढून मुलांना शाळेत दाखवले. मुलांना ते खूप आवडले "मॅडम, आम्हाला शिकवा ना !" ती त्यांची मागणी होती. त्यासाठी जुलै महिन्यापासून या उपक्रमाला सुरुवात केले आणि वार निवडला शनिवार..

पेन्सिल हे सहज सर्वांकडे उपलब्ध असणारी गोष्ट. "थ्रीडी" चित्रे यांचा संग्रह प्रथम मी करून वर्गात लावला. मुलांची आश्चर्यकारक नजर मी दररोज पाहायची पण त्यांना मी शनिवारी चित्र शिकवणार असल्यामुळे मुले शनिवारची वाट पाहू लागली. "थ्रीडी" संकल्पना समजण्यासाठी प्रथम त्यांची माहिती करून घेतली.




## • नवोपक्रमाची कार्यवाही

पेन्सिलच्या साहाय्याने 3D चित्रे साकारणे ही पध्दत आणि मुलांची आवड यामधील सांगड घालणारा दुवा म्हणजे स्टेप बाय स्टेप कराव्या लागणाऱ्या कृती व पेन्सिलचा योग्य वापर, त्याच बरोबर 3 D साठी लागणाऱ्या पेन्सिलची निवड.प्रथमदर्शनी आपल्याला जमेल का ? हे चित्र हा विचार एक चित्र पूर्ण झाल्यानंतर मुलांना कधी पडलाच नाही.प्रथम भौमितिक आकार वापरून रेषांच्या साहाय्याने अगदी साधे सोपे असणारे 3D चित्र मी मुलांना दाखवले. आता प्रत्येक स्टेप मुलांना माझ्या बरोबर करायला सांगितली.कळीचे ज्याप्रमाणे फुलांमध्ये रूपांतर होते ना तसे चित्राची एक-एक पायरी पूर्ण झाल्यावर मुलांचे चेहरे खुलू लागले. आणि चित्र पूर्ण झाल्यावर तर 3D चित्राची अनुभूती ही तर त्यांच्यासाठी चमत्कार होता. त्यामुळे दर शनिवारी मुलांच्या आग्रहाने 2 चित्र शिकवणे मला भागच पडले.....



## • नवोपक्रमाची यशस्विता

अवघड गोष्ट सोपी होऊन आपल्या समोर यावी ना असा अनुभव मुलांनी घेतला.
3D चित्र वहीवर साकारताना मुलांच्या मनातील मनातील 3D चित्र काढण्याची भीती केंव्हा पळून गेली. कळले

सुध्दा नाही.विशेष म्हणजे दर शनिवारी सगळेच वर्ग 4 थी वर्गा बरोबर 3D चित्र काढायला बसू लागले.आवडीची गोष्ट करायला मिळू लागली, नवनिर्मिती घडू लागली. यामुळे मुले आनंदी तर होतीच त्याबरोबर अभ्यासातही एकाग्र दिसून आली.3D चित्रामुळे सर्व मुले एकाच स्तरावर आली. कारण चित्रामुळे त्यांच्यातील आत्मविश्वास जागा झाला.पालकांनाही मुलांच्यातील हा फरक जाणवला आणि मुलांनी काढलेले चित्र पालकही पाहू लागले फोटो काढून स्टेटसला ठेवू लागली.

- **नवोपक्रमाचा समारोप**

चित्रकलेच्या वह्या महिनाभरातच संपल्या आणि नवीन वह्या मुलांनी क्षणाचाही विलंब न करता पालकांना आणायला लावल्या आणि पालकांनी कोणताही विलंब न लावता मुलांना वह्या उपलब्ध करून दिल्या यातच या उपक्रमाची यशस्विता दिसून आली. पूर्वीच्या वह्या आणि आताच्या वह्या यात खूप फरक आहे.या 3 D पेंटिंग उपक्रमातून मुलांना काही दिल्याचा आनंद मात्र नक्कीच मनाला भावणारा आहे.

- **संदर्भग्रंथ.**


**जीवन शिक्षण मासिक.**

१) राज्य शैक्षणिक संशोधन व परिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे. -माहे जुन २०२२ ते. नोव्हेंबर 2023

२) उपक्रमशीलतेकडून कृतिशीलतेकडे - सिधराम माशाळे अभिषेक प्रकाशन.

३) दिशा नवोपक्रमाच्या संपादक - शै. संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे.


**परिशिष्ट**

1) You Tube channel Link 1) https://youtu.be/KH-D9xAE0ZQ?si=fP2bLqrGZ84aAjZS

2)https://youtu.be/kEvK0zl531k?si=Pdi5M6CucKCL0YYr

3) https://youtu.be/YWNGcvY2QLo?si=AJCNc9GpvmH1Lh4U

4) https://youtu.be/6IFZkvc7DHk?si=nFTvHR1q0u_nDnco

5) https://youtube.com/shorts/0BNO-KUDis4?si=Ljo_rvDoxaEsnKxw

6) https://youtu.be/qI9toxl9LQ8?si=dSb9nZAGJAFpL29m

Winoba App Link

https://tickli.in/lrvxoth688633 /https://tickli.in/ldbhoth102375

https://tickli.in/lndvoth518665 / https://tickli.in/Irvwoth688923

https://tickli.in/Iwbkart803784 /https://tickli.in/Ioauoth508675

https://tickli.in/Indvoth518665 /


**सादरकर्ते- सौ.दीपाली मिलन साळुंके**

हुद्दा-शिक्षिका

शाळा- जिल्हा परिषद शाळा, उंडवडी, सुपे,पुणे

# Colours of Unity : Discovering neighbours & Their Symbols

- **Need and Importance of Innovation :**

In the mosaic of global cultures, it's vital for young students to explore neighbouring countries, fostering connections and appreciation for diversity. Tailored for vibrant third-graders, this activity delves into the cultures of India's neighbouring nations—Bangladesh, Pakistan, Sri Lanka, China, and Nepal, emphasising national symbols like flags and animals. Aligned with grade 3 curriculum objectives, it promotes understanding of our interconnected world. Early exposure to diverse perspectives cultivates empathy and global awareness. Through collaboration with Himachal Boarding School in Nepal, students delve into shared experiences, transcending borders. This partnership enriches learning, fostering mutual understanding and cultural appreciation. Our goal is to shape young minds into global citizens equipped for a connected world. Together, we embark on a journey of shared knowledge, enriching cultural experiences, and enduring connections.

- **Objectives of Innovation**

1) To develop Cultural Awareness of Foster understanding of neighbouring countries' identities like Pakistan, Nepal, Sri lanka, China and Bangladesh.
2) For Geographical Knowledge Enhancement to Explore flags, national animals and fruits for diverse landscape understanding.
3) To develop the Action Plan for exploration of the National flags, national animals and national fruits to neighbouring countries like Pakistan, Nepal, Sri lanka, China and Bangladesh.
4) To Collaborate with Himachal Boarding School in Nepal and create a platform for cultural exchange and insights.
5) Enrich overall learning experience for globalised society navigation.

- **Planning and proceedings of the innovation**

**3.1 Action Plan**

## Table no. 1: ART INTEGRATED ACTION PLAN

| Description | Month and duration activity | Country Coverded | Subject Covered | Evaluation methods to measures the learning outcomes among the students | Learning Outcomes |
|---|---|---|---|---|---|
| Checking Previous Knowledge : Conducting on March 3, 2023. | | | | | |
| Activity 1: National Flag | | | | | |
| Introduction of neighbouring countries of India with the help of map and globe | July 2023<br>8/7/2023 | India<br>Pakistan,<br>Nepal,<br>Sri lanka, China<br>Bangladesh | Social Science,<br>Science<br>Language<br>Art<br>Craft | Recognition of a country on map or globe.<br>Colouring Sheet,<br>Rangoli,<br>Recognition of Flag | Identify the Flag of the given country.<br><br>Understand the colour and design of Flag<br><br>Be sensitive towards other countries. |
| Introduction of flag: Students will get introduced to the National Flag by showing the picture of Flag with their respective country | 15/7/2023 | | | | |
| Art Activity - Students draw pictures of flags on sheets and colour them. | 22/7/2023 | | | | |
| Craft Activity: Students will craft a rangoli design inspired by flags. | 29/7/2023 | | | | |
| Showcasing Rangoli and Art Creations Exhibition | 31/7/2023 | | | | |
| Activity 2: National Animal | | | | | |
| Introduction - A Joyful Exploration of National Animals in Neighboring Countries of India through video from you tube.<br>India Bengal tiger<br>Nepal - cow<br>Bangladesh - Bengal tiger<br>Pakistan- Snow leopard<br>China -giant panda.<br>Explain the surviving condition of animals from different countries. | August 2023<br><br>5/8/2023 | India<br>Pakistan,<br>Nepal,<br>Sri lanka, China<br>Bangladesh | Geography<br>History<br>Science<br>Language<br>Art<br>Craft | Assignment<br>Mask making<br><br>Colouring sheet | Identify different animals<br><br>Understand the living conditions of animals in different countries<br><br>Learn to respect and appreciate animals around the world |
| Activity 3: National Fruit | | | | | |
| Introduction (Field trip) - A Cheerful Exploration of National Fruits by visiting the fruit vendor.<br>India- Mango<br>Nepal- Raspberry<br>Bangladesh- Jackfruit<br>Pakistan- Mango<br>China-Fuzzy kiwifruit<br>Explain the Seasonal Conditions in Other Countries. | September 2023<br><br>2/9/2023 | India<br>Pakistan,<br>Nepal,<br>Sri lanka, China<br>Bangladesh | Science<br>Geography<br>Language<br>Art<br>Craft | Assignment<br><br>Clay model making<br><br>Colouring sheet | Identify the fruits of the given country.<br>Understand the shape and taste the fruits<br>Understand the climate |
| Art Activity: Students will colour pictures of the National Fruit. | 9/9/2023 | | | | |
| Craft Activity: Students will craft clay models of fruits, colouring them creatively | 16/9/2023 | | | | condition of other condition<br>Be sensitive towards the nature |
| Sensorial Experience: Embark on a knowledge-fixing journey as students engage in hands-on testing of fruits. | 23/9/2023 | | | | |
| Collaborative Activities: Sharing the activity with Himachal Boarding School, Nepal. | | | | | |

- ## Conclusion of Innovation.

The activities exploring neighbouring countries' identities were highly effective, enriching students' cultural awareness and geographical proficiency through flags, national animals, and fruit study. Students' positive attitudes underscored the success of this initiative.

Collaboration with Himachal Boarding School in Nepal facilitated meaningful cultural exchange, fostering cross-cultural connections and enriching the learning experience.

Students demonstrated artistic expression through flag painting and crafting clay models, encouraging creativity and hands-on learning.

The integrated approach prepared students with a global perspective for our interconnected world, positively impacting attitudes, cultural awareness, and geographical proficiency.

The success of the program highlights the importance of fostering cross-cultural understanding and enriching the educational journey.

**सादरकर्ते- Dr. Poonam Sachin Kadlag**
ZPPS Yewalewadi no. 1 (Boys), Haveli, Pune.



III

गट-३

माध्यमिक उच्च माध्यमिक व मुख्याध्यापक

# Play with the Ray

**(An outdoor game which makes the understanding of ray diagrams easy)**

- **Need and Importance of Innovations :**

I believe that innovation in education can lead to better overall outcomes in the school environment. I have been teaching Science for the last 8 years. I as a Science teacher come across many concepts which students find difficult and loos interest if taught in a conventional way. One such a topic is 'Ray diagrams in optics'. This topic is a part of class X Physics.

- **Why this topic?**

1) This topic contains total 16 cases of image formation by mirrors and lenses for various positions of objects. I observed that students start mugging up the ray diagrams as they fail to understand the rules for drawing the ray diagrams.
2) To overcome the above mentioned challenges, I have designed an outdoor game to make students understand the concept thoroughly and develop their interest in this topic.

- **Innovative aspects and highlights of the game:**

1) Ray diagrams are being taught using 'chalk and talk' method for years now. My motive is to go beyond this method and give a new dimension to the teaching-learning process of this topic.
2) Students get excited to learn the ray diagrams while playing an outdoor game which makes learning joyful and effective.
3) This game clarifies the rules of drawing ray diagrams.

- **Objectives of Inovation :**

1) After playing this game, students will be able to understand the basic logic and rules used to draw the ray diagrams and will thus refrain from rote learning.

2) Students will be able to explain the position and nature of image formed.
3) Students will be able to draw the ray diagrams with more accuracy.
4) All the students of class X will be able to participate and contribute equally.

- **Planning of Innovation :**

1) To start with, we teach them all the important terms like focus, focal length, principle axis, pole, optical centre, centre of curvature etc.
2) Once they get the prerequisite knowledge, we ask them to mark pole, principle axis, focus, focal length, centre of curvature on ground taking suitable distance. Here we decompose the concept into smaller parts.

- **Proceeding of Innovation**

1) We divide the class into 4 teams (10 members in each team). One team gives the challenge to the second team mentioning the type of mirror/ Lens and position of the object.
2) Second team members discuss and arrange themselves as required for the given case of image formation. Students use critical thinking to choose the suitable laws of image formation and decide the path of rays. For example, if a ray, moves parallel to the principle axis, it passes through the focus after getting reflected or refracted. We use different color ribbons to depict different rays of light. Two students run holding these ribbons following the correct path in the given time limit.
3) If both of them follow the correct path, the rays(ribbons) intersects at a point representing the image formation. Other team members place an object at this point. Here they learn the concept of pattern recognition as well as algorithmic thinking.
4) The opposite team then asks questions such as what is the position of image. What is the nature and size of image? Etc. Students use logical thinking and identify the nature and size of image formed as per the challenge given by opposing team. They label the rays, object and image formed by picking up the correct flash cards.
5) Opposing team verifies the position, nature and size of the image from the reference table.
6) Team is awarded 10 points if the ray diagram is correct. The evaluation is done in this way.

- **Evidences-**


Video clip: https://drive.google.com/file/ d/1I-seEDf7hAW-WjaFiD-bD5ZxMbEZ wJ3/view

- **Success of Innovation**

**A) Analysis:**

1) As explained in the implementation, the five important i.e. Decomposition of the concept, teaching the concept of Pattern recognition, Algorithmic thinking, Logical thinking and Evaluation are followed while playing the game.

2) Apart from understanding the concepts, students also learn time management and team building.
3) Students could answer the ray diagrams questions well which built confidence in them.





**B) Outcome:**

1) After playing this game, students could understand the basic logic and rules used to draw the ray diagrams and got refrained from rote learning.
2) Students explained the position and nature of image formed.
3) Students could draw the ray diagrams with more accuracy.
4) All the students of class X participated and contributed equally.

## • Conclusion of Innovation :

1) To conclude, we would like to restate the importance of going beyond the 'chalk and talk' method of teaching for the betterment of learning experience. Through this activity, I could actually understand the importance of innovative teaching tools and strategies.
2) Using gamification technique made students understand the concept of ray diagrams thoroughly. We could see the shift from rote learning to concept building in a joyful way.



**सादरकर्ते- Shweta Bhamare**
Designation: PGT(Physics)
School: City pride school, Nigdi

# चला शिकूया खेळातून संस्कृत भाषेतील वाक्यरचना

- **नवोपक्रमाची गरज व महत्त्व –**

सिटी प्राईड स्कूल, निगडी या CBSE शाळेत नियमितपणे इतर विषयांप्रमाणे संस्कृत भाषा देखील शिकवली जाते. भाषेबद्दलच्या साहित्य,व्याकरण यांची माहिती देखील विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमातूनच होत असते.इयत्ता सहावी पासून ह्या विषयाचा समावेश आहे. पण या सगळ्यांची तोंड ओळख होताना व्याकरण सर्वात महत्वाचे आहे, कारण भाषेचा मूळ गाभा हा व्याकरण आहे आणि संस्कृत भाषेचे व्याकरण हे विभक्ती, प्रत्यय आणि लकार यांसारख्या घटकांवर अवलंबून आहे.जर व्याकरणच कठीण वाटले समजण्यास, पाठांतर करण्यास अवघड वाटले तर मग संस्कृत भाषेतून वाक्यरचना करण्याची विद्यार्थ्यांना भिती निर्माण होते. म्हणूनच इयत्ता 8 च्या विद्यार्थ्यांसाठी काही भाषिक खेळ बनवले.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे -**

1. खेळाद्वारे अध्ययन-अध्यापन करून विद्यार्थ्यांची अध्ययन रुची वाढवणे.
2. विद्यार्थ्यांची व्याकरणाची भिती कमी होण्यास मदत.
3. संस्कृत भाषेतून वाक्यरचना स्वतःहून करणे.

- **नवोपक्रमाचे नियोजन –**

हा उपक्रम राबविण्यापूर्वीची स्थिती अशी होती की, विद्यार्थी व्याकरण प्रश्नासाठी फक्त पाठांतरावर अवलंबून राहत होते. वाक्यरचना आणि काळ ह्या व्याकरणातील भागाचे अध्यापन करताना ही प्रक्रिया आनंददायी आणि सरल व्हावी म्हणून दोन खेळ मी बनवले.

**१) कर्ता-क्रियापदाचे चक्र-**

वाक्याचे जर भाग केले तर संस्कृतच्या दृष्टीने कर्ता आणि त्यावरच क्रियापदासाठी लागणारा प्रत्यय अवलंबून असतो. विद्यार्थ्यांना एक चक्र दिले गेले.ज्यात पहिल्या चक्रात प्रथम, मध्यम आणि उत्तम पुरुष यांचे कर्ता व त्याप्रमाणे त्या खालील चक्रात क्रियापद दिलेली आहेत.

**२) चला बनवूया वाक्य –**

विद्यार्थ्यांना काळानुसार वाक्यरचना समजावून सांगताना त्या वाक्याचे कर्ता क्रियापद आणि काळानुसार लागणारे प्रत्यय हे भाग पडतात.यात तीन भागात वर्तुळाकार खेळ बनवला.ज्यात एका वर्तुळात कर्ता, दुसऱ्या वर्तुळात क्रियापदाचे मुळरूप आणि तिसऱ्या वर्तुळात लकार (काळ) अश्या प्रकारे लिहिली आहेत,त्यामुळे कर्त्यासाठी योग्य काळातील प्रत्यय जोडून क्रियापदाचे रूप बनवताना या खेळातून वाक्य रचना तयार करणे सोपे होईल.

**३) संस्कृत पद्य -**

संस्कृत भाषेतील पद्यांमध्ये प्रत्येक शब्दाची स्वतंत्र मांडणी असते.त्यातील प्रहेलिका म्हणजेच कोडी हा घटक शिकवताना प्रत्येक शब्दाचा अर्थ वेगवेगळा करून समजावून घेतला,त्याचे विभाजन केले तरच त्या कोड्याचे उत्तर सापडते.

**उदा. सीमन्तिनीषु का शान्ता? सीता ।**
**राजा कोऽभूत् गुणोत्तमः? - रामः ।**
**विद्वद्भिः का सदा वन्द्या? विद्या ।**
**अत्रैवोक्तं न बुध्यते ॥**

(विशेष -प्रत्येक पायरीचा पहिला आणि शेवटचा भाग जोडल्यास त्या टप्प्यातील प्रश्नाचे उत्तर मिळते.)

- **नवोपक्रमाची कार्यपद्धती –**

**१) खेळ क्र.- १.कर्ता-क्रियापदाचे चक्र-**

वर्गातील विद्यार्थ्यांना वाक्याच्या दोन महत्वाच्या घटकांची माहिती दिल्यांनतर हे चक्र दिले गेले.विद्यार्थ्यांना या चक्राचे निरीक्षण करायला सांगितले.ज्यात पहिल्या चक्रात कर्ता आणि त्या खालील चक्रात क्रियापदाचे योग्य रूप लिहिलेले आहेत,हे त्यांच्या लक्षात आले.त्यात विद्यार्थ्याला कर्ता सांगितला गेला आणि त्या कर्त्यासाठी योग्य प्रत्यय जोडून कोणते क्रियापद असेल हे चक्र फिरवून शोधायला सांगितले.

**२) खेळ क्र.- २. चला बनवूया वाक्य –**





5 विद्यार्थ्यांचा समूह असे 6 विद्यार्थी समूह बनवले गेले. विद्यार्थ्यांसमोर तीन वर्तुळाकार चक्र ठेवण्यात आली. कर्ता, क्रियापदचे मुळ रूप आणि लकार (काळ) या तिन्ही चक्रावरील बाण फिरवून त्या आधारे वाक्य रचना तयार करायला सांगितली.





**३) संस्कृत पद्य अध्यापन पद्धतीत बदल –**

प्रहेलिका पद्य रचना वाचन केल्यानंतर प्रत्येक शब्द रूपक अर्थाने कसा मांडला आहे हे विभाजन करून सार्थ समजावून सांगितले. कोड्याचे उत्तर विद्यार्थ्यांना ओळखण्यास मदत झाली .

**४) निरीक्षणे व त्यांच्या नोंदी –**

या दोन्ही भाषिक खेळातून तार्किक विचार करूनच वाक्य रचना करावी लागली असे निरीक्षणास आले,पहिल्या खेळात जर कर्त्यास योग्य प्रत्यय जोडलेले क्रियापदासमोर आले नाही तर वाक्याचा अर्थ देखील जुळला नाही.

**उदा. अहं लिखामि ऐवजी अहं खेलसि ।**

याचप्रमाणे दुसऱ्या खेळात देखील कार्त्यानुसार योग्य लकार वापरून क्रियापदाचे योग्य पुरुष रूप वापरून वाक्य बनवताना विद्यार्थ्यांनी लकार प्रत्यय आठवून त्यांची योग्य मांडणी करून वाक्य रचना केली.प्रहेलिका शिकवताना कोड्याचे उत्तर मिळण्यासाठी प्रत्येक शब्दाचा तार्किक विचार केल्यावरच उत्तर मिळाले.

**५) मूल्यमापन -**

५ विद्यार्थ्यांच्या समुहातून प्रत्येकी एका विद्यार्थ्याला बनलेले वाक्य योग्य प्रत्यय व काळानुसार बनले आहे का हे तपासण्यासाठी सांगितले.पहिल्या खेळात कर्ता आणि क्रियापदाची योग्य जोडणी आणि दुसऱ्या भाषिक खेळातील काळानुसार योग्य कर्त्यास क्रियापदाचा योग्य प्रत्यय अशी वाक्याची रचना तपासण्यासाठी सांगितली.प्रहेलिकेचे उत्तर योग्य आले तर तेच का याचे स्पष्टीकरण करायला सांगितले.

## • नवोपक्रमाची यशस्विता-

पारंपारिक पद्धतीने संस्कृत व्याकरण म्हणजे पाठांतर फक्त हीच संकल्पना सगळ्यांच्या मनात आहे.पण त्याचा प्रयोग कसा करावयाचा हे न समजल्याने जेंव्हा स्वत: वाक्यरचना करायची असते तेंव्हा एक प्रकारचे दडपण मुलांमध्ये दिसून येते.त्यामुळे पाठ करा आणि दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा ह्या प्रकारच्या अध्यापन, अध्ययन आणि मूल्यमापन या ऐवजी भाषिक खेळातून जर हेच घटक योग्य विभागणी करून शिकवले तर त्याचा परिणाम आनंददायी शिक्षण घडण्यास सहाय्य करणारा ठरतो.त्याच प्रमाणे पद्य रचना देखील योग्य क्रम लावून शाब्दिक फोड व अर्थ सांगून केल्यास विद्यार्थी त्या प्रकारचे आणखी साहित्य प्रकार शोधण्यास प्रवृत्त होताना दिसतात.

## • नवोपक्रमाचा समारोप

वर नमूद केलेल्या भाषिक खेळांत पहिल्या खेळातून विद्यार्थी चक्र फिरवून कर्त्यासमोर योग्य प्रत्यय जोडून क्रियापद आणि कर्ता एकमेकांसमोर आल्याने विद्यार्थ्यांना यासाठी कर्ता आणि त्याला कोणता प्रत्यय लावायचा हे या खेळातून सहजपणे समजते.दुसऱ्या खेळात विद्यार्थी स्वत: वाक्य बनवायला शिकले. काळानुसार असणारे प्रत्यय पाठ करायला आणि त्याचा वाक्यप्रयोग करताना मनात असणारी भीती कमी झाली.तार्किकबुद्धीमत्ता,स्मरण, वाचन, लेखन ह्या कौशल्यांचा विकास यात होताना दिसून आला.

**सादरकर्ते- सौ.भक्ती वैभव मोहोळे, शिक्षिका**
1130180, सिटी प्राईड स्कूल, निगडी
info@cityprideschool.org

# विद्यार्थ्यांच्या कलागुण-कौशल्य विकसनासाठी स्पर्धांच्या माध्यमातून प्रेरणा देणे

- **नवोपक्रमाची गरज व महत्त्व-**

शिक्षणात प्रेरणेला फार महत्त्व आहे. अध्ययन करताना योग्य वेळी प्रेरणा मिळत गेली तर अध्ययन आनंददायी होत जाते. विविध उपक्रमांच्या माध्यमातून हे कार्य सहजसाध्य होत जाते. शाळा हा एकमेव असा रंगमंच आहे, की त्या रंगमंचावर आपण, विविध स्पर्धांच्या माध्यमातून, उपक्रमांच्या माध्यमातून, आपल्या अंगभूत कलांचा विकास करू शकतो. विविध स्पर्धा व उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्यातील स्व-ची जाणीव होते.

तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी स्क्रीनच्या ( Mobile / TV /Computer/Laptop/ Tab) आहारी गेलेले आहेत, कारण त्याच्या हाताला / अंगी असलेल्या कौशल्याला आपण आनंददायी काम देण्यात कमी पडतो, आणि म्हणूनच विद्यार्थी स्वनिर्मितीतून नवनिर्मितीचा / कलेचा आनंद घेण्यापेक्षा स्क्रीनच्या आहारी जातात. त्यांना मोबाईलचे व्यसनच लागते. विद्यार्थ्यांना अशा व्यसनांपासून दूर करण्यासाठी विविध कला सादरीकरणातून करून देणे गरजेचे वाटले. म्हणून या उपक्रमाची योजना तयार केली.

- **नवोपक्रमाचे महत्त्व-**

मानसशास्त्रातील तत्त्वानुसार किशोरवयीन मुलांच्या अंगी असलेल्या सहज प्रवृत्तीला योग्य वळण मिळाले तर, त्यांच्यामधील शारीरिक तसेच भावनिक व कौशल्य विकास सहज साध्य होतो. अनेक नवनवीन गोष्टी या वयातील मुले शिकतात, आत्मसात करतात, तसेच विकसितही करतात. या दृष्टिकोनातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले .

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे-**

1. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या अंगभूत कलागुणांच्या विकसनासाठी योग्य वयात संधी निर्माण करून देणे.
2. किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या सहज प्रवृत्तींना विधायक कार्याकडे वळवून नवनिर्मिती घडवून आणणे.
3. भारतीय संस्कृतीतील वैशिष्ट्यपूर्ण परंपरेची जाणीव निर्माण करून देऊन, अनिष्ट रूढी व परंपरा याबाबत जाणीव व जागृती निर्माण करणे.

- **नवोपक्रमाचे वेगळेपण-**

प्रत्येक शाळेत ठराविक साचेबद्ध पद्धतीने स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धा मध्ये उत्तम संबळ वाजवणाऱ्या, 100 पर्यन्त पाढे पाठांतर करणाऱ्या, तसेच उत्तम सतार वाजवणाऱ्या, तबला वाजवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा नसतात.

त्यांच्या कार्यकौशल्याला प्रेरणा देण्याच्या हेतूने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव व जागृती करत असताना स्व चा विकास घडवून आणण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

- **नवोपक्रमाचे नियोजन -**

शिक्षण ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. शिक्षण हे औपचारिक किंवा अनौपचारिकपणे सातत्याने सुरूच असते. फावल्या वेळेचा उपयोग करून आपल्या अंगी असणाऱ्या कलागुणांना विकसित करावे व त्यायोगे विविध कार्यक्रम कौशल्य शिकत जावे, या हेतूने दिवाळीच्या सुट्टीचा उपयोग या उपक्रमा साठी करून घेतला जातो.

दिवाळी सुट्टीला घरी जाण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्याला एक छापील परिपत्रक दिले जाते. या परिपत्रकात दिवाळी सुट्टी नंतर शाळेत आल्यावर घेण्यात येणाऱ्या विविध कलागुण कौशल्य स्पर्धेची सूचना, तसेच स्पर्धेचे निकष, स्पर्धेचे विषय, याबाबत स्पष्ट नियोजन दिले जाते.

तसेच दिवाळीचे औचित्य साधून दीपावलीच्या नाविन्यपूर्ण शुभेच्छाही दिल्या जातात. फटाके वाजवू नयेत. ध्वनी व वायू प्रदूषण करू नये, याबाबत या शुभेच्छांच्या मार्फत प्रबोधन केले जाते. तसेच फक्त हे करू नका, ते करू नका, हे न सांगता, मंगलमय व आरोग्यपूर्ण दीपावली साजरी करण्यासाठी काय करावे, याबाबत परिपत्रकाद्वारे आवाहन केले जाते.

तसेच हे परिपत्रक आपल्या परिसरातील पाच कुटुंबापर्यंत दाखवून त्यावर त्यांची स्वाक्षरी घ्या. त्यांना आरोग्यपूर्ण दिवाळीचे महत्त्व पटवून सांगा. आपल्या संस्कृतीचे संवर्धन कशा प्रकारे करावे, याचा योग्य संदेश आपल्या परिसरामध्ये पोहोचविला जातो

- **नवोपक्रमाची कार्यपद्धती-**

दीपावलीच्या सुट्टीनंतर लगेचच विद्यार्थ्यांच्या स्पर्धेचे नियोजन दिले जाते. त्याप्रमाणे स्पर्धेचे आयोजन केले जाते. आवश्यक तेथे शाळेतील अथवा विशिष्ट कौशल्यासाठी शाळेवरील तज्ञ व्यक्तींचा सहभाग हा परीक्षक म्हणून केला जातो. स्पर्धेमध्ये प्रथम तीन क्रमांक असे काहीही नसून त्या कला कौशल्य स्पर्धेत आपले कौशल्य अधिकाधिक चांगल्या प्रकारे सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड बक्षीसासाठी केली जाते. यामुळे काही स्पर्धेत दोन पासून दहा-बारा अशा संख्येने विद्यार्थ्यांची निवड सुद्धा कौशल्य निपुन म्हणून केली जाते व त्यांना त्या कौशल्याचे बक्षीस दिले जाते.

तसेच जास्तीत जास्त सहभाग घेऊन प्राविण्य मिळणाऱ्या वर्गाची सुद्धा कला गुण कौशल्य आदर्श वर्ग म्हणून निवड केली जाते. शाळेतील अनेक माजी विद्यार्थी सिनेसृष्टीत टीव्हीवर चांगले नावारूपाला आलेले आहे. विद्यार्थ्यांना अधिकाधिक प्रेरणा मिळावी म्हणून अशा माजी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बोलावले जाते व त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना स्टार प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविले जाते.

विद्यार्थी व पालक अत्यंत उत्साहाने या स्पर्धेमध्ये सहभाग घेतात व आपल्या अंगी असणारे कलागुण विकसित करण्याचा प्रयत्न करतात.

- **नवोपक्रमाची यशस्विता-**

1) विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या अंगभूत कलागुणांच्या विकसनासाठी योग्य वयात संधी निर्माण करून देता आली.

2) विद्यार्थ्यांना आपल्या कार्य कौशल्यांचा योग्य वापर करून नवनिर्मितीचा आनंद तसेच आस्वाद घेण्यासाठी फावल्या वेळेचा योग्य वापर करण्याची सवय लागण्यास मदत मिळाली.

3) भारतीय संस्कृतीतील वैशिष्ट्यपूर्ण परंपरेची जाणीव निर्माण करून देऊन, अनिष्ट रूढी व परंपरा याबाबत जागृती निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या उपक्रमाच्या माध्यमातून घडले.

4) सर्वात महत्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांना आपल्या अंगी असणारे कलागुण ओळखण्यास मदत झाल्याने भावी आयुष्यातील करिअरच्या दृष्टीने नवनवीन संधी ओळखण्यासाठी मदत मिळाली.

5) सोशलमिडिया संबंधी तांत्रिक माहिती घेऊन त्यातील नियम व वापरासंबंधी दक्षता याबाबत जागृती प्रचार व प्रसार करण्याचे कार्य घडवून आणता आले.

- ## नवोपक्रमाचा समारोप-


सन 2017-18 या शैक्षणिक वर्षापासून या उपक्रमाची अंमलबजावणी सातत्याने दरवर्षी केली जाते. अशा स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थी फुरसुतीच्या वेळेचा उपयोग नवनवीन कला कौशल्य विकसनासाठी करतात.

दरवर्षी होणाऱ्या स्पर्धेमुळे विद्यार्थी दीपावली सुट्टीचा आनंद घेत आपल्या कलागुण विकासासाठी प्रयत्न करतात. व आपले कलागुण विकसित करतात. या स्पर्धेच्या माध्यमातून शाळा व समाज अशी आंतरक्रिया आणण्यास नकळत मदत मिळाली आहे.

- ## उपक्रमाची क्षणचित्रे

कलागुण कौशल्य स्पर्धा बक्षीस समारंभ





स्पर्धेचे परिपत्रक



वाद्य वादन स्पर्धा

**सादरकर्ते- नंदकिशोर नगरकर,**
**मुख्याध्यापक**
अभिनव विद्यालय हायस्कूल
कर्वे रोड,पुणे

# इंग्रजी विषयातील कौशल्यांचा विकास करणे (अप्रगत विद्यार्थ्यांसाठी)

- **नवोपक्रमाची गरज -**

कोरोना नंतर च्या काळामध्ये ज्यावेळी विद्यार्थी शाळेत आले त्यावेळेला त्यांची अवस्था अशी होती की काही मुले ऑनलाईन घेतलेल्या शिक्षणामध्ये पूर्णपणे ज्ञानग्रहण करत होती तर काही विद्यार्थी असे होते की त्यांच्याकडे ऑनलाइन शिकण्याची व्यवस्थाच नव्हती त्यामुळे ज्या वेळेला हे विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत आले त्या वेळेला काही विद्यार्थ्यांमध्ये वाचन लेखन ही मूलभूत कौशल्य विकसित झालेली होती, तर काही विद्यार्थी मूलभूत कौशल्य अगदीच विकसित न झालेली अशी समोर आली त्यामुळे इंग्रजी सारखी तृतीय भाषा मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना शिकवणे एक मोठे आव्हान होते. आपल्या वर्गातील सर्वच विद्यार्थ्यांना इंग्रजी लिहिता वाचता यावे याच्यासाठी काहीतरी नवीन करण्याची गरज भासत होती जेणेकरून अशा अप्रगत विद्यार्थ्यांमध्ये असलेली इंग्रजी विषयाची भीती कमी होईल. इंग्रजी भाषेतल्या (LSRW) या कौशल्यांचा विकास करता येईल.

या कौशल्यांचा विकास करण्यासाठी त्याच त्या पारंपारिक वाटेने न जाता काहीतरी नवीन अशी वाट काढण्याची गरज वाटू लागली आणि त्यामधून यां उपक्रमाची सुरुवात झाली.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे-**

1. विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजी भाषेविषयीची भिती कमी करणे.
2. विद्यार्थ्यांमध्ये भाषिक कौशल्यांचा विकास करणे.
3. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.
4. विद्यार्थ्यांमध्ये स्वयं अध्ययनाची सवय लावणे.

- **नवोपक्रमाचे नियोजन-**

उपक्रम कितीही चांगला असला त्याची उद्दिष्ट किती चांगली असली तरीही तो उपक्रम कोणत्या पद्धतीने राबवला गेला हे फार महत्त्वाचे असते कारण उपक्रमाची यशस्विता हे त्याच्या नियोजनावर अवलंबून असते.

- **अ) उपक्रमाचे नियोजन खालील प्रमाणे करण्यात आले.**

**1. पूर्वस्थितीचे निरीक्षण-**

विद्यार्थ्यांसाठी प्रभावी दर्जेदार अध्यापन करून शंभर टक्के गुणवत्तेत वाढ करणे हे आपल्या शिक्षकांचे प्रथम कर्तव्य आहे. आपल्यासमोर असणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये अशा कौशल्यांचा विकास होणे फार गरजेचे आहे तर विद्यार्थ्यांमध्ये

एखाद्या विषयाला धरून न्यूनगंड निर्माण झाला असेल तर तो प्रगतीला अडचण ठरतो इंग्रजी वाचन, लेखन आणि संभाषणाच्या बाबतीत काही विद्यार्थ्यांमध्ये याबाबतीत अनुभव आला इयत्ता सहावी आणि सातवी या वर्गातील आठ ते दहा विद्यार्थ्यांना इंग्रजी वाचन लेखन याच्यामध्ये समस्या असल्याचे जाणवले आणि त्यावेळेला या विद्यार्थ्यांना वेगळ्या पद्धतीने वाचन,लेखन आणि संभाषण या कौशल्यांना शिकवण्याचा प्रयत्न करणे गरजेचे होते आणि त्यातूनच त्या विद्यार्थ्यांच्या गटाला वाचण्यासाठी जास्तीत जास्त प्रवृत्त करण्यासाठी जास्तीत जास्त लेखनाचा सराव घेणे गरजेचे वाटले.

**2. संबंधित व्यक्ती व तज्ज्ञांशी चर्चा-**

आपटे प्रशाला ही उपक्रमशील प्रशाला म्हणून ओळखली जाते. आमच्या प्रशालेमध्ये हा उपक्रम राबवण्यासाठी आमच्या इंग्रजी विभागाचे प्रमुख ठाकर सर, तसेच इंग्रजी विषय कमिटी मधील इतर शिक्षक यांच्याशी चर्चा केली. प्रशालेच्या माननीय मुख्याध्यापिका सौ सिन्नरकर मॅडम, पर्यवेक्षक श्री मगरे सर यांचेही मार्गदर्शन घेतले.

**3. साधनांचा विचार-**

फक्त वाचन, लेखन न येणारे विद्यार्थी यांचा वेगळा गट करून त्यांच्यासाठी बसण्याची व्यवस्था करणे.

विद्यार्थ्यांचे श्रवण कौशल्य विकसित करण्यासाठी संगणक तसेच ऑडिओ सिस्टम यांची गरज भासणार होती.

प्रशालेमध्ये प्रत्येक वर्गामध्ये विद्यार्थ्यांनी वाचण्यासाठी एक छोटे ग्रंथालय तयार केलेले आहे त्या ग्रंथालयामध्ये इंग्रजी भाषेतील छोट्या छोट्या गोष्टींच्या पुस्तकांची संख्या वाढवणे.

- **ब) पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्याच्या नोंदी -**

उपक्रम राबवण्यात ही वर्गामधील सर्व विद्यार्थ्यांचे वैयक्तिक पणे वाचनाची चाचणी घेतली तसेच त्यांचे हस्ताक्षर पाहिले, लिहीत असताना त्यांच्या होणाऱ्या चुका समजावून घेतल्या.

विद्यार्थ्यांना वाचनाच्या बाबतीत समस्या असल्याचे जाणवले.

इंग्रजी मधून लेखन करत असताना प्रत्येक अक्षराची उंची जाडी याचा विचार न करता मुल लिहीत होती.

- **नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही-**

नवोपक्रमाला वर्गामध्ये प्रत्यक्ष वेळेचे भान ठेवणे फार आवश्यक होते. त्यासाठी एक छोटे वेळापत्रक तयार केले.

*जून महिन्यामध्ये पंधरा तारखेला शाळा सुरू झाल्यानंतर सर्वात आधी पहिला आठवडा आमच्या इथे आनंद सप्ताह म्हणून साजरा केला जातो. त्यानंतरच्या आठवड्यामध्ये लगेच स्मॉल लेटर्स आणि कॅपिटल लेटर्स तसेच सराव करण्यात आला त्यांना चार ओळी व्यवस्थितपणे लिहिणे, त्यांच्या अक्षरांची उंची पाहणी, दोन लेटर एकत्र करून वाचणे या गोष्टींचा जूनमध्ये पूर्णपणे सराव करण्यात आला. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना वाचन, लेखनाबरोबरच अशा विविध ऑडिओ क्लिप्स की ज्याच्यामध्ये टू लेटर वर्ड्स चा उच्चार स्पष्टपणे त्यांना ऐकवता येईल अशी सोय केली.

जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यामध्ये विद्यार्थ्यांना थ्री लेटर वर्ड्स रीडिंग अँड रायटिंग ची सुरुवात झाली. यामध्ये vowel based reading ला फोकस केले गेले. बाराखडी ऐवजी विद्यार्थ्यांना दोन Consonant मध्ये एक vowel घेतल्यानंतर त्याचा उच्चार कसा होतो आणि तो कसा वाचला जातो हे शिकवण्यात आले.

Ex.bat, Bet, Bit, But, bold.....

या ठिकाणी फक्त एकच vowel दोन लेटरच्या मध्ये आल्यानंतर त्याचा उच्चार होतो हे स्पष्ट करण्यात आले.

जुलै महिन्याच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या आठवड्यात दोन vowel एका शब्दात आल्यानंतर त्यांचा उच्चार कसा बदलला जातो हे शिकवले.

**Ex 1. Vowel a and e -** Tear, Bear, Fear, Fare, Bare, Mare

**Ex 2. Vowel o-a -** Road, board, Roar

**Ex 3. Vowel e-e -** Jeep, feed, deep

**Ex 4. Vowel o-o -** Book, Hook, Look

**Ex 5. Vowel i-e -** Pine,fine,time,lime

विद्यार्थ्यांना सरावासाठी खालीलप्रमाणे शब्दांच्या याद्या देण्यात आल्या.

- Vowel A- ab, ad, ag, am, an, ap, at
- Vowel E- ed, eg, en, et
- Vowel I- ib, id, ig, in, ip, it
- Vowel O- ob, og, op, ot
- Vowel U- ug, ub, un, ut

- **Special group of letters-**

1. All - call, fall, hall.....
2. ight - might, right fight...
3. ill - bill, mill, fill...

Blends

Br, pr, tr, fr, pl, cl,ft, fl, या सारख्या blendsला कसे वाचले जाते. याचा सराव घेतला.

जुलै महिन्याच्या चौथ्या आठवड्यात छोट्या छोट्या गोष्टी मोठ्याने विद्यार्थ्यांच्या कडून वाचून घेतल्या. त्याचबरोबर या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांना लेखनाचा भरपूर सराव देण्यात आला. छोट्या गोष्टी लिहिणे, स्वतः विषयाची माहिती लिहिणे, स्वतःच्या घराविषयी ची माहिती लिहिणे.

रीड टू मी सारख्या ॲपचा वापर करून त्यांना पाठ्यपुस्तकातील धडे, लिसनिंग हे स्किल डेव्हलपमेंट करण्यासाठी शिकवण्यात आले.

नंतरच्या काळात विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील धडे, त्याच्यावरील वर्कशॉप हे सुरळीतपणे घ्यायला सुरुवात झाली. धडा शिकवत असतानाच नवीन आलेले शब्द त्याचे अर्थ आणि त्याचा उच्चार पाच वेळा लिहिणे, पाच वेळा तोंडाने त्या शब्दाचा उच्चार करणे असाही सराव रोजच्या तासाला घेतला जातो.

**Silent Letter –**

Talk, Walk, Know या सारख्या शब्दांना वाचत असताना काही अक्षरे दिसत असतील तरी त्यांना वाचायचं नसत. त्यांचा उच्चार silent असतो.त्यांना Silent Letter म्हणतात.हि संकल्पना त्यांना स्पष्ट करण्यात आली.

1. लेखनाचा सराव घेत असताना सर्वप्रथम त्यांना चार रेघीं वही, त्यानंतर दोन रेघी आणि त्याच्यानंतर एक रेघी मध्ये लिखाणाचा सराव देण्यात आला.

2. लिहीत असताना सर्वप्रथम छोटे शब्द, नंतर छोटी वाक्य नंतर विरामचिन्हांचा वापर असलेली वाक्य लिहिण्याचा सराव दिला गेला.

3. विद्यार्थ्यांमधील संवाद क्षमता वाढवण्यासाठी सर्वप्रथम त्यांना श्रवण कौशल्याचा विकास करणे गरजेचे होते. त्यासाठी त्यांना इंटरनेटचा वापर करून मोबाईल तसेच संगणक यांचा उपयोग करून वेगवेगळ्या ऑडिओ क्लिप्स ऐकवल्या त्या ऐकल्यामुळे त्यांना शब्दांचे उच्चार समजू लागले.

4. दररोजच्या व्यवहारातील विषय देऊन त्याच्यावरती त्यांच्याकडून संवाद म्हणवून घेतले.

**अ) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन-**

1. सुरुवातीला विद्यार्थ्यांना आपण मोठे असूनही अगदी अल्फाबेट्स घेतोय आणि दोन अक्षरी, तीन अक्षरी शब्द वाचायला शिकतोय याची लाज वाटत असल्याचे लक्षात आले.
2. सुरुवातीला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद अतिशय अल्प होता.
3. हळूहळू विद्यार्थ्यांना वर्गात घेतलेले वाचनाचे आणि लिखाणाचे सराव आवडू लागले.

4. विद्यार्थीआनंदाने आणि आत्मविश्वासाने त्या तासाला सहभागी होऊ लागले.
5. आपल्याला वाचता येऊ शकते या गोष्टीचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावरती दिसू लागला.

**ब) उपक्रम पूर्ण झाल्यानंतर ची निरीक्षणे आणि नोंदी-**

- विद्यार्थी शब्द, वाक्य वाचू लागली.
- इंग्रजीमध्ये लेखन करत असताना अक्षराची जाडी,उंची आणि दोन शब्दामधील अंतर याचा विचार करून लिहू लागली.
- इंग्रजी विषयाबाबत असलेली भीती कमी झाली.

- **नवोपक्रमाची यशस्विता-**
  - इंग्रजी भाषेची भीती कमी झाली.
  - आपणही इंग्रजी वाचू शकतो,तसेच चांगल्या अक्षरात लिहू शकतो याचा विद्यार्थ्यांना आत्मविश्वास आला.
  - विद्यार्थ्यांचे वाचन कौशल्य विकसित झाले.
  - विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य विकसित झाले आणि हस्ताक्षर सुधारले.
  - इंग्रजी भाषेविषयी असलेला न्यूनगंड कमी झाला.





- **संदर्भ सूची-**


1) Text books
2) Google Wikipedia
3) Dictionary
4) English story books
5) Read to me app



**सादरकर्ते- सय्यद जस्मीन अश्फाक**
शाळेचे नाव - लक्ष्मणराव आपटे प्रशाला,
आपटे रोड डेक्कन पुणे ४

# अक्षरबाग

अक्षरबाग - माध्यमिक स्तरावरील शैक्षणिकदृष्ट्या अप्रगत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी 'अक्षरबाग' हा नवोपक्रम.

तंत्रज्ञान विज्ञान आणि वैद्यकीय विज्ञान यांनी विविध क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावली. शालेय स्तरावरील शिक्षणाचे होणारे नुकसान थांबविण्यासाठी शासनाकडून 2020 – 2021 या दोन वर्षांत 'ऑनलाइन शिक्षण प्रणाली' अस्तित्वात आणली गेली. या ऑनलाइन शिक्षणामुळे शिक्षण व्यवस्थेवर सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही परिणाम झाले. काही चांगले परिणाम म्हणजे केवळ विद्यार्थीच नाही तर समाजातील जास्तीत जास्त लोक त्यांच्या दैनंदिन जीवनात मोबाईल फोन, कॉम्प्युटर या तंत्रज्ञानाचा वापर करू लागले. वर्ष २०१९ ते २०२१ ही वर्षे प्रत्येक व्यक्तीसाठी आणि जगासाठी हादरवून टाकणारी ठरली. त्याचे कारण होते कोविड 19 महामारी आणि त्यामुळे झालेली मनुष्यहानी. या घटनेच्या पार्श्वभूमीवर भारतात अनेक गोष्टी कोलमडल्या वाताहात झाली. शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनीही मोबाईल आणि संगणकावरील विविध ॲप्लिकेशन्सचा वापर केला. परंतु विद्यार्थ्यांच्या जीवनावर अतिशय भयंकर आणि गंभीर परिणाम झाला. ऑनलाइन शिक्षण प्रणालीचे तोटे विचारात घेऊन शासनाने शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला ; परन्तु त्याच्या बहुतांशी समस्या मात्र तशाच राहिल्या. यात भर पडली, ती विद्यार्थ्यांला इयत्ता आठवी पर्यंत सक्तीने पास करण्याची. त्यामुळे पालक देखील जबाबदारी झटकून बसले आणि मग गरज भासू लागली ती अक्षरबाग सारख्या नवोपक्रमांची.

- **नवोपक्रमाची गरज:**

या नावीन्यपूर्ण प्रकल्पाची पुढील अनेक कारणांसाठी गरज आहे:

विद्यार्थ्यांचे वाचन कमी झाले. तो मैदानी खेळांशिवाय ऑनलाइन गेममध्ये वेळ घालवू लागला. प्रत्येकजण ऑनलाइन कामात व्यस्त असल्याने कुटुंबातील व्यक्तींमध्ये संवादाचा अभाव झाला. समवयस्क मित्रांशिवाय घरात बसल्यामुळे एकटेपणाची भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली. त्याचा परिणाम डोळ्यांच्या समस्या, अशक्तपणा आणि लठ्ठपणा यासारख्या विविध आरोग्य समस्यांमध्ये झाला. स्मरणशक्ती कमी होणे, आकलनशक्ती कमी होणे आणि विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची क्षमता कमी होणे अशा समस्या निर्माण झाल्या. आळशीपणा, कामचुकारपणा आणि मूल्यांमध्ये घसरण या समस्या जाणवल्या. दैनंदिन अभ्यासाच्या सवयींवर पूर्णपणे वाईट परिणाम झाला. याचा परिणाम म्हणजे प्रत्येक विषयातील मूलभूत ज्ञानाचा अभाव. अभ्यासाची गोडी कमी झाली.

- **नवोपक्रमाचे महत्त्व:**

या नावीन्यपूर्ण प्रकल्पाचे महत्त्व पुढील प्रमाणे आहे:

अभ्यासात रस वाढवण्यासाठी, विद्यार्थ्यांना वाचनाची सवय वाढवण्यासाठी प्रवृत्त करणे, तयार उत्तरांपासून त्यांचे

लक्ष विचलित करण्यासाठी, मोबाइल फोन आणि ऑनलाइन गेमिंगपासून त्यांचे लक्ष दूर करण्यासाठी. त्यांच्या विचारशक्तीला चालना देण्यासाठी, विविध विषयातील त्यांचे मूलभूत ज्ञान सुधारण्यासाठी, दैनंदिन अभ्यासात त्यांची आवड वाढवण्यासाठी, भाषेची चार मूलभूत कौशल्ये विकसित करण्यासाठी, म्हणजे वाचन, लिहिणे, ऐकणे आणि बोलणे. गणितातील मूलभूत ज्ञान विकसित करण्यासाठी, भाषा शिकण्यात, विशेषतः मराठी, हिंदी आणि इंग्रजीमध्ये त्यांची आवड वाढवण्यासाठी. सकारात्मक वर्ग संवाद साधण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे:**

1. सर्व भाषा क्षमतांचा विकास
2. अक्षरांची ओळख, अक्षरांची निर्मिती आणि भाषांमधील विरामचिन्हे ओळखणे.
3. शब्द आणि वाक्यांची निर्मिती
4. संख्यांची ओळख, बेरीज, वजाबाकी, भागाकार आणि गुणाकार यांसारख्या साध्या गणिती अभिव्यक्ती

- **नवोपक्रमाचे नियोजन:**

| अ.क्र. | नियोजनाच्या तारखा | नियोजन | प्रत्यक्ष कार्यवाही |
|---|---|---|---|
| 1 | १५ जुलै २०२३ ते १५ ऑगस्ट २०२३ | उपक्रमपुर्व परिस्थितीचे निरीक्षण: | विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या भाषा आणि गणित विषयांची नैदानिक चाचणी घेऊन निवड केली गेली |
| 2 | १० ऑगस्ट २०२३ ते १५ ऑगस्ट २०२३ | संबंधित व्यक्ती आणि तज्ञांशी चर्चा: | संस्थापक, संस्थापिका, मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षक, पालक, आणि आमचे मार्गदर्शक यांच्याशी चर्चा केली. |
| 3 | १३ऑगस्ट २०२३ ते १५ ऑगस्ट २०२३ | आवश्यक साधनांचा विचार: | 1. विशेष लक्ष देणाऱ्या शिक्षिका 2. एक मोकळा वर्ग 3. बसून शिकवण्यासाठी सतरंजा 4. वि. वा. शिरवाडकर यांचे अक्षरबाग हे पुस्तक पुस्तक 5. खडू - फळा आणि पाठ्यपुस्तके, |
| 4 | १६ ऑगस्ट २०२३ ते २० ऑगस्ट २०२३ | करावयाच्या कृतीचा क्रम: | कोणता भाग शिकवायचा आणि कसा शिकवायचा, तसेच केव्हा यावर विचार केला गेला. |







- ## नवोपक्रमाची कार्यवाही-

**अ) उपक्रमपुर्व परिस्थितीचे निरीक्षण:**

हा उपक्रम सुरू करण्यापूर्वी विद्यार्थ्यांमध्ये खालील त्रुटी होत्या:

1. उत्तरे देताना आत्मविश्वासाचा अभाव
2. भाषेची पाठ्यपुस्तके वाचताना त्यांना अडथळे येत होते
3. अक्षरांची ओळख नसणे, मराठी आणि हिंदी सारख्या भाषांमध्ये अक्षरांची निर्मिती.
4. उकार, काना, मात्रा, वेलांटी वगैरे ओळखता येत नव्हते.
5. ते पाढे म्हणू शकत नव्हते.
6. बेरीज, वाजबकी, गुणाकर, भागाकार या साधे गणितीय अभिव्यक्ती येत नव्हत्या.

**ब) संबंधित व्यक्ती आणि तज्ञांशी चर्चा:**

संबंधितांशी चर्चा करून अक्षरबाग यां उपक्रमाला एकमताने मंजुरी देण्यात आली.

**इ) आवश्यक साधनांचा विचार:**

1. विशेष लक्ष देणाऱ्या शिक्षिका
2. एक मोकळा वर्ग
3. बसून शिकवण्यासाठी सतरंजा
4. अक्षरबाग हे वि. वा. शिरवाडकरांचे पुस्तक
5. खडू आणि फळा

**ई) करावयाच्या कृतीचा क्रम:**

| तासिका नियोजन | नैदानिक मुलाखत आणि चाचण्या | प्रत्यक्ष अध्यापन |
|---|---|---|
| शालेय वेळेतील काही तासिकांची निवड | भाषा आणि गणित विषयातील अप्रगत विद्यार्थ्यांची चाचणीद्वारे निवड केली गेली | अक्षरांची निर्मिती, आकार, अक्षर ओळख,भाषा चिन्ह, शब्द आणि वाक्य निर्मिती, शब्द वाचन, वाक्य वाचन, कविता मौखिक आकलन, गणितीय संख्यात्मक ज्ञान, गणना, बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार |
| शालेय स्तरावरील या नवोपक्रमासाठी सर्वप्रथम शिक्षिका म्हणून पालक भगिनींची निवड करण्यात आली. | | |

शालेय तासिकेतील काही तासिकांमधील वेळेचे नियोजन करून पुढीलप्रमाणे कार्य केले गेले:

१५ जुलै २०२३ ते १५ ऑगस्ट २०२३ या काळात विद्यार्थ्यांची निवड वेगवेगळ्या भाषा आणि गणित विषयांची नैदानिक चाचणी घेऊन निवड केली गेली.

२० ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर २०२३ विविध विषयांवरील अध्यापन केले गेले

- **भाषा विषय :**

**१ ) अक्षरे कशी तयार करावी. अक्षरे तयार करण्यासाठी विविध आकारांची ओळख.**

उदा. उभी रेषा, आडवी रेषा, गोल, अर्ध चंद्र, रेल्वे चे रुळ, धनुष्य बाण इत्यादी आकार



**२ ) काना, मात्रा, उकार, वेलांटी, अनुस्वार यासारखी भाषा चिन्हांची ओळख**

काना केव्हा द्यावा, वेलांटीतील आणि उकारांमधील फरक, पहिली वेलांटी केव्हा द्यावी, दूसरी वेलांटी केव्हा द्यावी यातील सूक्ष्म भेद यांचे ज्ञान.

ऱ्हस्व आणि दीर्घ म्हणजे काय यांचे ज्ञान

**३ ) शब्द कसे तयार करावेत :**

उदा. अ ला काना जोडला की आ

स र ळ = सरळ

ह, ढ, ध, प, फ,ट, ठ, न, ण यासारख्या अक्षरांच्या उच्चारां मधील फरक

जोडाक्षरे कशी तयार होतात: क + र = क्र

**४ ) शब्दांचे वाचन कसे करावे, उच्चार कसा असावा याची माहिती देणे**

**५ ) वाक्यरचना कशी असावी**

**६ )परिच्छेद वाचन**

**इंग्रजी भाषा :**

1. शब्दलेखन कसे तयार केले गेले
2. दोन अक्षरी शब्द
3. तीन अक्षरी शब्द
4. चार ते पाच अक्षरी शब्द
5. वाक्य रचना
6. शब्द उच्चारण
7. परिच्छेद वाचणे

**गणित विषय:**

1) मूलभूत अंकांची ओळख
2) अंकांची मूलभूत गणना
3) संख्या ओळख
4) संख्यांची मूल्ये ठेवा
5) साध्या गणिती क्रिया
6) साध्या भौमितिक आकृत्या

२६ ऑक्टोबर २०२३ ते ७ नोव्हेंबर २०२३ या काळात विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या विकसित क्षमतांचा विचार करुन वेगवेगळ्या विषयांच्या प्रश्नपत्रिका वेगळ्या पद्धतीने काढून परीक्षा घेण्यात आल्या. यातून अक्षरबाग या उपक्रमात शिकवलेल्या विषयातील सामान्य क्षमता अधिक चांगल्या प्रकारे विकसित झालेल्या दिसून आल्या.

•

- **नवोपक्रमाची यशस्वीता:**

1. अक्षर ओळख अणि भाषा चिन्हे ओळखू लागले. 2. शब्द अणि वाक्य योग्य प्रकार वाचन करू लागले.
3. पाढे पाठ करू लागले. 4. अभ्यासात गोडी वाढली. 5. आत्मविश्वास वाढला.
6. गणिततील सामान्य गणिति आकडेमोड येऊ लागली. 7. संख्याज्ञान विकसीत झाले

**सादरकर्ते- पद्मश्री देशपांडे, शिक्षिका**
शाळेचे नाव - बापुसाहेब भोंडे हायस्कूल, लोणावळा,पुणे














# वैदिक गणिताची करामत सोडविती गणितातील संकल्पना

## "भन्नाट वाटे गणित आता मजला का करायची भीतीची वल्गना"

**यथा शिखा मयूराणां, नागानां मणयो यथा ।**
**तथा वेदांगशास्त्राणां गणितं मूर्धनि स्थितम् ।।**

- **नवोक्रमाची गरज व महत्व:**

इयत्ता नववीत आलेल्या माझ्या विद्यार्थ्यांना कोरोना काळातील ऑनलाईन शिक्षणामुळे गणितातील पायाभूत घटक, विविध सूत्रे, गणिती क्रिया सोडवताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी मला वैदिक गणित शिकवण्याची गरज वाटू लागली. गणितातील मूलभूत क्रिया जसे पूर्णांकावरील क्रिया, अपूर्णांकावरील क्रिया, वर्ग, घन, घातांक, अवयव पाडणे, लसावी, मसावी इत्यादी वैदिक गणिताच्या सहाय्याने समजणे सोपे जाईल अशी खात्री वाटली. यामुळे वैदिक गणितातील विविध सूत्रांचा वापर करून या पायाभूत संकल्पना विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी मी या उपक्रमाचे नियोजन केले.

**अ) नवोपक्रमाची नाविन्यता:**

भारतीय गणिताची समृद्ध परंपरा आणि वारसा आपल्या मुलांना मिळावा. तसेच आपल्या मुलांमध्ये वैदिक गणिताबद्दल आत्मीयता निर्माण  व्हावी.

**ब) नवोपक्रमाची उपयुक्तता:**

१) NEP – २०२० नुसार गणिताची भीती दूर होऊन गणितातले विविध प्रश्न सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांना कृतीयुक्त शिक्षण मिळणे गरजेचे आहे.

२) गणिताची भाषा ओघवत्या स्वरूपात शिकतील आणि वैदिक गणिताचा वापर करण्यामुळे गणितातील व्याख्या आणि सूत्रे अतिशय सोप्या पद्धतीने विद्यार्थ्यांच्या लक्षात राहतील.

**क) वैदिक गणिताचे महत्त्व:**

१) वैदिक गणिताच्या मदतीने आपण गुणाकार, भागाकार, वर्गमूळ, घनमूळ इत्यादी गणितातले प्रकार सहज सोडवू शकतो.

२) वैदिक गणिताचा उपयोग करून आपण गणितातील हिशोब १० ते १५ पटीने जलद गतीने करू शकतो.

३) वैदिक गणिताचा उपयोग करून गणिताची गती वाढवू शकतो आणि उत्तर पण अचूक येते.

४) विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि एकाग्रता वाढवण्यास वैदिक गणित मदत करते.
५) तर्क शक्तीचा विकास होण्यात वैदिक गणित मदत करते.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे:**

१) गणित अध्ययनाची गोडी निर्माण होऊन अध्ययन स्तर वाढवणे.
२) नव्या जगाकडे नव्या दृष्टीने बघण्यास शिकणे. NEP – २०२० नुसार गणिताची भीती दूर होऊन गणितातले विविध प्रश्न सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांना कृतीयुक्त शिक्षण मिळणे.
३) भारतीयत्वाचा, संस्कारांचा, ज्ञानाचा समृद्ध वारसा चालवण्यास नवी पिढी तयार करणे.





- **नवोपक्रमाचे नियोजन:**

कोणत्याही कार्यक्रमाची,उपक्रमाची यशस्विता त्याच्या नियोजनावर अवलंबून असते.यासाठी खालील प्रमाणे उपक्रमाचे नियोजन करण्यात आले.

**अ. पूर्वस्थितीचे निरीक्षण:**

१) शहरी भागातील विद्यार्थ्यांकडे उपलब्ध असणाऱ्या व्यवधाने यांचा अध्ययनावर होणारा परिणाम बाजूला सारून प्रत्येक विद्यार्थ्यांनी अध्ययनावर लक्ष केंद्रित करणे अत्यावश्यक आहे.
२) पालकांच्या सामाजिक व आर्थिक कमकुवत बाजूमुळे विद्यार्थ्यांची होणारी फरफट लक्षात घेता त्यांना मूळ प्रवाहात आणण्यासाठी अध्यापनाच्या विविध पद्धतींचा वापर करणे आवश्यक वाटते.
३) दैनंदिन जीवनातील उदाहरणे आणि व्यवहारिक गणित यांच्यात सांगड घालणे क्रमप्राप्त ठरते.

**आ. आवश्यक साधनांचा विचार:**

१) गणिताचा विचार करता दैनंदिन जीवनातील साधनांचा वापर करूनच विद्यार्थ्यांना गणित आणि गणितातील संकल्पना समजणे आवश्यक आहे.त्यामुळे वर्गात उपलब्ध असणारी साधने, विविध शैक्षणिक साधने, याद्वारेच गणितातील क्रिया सोडवणे विद्यार्थ्यांना सहजतेचे वाटले.त्यामुळे साधनांचा फार उहापोह न करता विद्यार्थ्यांना गणिती क्रिया सोडवताना आनंद मिळणे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढवणे हाच या नवोपक्रमाचा हेतू आहे.

**इ. पूर्व उपक्रम स्थितीचे निरीक्षण:**

१) गणिताबद्दल असणारी उदासीनता आणि भीती प्रचंड प्रमाणात विद्यार्थ्यांमध्ये दिसून आली. बेरीज, वजाबाकी, गुणाकार,भागाकार इत्यादी क्रिया करताना सुद्धा विद्यार्थ्यांची त्रेधा तिरपट उडताना पाहिली.मुळात पाया पक्का नसेल तर कोणतीही उंच इमारत बांधताना अडचणी या येणारच.याच अडचणी टाळण्यासाठी सर्वप्रथम

विद्यार्थ्यांमध्ये गणितातील मूळ संकल्पना जसे की गुणाकार, भागाकार, अपूर्णांकाची बेरीज, वजाबाकी, पूर्णांकांची बेरीज, वजाबाकी, वर्ग, वर्गमूळ इत्यादी संकल्पना गमतीशीर पद्धतीने खेळ खेळताना विद्यार्थ्यांना लवकर समजतील हा विचार पटला. त्यातून उपक्रमाची नियोजन आणि बांधणी तयार झाली.वैदिक गणितातील काही संकल्पना आणि सूत्रे अतिशय सोप्या पद्धतीने मुलांसमोर मांडावी हा विचार उभा राहिला.

**ई. विद्यार्थ्यांचे उपक्रम पूर्व निरीक्षण:**

१) बऱ्याच विद्यार्थ्यांचे गणितातील पायाभूत घटक पक्के झालेले नव्हते. त्यामुळे नवीन घटक शिकवताना पायाभूत घटकांचाही विद्यार्थ्यांचा सराव नव्हता.गणित विषयाची व्याप्ती आणि उपयोजन न कळल्यामुळे गणित नीरस वाटणे साहजिकच आहे.

२) गणित वहीत न सोडविणे,पायऱ्या न कळल्यामुळे वर्गात गप्पा गोष्टी करणे,लिहायचा कंटाळा करणे.

३) फक्त फळ्यावरचे उतरवून घेणे, तोंडी विचारलेला गुणाकार, भागाकार न करणे.

४) वारंवार गैरहजर राहणे, परीक्षेची भीती वाटणे,घरी टी.व्ही, मोबाईल चा अति वापर करणे.

५) गटात कार्य करताना इतरांच्या मदतीची अपेक्षा करणे.उदासीन राहणे.

**उ. पालक प्रश्नावली:**

पालक प्रश्नावलीतून मिळालेली माहिती – स्मार्टफोनचा अति वापर करतात,उद्धटपणे वागतात,गृहपाठ करत नाहीत,स्वतःची जबाबदारी सुद्धा पार पाडत नाहीत,शाळेत न जाण्याची विविध कारणे शोधतात,ग्रुपमधील मुलांच्या वाईट सवयी बाळगतात,न्यूनगंड बाळगतात,पालकांशी गप्पा, चर्चा करत नाहीत,शाळेतील सूचना पालकांपर्यंत पोहोचवत नाहीत,परीक्षेची अकारण भीती बाळगतात.

- **नवोपक्रमाची कार्यवाही-**

आज गणित हे विज्ञान, अभियांत्रिकी, औषधशास्त्र, तसेच अर्थशास्त्र आणि समाजशास्त्रासारख्या ज्ञानाच्या विविध शाखांमध्ये जगभर वापरले जाते. या शास्त्रात गणिताचा वापर करणारी गणिताचीच उपयोजित गणित ही शाखा नवीन गणिती शोधांना प्रेरणा देते आणि त्यांचा वापर करते. त्यामुळे ज्ञानाच्या सर्वस्वी नवीन शाखाही उदयास येतात. कलेसाठी कला या न्यायाने केवळ गणितासाठी गणित अशा ध्येयाने शुद्ध गणिताचा अभ्यास करणारे गणितीही आहेत. अशा शुद्ध गणितातील शोधांचा उपयोजित गणितात वापर करावा.

१) पूर्वोत्तर चाचणी व मूल्यमापन:

२) गणितविषयक भयगंडाची शिकार होऊन मुलांची प्रगती खुंटणे, या समस्येच्या मुळाशी जाऊन विचार केल्यास अनेक छोटी छोटी परंतु महत्वाची कारणे सापडतात. आकडे मोजणे, बेरीज, वजाबाकी यांचा उपयोग समजावून न सांगता घोकंपट्टी करण्याची सक्ती करणे. धाकदपटशा दाखवून जबरदस्तीने विषय गळी उतरवण्याचा प्रयत्न करणे. चाचणीमधून त्याची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला गेला.

३) गणितातील विविध टप्पे, पायऱ्या यांची स्वतंत्रपणे ओळख:

४) आपण शिकवत असलेल्या गणित प्रकाराचा आधी व्यवहारातला उपयोग समजावून सांगणे. विद्यार्थ्यांच्या कुतूहलातून आलेल्या प्रश्नांची संयमाने उत्तरे देणे.

५) केवळ पुस्तकाला प्रमाण मानून त्यानुसारच चालण्याचा आग्रह न धरणे, यामुळे मुलांना मोकळेपणाने गणितीय संकल्पना समजून घेण्यास आनंद वाटला.

६) वैदिक पद्धतीने गणिते सोडवून घेणे जसे अवयव पाडणे, पायथागोरसचा सिद्धांत, लसावी, मसावी, तसेच जापनीज पद्धतीने गुणाकार,तंत्रज्ञानाचा वापर. त्यात सहजता आणि गंमत मुलांना वाटावी... यासाठी खालील उपक्रम घेण्यात आले.

| अ. क्र. | कार्यवाही टप्पे | |
|---|---|---|
| अ | विद्यार्थ्यांशी चर्चा | ०७/०८/२०२३ |
| आ | गणित सोडवताना येणाऱ्या अडचणींची नोंद | १४/०८/२०२३ - १८/०८/२०२३ |
| इ | पूर्व चाचणी परीक्षण | १८/०८/२०२३ |
| ई | वैदिक गणितातील सूत्रांबद्दल माहिती | ०४/०९/२०२३ - ०६/०९/२०२३ |
| उ | वैदिक पद्धतीने गणिते सोडवून घेणे: - | ०४/०९/२०२३ - २२/०९/२०२३ |
| १ | अवयव पाडणे, दोन चलांतील रेषीय समीकरणे | गणनतेच्या पायऱ्या कमी करण्यासाठी... गणिताची इमारत बांधूया... |
| २ | पायथागोरसचा सिद्धांत | अचूक उत्तर मिळवण्यासाठी- चौकस राजाची तीक्ष्ण नजर |
| ३ | लसावी, मसावी | विद्यार्थ्यांवरील मानसिक तणाव कमी करण्यासाठी - गणित, खेळ आणि गंमत |
| ४ | जापनीज पद्धतीने गुणाकार | विद्यार्थ्यांवरील मानसिक तणाव कमी करण्यासाठी - गणित, खेळ आणि गंमत |
| ५ | तंत्रज्ञानाचा वापर | “Geometry” या अँप चा वापर आकृत्या काढण्यासाठी. |
| ऊ | उत्तर चाचणी परीक्षण | २७/१०/२०२३ |

- **कार्यवाही करताना आलेल्या अडचणी:**

मुळातच गणित आणि भीती यांची सांगड बसलेली. इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेला बसलेल्या आणि नववीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सांभाळून या उपक्रमासाठी तासांची निवड करावी लागली.आजच्या आधुनिक युगात वेदिक गणिताचे महत्त्व समजावताना त्याचा इतिहास, भारताची ज्ञानाची समृद्ध परंपरा विद्यार्थ्यांमध्ये रुजवावी लागली.

- **तज्ज्ञाशी / संबंधित व्यक्तींशी चर्चा:**

उपक्रमाबाबत विविध तज्ज्ञांशी चर्चा करताना मुलांची मानसिकता समजून घेण्यास मुख्याध्यापिका, विषय तज्ज्ञ यांचे मार्गदर्शन आणि मोलाची साथ लाभनेही गरजेचे आहे. मी आमच्या शाळेतील मुख्याध्यपिका सौ सीमा पवार यांच्याशी चर्चा केली.टिळक अध्यापक विद्यालय, पुणे येथील श्री. करण भिसे सर यांच्याशी चर्चा केली.माजी मुख्याध्यपिका सौ. माधवी जोशी यांचे मार्गदर्शन मिळाले. तंत्रस्नेही शिक्षक खुशलद्दीन शेख, सांगोला, सोलापूर यांच्या विविध उपक्रमाची माहिती मिळवत असताना त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.माझे काका संदीप भोसले (मुख्याध्यापक)यांनी प्रोत्साहन दिल्यामुळे या उपक्रमाची सुरुवात झाली.माझे तंत्रस्नेही पती सुदर्शन माळी यांची मोलाची साथ राहिली.

- **उपक्रमोत्तर नोंदी व निरीक्षण:**

१) सहज, सोप्या पायऱ्यांनी विद्यार्थ्यांची गणितातील रुची वाढविली. गणितातील एका पायरीत येणाऱ्या उत्तरांची गंमत अनुभवता आल्यामुळे त्यातील क्लिष्ठता कमी होऊन उत्तरांची अचूकता वाढली. नवपद्धत असल्यामुळे नियमित सरावाने अचूक सोडविण्याचा कालावधी कमी करता येईल, याची खात्री विद्यार्थ्यांना पटली.

२) गणित अध्ययन करण्यापेक्षा अशा विविध उपक्रमाद्वारे गणित सोडवताना मुलांना मजा आली.गणिते सोडवताना विद्यार्थी स्वतः हिरहिरीने भाग घेऊ लागली.गणित सोडवल्यावर मुलांच्या डोळ्यात एक वेगळीच चमक दिसू लागली."टीचर,तुम्ही खूप छान गणित शिकवता", यापेक्षा सुंदर, शिक्षकांना भावुक करणारा अभिप्राय येणाऱ्या नव्या प्रत्येक पिढीसाठी प्रयत्न करण्यासाठी प्रचंड आत्मविश्वास देऊन गेला.

- ## नवोपक्रमाची यशस्विता:

विद्यार्थ्यांच्या गणित विषयातील टक्केवारीत वाढ झाली. विद्यार्थ्यांची हजेरीपटावर उपस्थिती वाढू लागली.भरलेला वर्ग पाहताना शिक्षकांना होणारा आनंद शब्दात वर्णन करणे कठीणच. आपल्या विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने "गणित शिकवताना पाठ्यपुस्तक फक्त एक माध्यम आहे" याची जाणीव होणे गरजेचे आहे.गणितातील पायऱ्या सोडवताना प्रत्येक पायरीवर उत्तर सांगण्यासाठी उंच वाढत जाणारा विद्यार्थ्यांचा आवाजच या उपक्रमाची यशस्विता सांगून जातो.सहजतेने पाच पायऱ्यांच्या ऐवजी एका पायरी मध्ये आलेले उत्तर आजच्या स्पर्धेच्या युगामध्ये मला महत्त्वाचे वाटते. गणितातील गंमत शोधणे, त्या सोडवताना येणारी मजा अनुभवणे, सहजतेने उत्तर मिळाल्यावर आकाशाला गवसणी घालण्यासारखे वाटणे, यासारखे अनुभव दररोज मुलांच्या जीवनात यावे. त्यामुळेच वैदिक गणितासारख्या आपल्या भारतीय ज्ञानाचा वापर आपल्याच विद्यार्थ्यांनी करावा, असा माझा संकल्प आहे, तो निरंतर अव्यहतपणे चालू राहील.





- ## संदर्भ ग्रंथ व परिशिष्टे:


१) वैदिक गणित निर्देशिका - शंकराचार्य

२) Vedic Mathematics Made Easy by Dhaval Bathia -JAICO Publication

३) शालेय नवोपक्रम (२०२१, २०२२ व २०२३) – महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.

४) http://mr.upakram.org/node/39199 (वैदिक गणित, चेतन पन्डित, जानेवारी, ११, २०१३)



**सादरकर्ते- विद्या माळी**
हुद्दा- शिक्षिका
शाळा- M.V.M. रामचंद्र राठी,
मराठी माध्यमिक विद्यालय,पुणे

IV

## गट-४
## विषय सहाय्यक
## विशेष शिक्षक
## विषय-साधनव्यक्ती
## व ग्रंथपाल

# चला परसबाग बनवूया
# मुलांचे सदृढ आरोग्य करूया

### • नवोपक्रमाची गरज व महत्व :

खटाव विकास गटामध्ये पर्यवेक्षीय यंत्रणेत काम करीत असताना मी जेव्हा वर्गभेट करतो तेव्हा मला असे जाणवले की, शाळेच्या परिसरात भरपूर मोकळी जागा उपलब्ध आहे. त्या मोकळ्या जागेत जर परसबाग लावली तर काय होईल. असा विचार मी शिक्षकांच्या समोर मांडला. त्यावेळी दोन्ही शिक्षकांनी परसबाग तयार करण्याचे ठरविले. परसबागेसाठी सर्व विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांचा सहभाग घेतला.

खटाव तालुक्यामधील ललगुण केंद्रात एकूण १३ शाळांपैकी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी ललगुण या शाळेत इयत्ता १ ते ४ पर्यंतचे वर्ग आहेत. या शाळेत दोन शिक्षक कार्यरत आहेत. ही शाळा डोंगराच्या कुशीत वसलेली आहे. या शाळेच्या परिसरामध्ये परसबाग तयार झाली तर निश्चितच त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होईल. असे मला वाटले. यासाठी मी या नवोपक्रमाची निवड केली.

### • नवोपक्रमाची उद्दिष्टे :

१) विद्यार्थ्यांना कष्ट करण्याची सवय लावणे.
२) विद्यार्थ्यांना परसबागेत विविध भाजीपाला लावणेबाबत मार्गदर्शन करणे.
३) विद्यार्थ्यांना परसबागेतून स्वनिर्मितीचा आनंद घेऊन नियमित आहारात भाजीपाला वापरण्यास प्रेरित करणे.
४) आपले आरोग्य नियमितपणे सदृढ बनविण्यास मदत होणे.
५) विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षण क्षमता, सहकार्य व संघभावना वाढीस लावणे.
६) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे.

### • नवोपक्रमाचे वेगळेपण :

१) प्रत्येक कृतीतून परसबागेतील विविध अनुभवांचा आनंद घेता येतो.
२) विद्यार्थी स्वयंप्रेरित होऊन स्वयंअध्ययनातून शिकण्याचा आनंद घेतात.
३) परसबागेतली फळभाज्या व पालेभाज्यांचा वापर शालेय पोषण आहारात केल्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ होण्यात मदत होते.
४) विद्यार्थी स्वत: अनुभवातून कृतीतून सहजतेने शिकतात.

५) तसेच उपलब्ध साहित्यातून व ग्रामस्थाच्या मदतीने दर्जेदार परसबाग तयार होण्यास मदत होते.

६) तसेय हा उपक्रम कमी खर्चात व कमी वेळेत अधिक परिणाम देतो.

- **नवोपक्रमाचे नियोजन :**

**अ) उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षण :**

सुरुवातीला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी (ललगुण) या शाळेत इयत्ता १ ते ४ थी पर्यंत वर्ग आहेत. या मुलांना सकस आहार मिळावा म्हणून शाळेत ताज्या भाज्या उपलब्ध व्हाव्यात यासाठी शाळेला भेट दिली असता, शाळेच्या परिसरामध्ये परसबाग उपलब्ध नव्हती. त्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारामध्ये ताज्या भाज्या मिळत नव्हत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमितपणे सकस आहार मिळत नाही असे लक्षात आल्यावर या परसबागेची शाळेच्या परिसरामध्ये सर्वांच्या सहकार्यातून परसबाग तयार करण्याचे नियोजित केले.

**ब) संबंधित व्यक्तींशी, तज्ज्ञांशी चर्चा :**

सुरुवातीला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिंदेवाडी (ललगुण) या शाळेत इयत्ता १ ते ४ थी पर्यंत वर्ग आहेत. या मुलांना सकस आहार मिळावा शाळेत ताज्या भाज्या उपलब्ध व्हाव्यात यासाठी शाळेला भेट दिली असता शाळेच्या परिसरामध्ये परसबाग उपलब्ध नव्हती. त्यामुळे विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारामध्ये ताज्या भाज्या मिळत नव्हत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमितपणे सकस आहार मिळावा यासाठी शाळेतील शिक्षक, गामस्थ, पालक यांच्याशी चर्चा करुन हा नवोपक्रम राबविण्याचे ठरविले.

**क) आवश्यक साधनांचा विचार :**

या नवोपक्रमाची मांडणी करीत असताना शाळेत उपलब्ध असलेल्या विविध साधनांचा खोरे, पाटी, कुदळ, टेप, दोरी या साधनांचा उपयोग करुन विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ यांच्या मदतीने परसबाग तयार केली.

**ड) करावयाच्या कृतींचा क्रम :**

या उपक्रमासाठी सर्वप्रथम कृती आराखडा तयार करण्यात आला. बागेसाठी सुरक्षित जागेची निवड करण्यात आली. जागा समतोल करुन केर कचरा साफ करण्यात आला. जमिनीची मशागत केली. खोदकाम करुन जागा समतोल करण्यात आली. परसबागेमध्ये घ्यावयाची फळभाज्या पालेभाज्या इ. साठीची बियाणे निवड करण्यात आली. टेप पट्टीच्या व दोरीच्या साह्याने मोजमाप करुन वाफे तयार करण्यात आले. परसबागेच्या सुरक्षेसाठी सभोवताल तारेणे कुंपण तयार करण्यात आले. परसबागेसाठी पाण्याची योग्य व्यवस्था करण्यात आली. या उपक्रमामध्ये शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक यांच्याशी चर्चा करुन पालकांचा सहभाग मिळवला. पालक व विद्यार्थी शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य सर्वांनी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमामध्ये सर्वांनी आनंदाने मदत केली. हा उपक्रम ठराविक वेळेत पूर्ण करावयाचा होता. याकरिता तीन महिन्याचा कालावधी निश्चित करण्यात आला. त्यासाठी कच्चा आराखडा तयार करुन नियोजनानुसार उपक्रमाचे टप्पे पाडण्यात आले. ते पुढीलप्रमाणे -

1) जमिनीची मशागत व खोदकाम

2) मोजमाप करणे व वाफे तयार करणे

3) बियाणे रोपण व पाणी देणे

4) बागेला कुंपण करणे

5) विविध भाजी पाला व औषधी वनस्पती ची लागवड करणे

6) पाणी देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करणे

7) शालेय पोषण आहार साठी भाजी पाला चा नियमित पणे वापर करणे

**इ) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :**

उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण अंतर्गत उपक्रम राबविताना विद्यार्थी कृतीतून स्वयंनिर्मितीचा आनंदा घेताना दिसून आले. प्रत्येक विद्यार्थ्यांचे गट तयार करुन त्या गटामध्ये वाफे वाटून देण्यात आले. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांने आपल्या वाफेची निघा चांगल्या प्रकारे राखली. त्यामुळे फळभाज्या चांगल्या प्रकारे येऊ लागल्या. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने स्वतः केलेल्या परिश्रमामुळे आनंदी होऊन गेले. त्यामुळे शाळेमध्य व शाळेच्या परिसरामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण

झाले.

**फ) उपक्रमासाठी इतरांची मदत :**

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक मा. श्री. प्रविण जाधव सर व श्री. सागर राजेंद्र सुतार यांच्या मदतीने हा उपक्रम पूर्ण केला. तसेच पालकांचे व गावातील प्रतिष्ठीत नागरिकांचे सहकार्य लाभले. तसेच माझ्या कार्यायातील मा . गटशिक्षणाधिकारी भराडे मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख, माझे सर्व सहकारी मित्र व शालेय पोषण आहार विभागाच्या डेटा ऑपरेटर श्रीमती दिपाली भुजबळ मॅडम व सचिन जाधव सर, विषेश असे सहकार्य डायट फलटण येथील सर्व अधिकारी आणि श्री संदीप त्रिंबके सर याचे खूप खूप सहकार्य लाभले आहे.

**i) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे**






## • नवोपक्राची कार्यवाही

**i) पूर्व स्थितीची निरीक्षणे व त्यांच्या नोंदी**

जून २०२३ मध्ये जि.प. प्राथमिक शाळा, शिंदेवाडी (ललगुण) येथे भेट दिली असता. शाळेच्या परिसरामध्ये मोकळी जागा उपलब्ध होती. त्या जागेचा शाळेला व शाळेतील विद्यार्थ्यांना परसबागेच्या माध्यमातून फायदा व्हावा. यासाठी पसरबागेच्या माध्यमातून मी नवोपक्रम राबविला.



**ii) कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहिती संकलन**

जि.प. प्राथमिक शाळा, शिंदेवाडी (ललगुण) येथे मोकळ्या जागेमध्ये परसबाग तयार केली. या परसबागेमध्ये विविध प्रकारच्या फळभाज्या आल्यानंतर त्यांचा उपयोग शालेय पोषण आहारामध्ये विद्यार्थ्यांसाठी केला. त्यामुळे रोजचा पोषण आहार उत्कृष्ट होऊ लागला. या उपक्रमामुळे शालेय व गावचे वातावरण आनंदीमय झाले.

**iv) कार्यवाहीत आलेल्या अडचणी :**

नवोपक्रमाची कार्यवाही करताना वेळेची अडचण, उपक्रम राबविता असताना जमिनीवर केर-कचरा साफ करणे, वाफे तयार करणे, खोदकाम करणे अवघड होते. परंतु गावातील ग्रामस्थांच्या सहकार्याने ते पूर्ण करता आले. तसेच शालेय कामकाज बघत उपक्रम राबवत असताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. या सर्व अडचणीवर मात करत हा नवोपक्रम मी यशस्वी केला.

- **नवोपक्रमाची यशस्वीता :**

उद्दिष्टानुसार फलनिश्चत्ती बघता या उपक्रमातून मुलांना परसबागेतील फळभाज्या, पालेभाज्या बघून आनंद वाटू लागला.

1) विद्यार्थी परसबागेतील स्वयंनिर्मितीचा आनंद घेऊन उत्साहित झाले.

2) विद्यार्थी परसबागेतील फळभाज्या व पालेभाज्याचे पोषण आहारातील महत्व समजू लागले.

3) विद्यार्थी शेतीचे महत्व, शेतीची मशागत ठिकाणचे संरक्षण कसे करावे यावरुन त्यांना श्रमाचे महत्व समजले.

4) विद्यार्थी परसबागेचे संरक्षण व निगा राखू लागले.

5) विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारले.

अशा प्रकारे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक आला. विद्यार्थ्यासोबत शिक्षक, पालक यांना देखील हा उपक्रम बदल दिसून अतिशय उपयुक्त व महतवाचा आहे. त्यामळे हा नवोपक्रम यशस्वी झाला असे म्हणता येईल. 6)जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदेवाडी या शाळेचे सलग दोन वर्ष तालुकास्तरावर शालेय पोषण आहार स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे तसेच जिल्हास्तरावर गत वर्षी दुसरा क्रमांक मिळाला त्या यशामध्ये सर्व शिक्षक व विद्यार्थी आणि पालक,ग्रामस्थ यांचा मौलाच वाटा आहे.

सदरच्या शाळेत दरवर्षी परसबागेची नित्यपणे विविध प्रकारे भाजी पाला व औषध वनस्पती लावले जातात.

- **नवोपक्रमाचा समारोप**

महाराष्ट्र शासन, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्या मार्फत राज्यस्तरीय नवोपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये मी विषय सहायक, विषय साधन व्यक्ती या गटात सहभाग घेतला असून "चला बनवूया परसबागेतून मुलांचे सदृढ आरोग्य" हा नवोपक्रम मी राबवला. यामध्ये या उपक्रमामुळे विदर्थ्यांचा आत्मविश्वास वाढला. कष्ट व परिक्षम करण्याची सवय लागली. मुलांचे आरोग्य सदृढ होण्यास मदत झाली. माझ्या या उपक्रमासाठी पालक व विद्यार्थी यांनीदेखील खूप सहकार्य केले. माझ्या उपक्रमासाठी डायटचे प्राचार्य व सव्र सहकारी, पंचायत समिती खटाव, (वडूज) च्या गटशिक्षणाधिकारी श्रीमती प्रतिभा भराडे मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी सौ. संगिता गायकवाड मॅडम तसेच माझे सर्व सहकारी विषय साधन व्यक्ती, पंचायत समिती खटाव, (वडूज) यांचे या उपक्रमासाठी सहकार्य लाभले.

हा नवोपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. प्रविण जाधव सर यांचे मार्गदर्शन व श्री सागर सुतार सर यांचे सहकार्य लाभले. त्यांच्यामुळेच हा नवोपक्रम मी यशस्वी करु शकलो, त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

- **संदर्भ सूची व परिशिष्टे**


1. परसबाग एक उपक्रम

2 स्वच्छता अभियानअंतर्गत मार्गदर्शक

2. सकाळ वर्तमानपत्र / खजिना पुस्तिका



**सादरकर्ता- श्री. गणपत देवलू पवार**
पंचायत समिती खटाव (वडूज)
ता. खटाव जि. सातारा 415506, मो. 9766382292

# "शनिवार माझ्या आवडीचा... "

- **प्रस्तावना -**

शंभर टक्के मुले शाळेत आली पाहिजेत, ती शिकली पाहिजे, आणि ती शाळेत रमली पाहिजेत. यासाठी प्रत्येक शिक्षकाने तंत्रस्नेही व्हावे, म्हणून शासन तंत्रज्ञानाच्या अधिक सेवासवलती उपलब्ध करून देत आहे. शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे आम्ही शिक्षण देऊ, पण खरे शिक्षण देण्याचे काम शिक्षकांचे आहे. उपक्रमातून गट पद्धतीने, स्वशिक्षा, ज्ञानरचनावाद या माध्यमातून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी हा उपक्रम आहे. राज्यात १०० टक्के मुले शिकली पाहिजेत. एकही विद्यार्थी शैक्षणिक अप्रगत राहणार नाही, यासाठी शिक्षकांचे योगदानही महत्त्वाचे ठरणार आहे. विद्यार्थी गळती रोखा, शिक्षणाचा हा प्रगत माहोल असाच सुरू राहिल्यास खासगी शाळांच्या तुलनेत जिल्हा परिषदेच्या शाळा, नपा व मनपाच्या शाळा अधिक प्रगत होतील, शाळेतील विद्यार्थी गळती रोखण्यासह लोकसहभाग वाढवण्यासाठी शैक्षणिक आवड असलेली माणसे शोधून त्यांच्या मदतीने वार्ड, वाड्या, वस्ती व गाव शैक्षणिकदृष्ट्या प्रगत करण्याचे आवाहन झाले.

- **नवोपक्रमाची गरज व महत्व -**

माझी शाळा मनपा शाळा क्र. १७ सांगली येथील इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे विद्यार्थी संख्या - २०१ आहे. त्यांना वार्षिक नियोजनानुसार व नियमितपणे वर्गातील अध्यापनाचे विषय शिकविले जातात. तरीपण महाराष्ट शासनाच्या आनंददायी शिक्षण उपक्रमातुन अनेक उपक्रम राबविले गेले आहे. त्या उपक्रमांचा प्रभावी वापर करुन शाळा स्तरातील मुलांना आनंद घेता यावा म्हणून सांगली जिल्हा परिषद सांगलीने प्रत्येक शनिवारी " दप्तरा विना शाळा" हा उपक्रम राबविला जातो, त्याच दिवशी "शनिवार माझ्या आवडीचा.." या उपक्रमाचा विचार करण्यात आला. आपल्याला कोणीतरी मदत करेल या दृष्टीने सर्व मुलांना एकत्र करुन या उपक्रमातून नवीन काही तरी शिकायला मिळेल या भावनेतून हा उपक्रम मुलांच्यावर केंद्रीत करण्यात आले.

- **नाविन्यता -**

माझा हा नवोपक्रम माझ्या दृष्टीने इतराच्यापेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. यामध्ये - एकावेळी अनेक उपक्रम करण्याची संधी प्राप्त होते. हा उपक्रम विद्यार्थी हसत खेळत पूर्ण करु शकतो, मनावर कोणतेही दडपण येवू शकत नाही, शिक्षकांच्या योग्य त्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करतात. वेळेची बचत होऊन कृतीवर लक्ष केंद्रीत करता येते. मुलांना मार्गदर्शन व भरपूर सराव करायला मिळतो. योग्य वेळी वैयक्तिक लक्ष दिल्यामुळे कृती योग्य दिशेने होण्यास मदत होते. विविध उपक्रमातील

कृतीला योग्य संधीची जोड मिळते. मुले कृती आवडीने आत्मसात करतात. मुले एकमेकांच्या संगतीने शिकत असल्यामुळे त्याना योग्य मार्गदर्शकाची गरज लागते. अनेक उपक्रमात सहभागी होण्याची सर्वाना संधी मिळते. वर्गात आनंदी वातावरणाची निर्मिती होते.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे -**

१) आनंददायी शिक्षण उपक्रमाची ओळख करुन देणे.
२) आनंददायी शिक्षण उपक्रमातील घटकांची/ उपक्रमाची नांवे सांगणे.
३) आनंददायी शिक्षण उपक्रमाची रचना व कार्य सांगणे.
४) आनंददायी शिक्षण उपक्रमाची प्रत्यक्ष ओळख करुन घेवून प्रत्यक्ष राबविलेल्या कृतीचे निरीक्षण व कार्यवाही करणे.
५) आनंददायी शिक्षणाची उपक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

* **नवोपक्रमाचे नियोजन-** नवोपक्रम राबविणे निश्चित करताना या नवोपक्रमाविषयी मुलांना कोणती माहिती ज्ञात आहे, याबाबत चर्चा केली.

* **शाळा स्तरावर उपक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन -**
शाळा स्तरावर प्रत्यक्ष १४ आठवड्यामध्ये कामकाजाचे नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही - ( माहे - ०१ जुलै - २०२३ ते ३० सप्टेबर - २०२३)

**१) पहिला शनिवार (०१ जुलै २०२३) - Paper Fish -** कागदावर विविध आकाराची नक्षी काढून (पाणी, फुले, पतंग, मासा) यासारख्या कृतींना प्राध्यान्य देऊन तयार करण्यात आला. ही कृती पेपर फ्लॅश मध्ये दिसून येतो.

**२) दुसरा शनिवार (०८ जुलै २०२३) - Hand Stitches -** मुलांना अक्षर लेखनाची सवय व्हावी. सुंदर अक्षर यावे, म्हणून मुलांच्या विचारातून स्वतःचे नाव, एखादे अक्षर, एखादे वाक्य याबाबत लेखन करण्याची कल्पना मुलांना दिली त्याप्रमाणे कृती करण्यात आली.

**३) तिसरा शनिवार (१५ जुलै २०२३) - Nature Drawing -** निसर्गात काय असू शकतात, त्यानुसार कृतीत आणून चित्र काढण्याची संकल्पना मुलांना दिली. त्यानुसार मुलांनी चित्र काढले. त्यांच्यामध्ये कोणती कल्पना असु शकतात. याबद्दल कृती दिसुन आले. त्या पद्धतीनेच मुलांकडून या उपक्रमांचा सराव घेण्यास प्रेरित केले.

**४) चौथा शनिवार (२२ जुलै २०२३) - Winter Snowman Collage -** मुलांना विषय देऊन विषयाबद्दल वेगळी भूमिका तयार व्हावी. यासाठी "टाकाऊ पासून टिकाऊ" या संकल्पनेचा विचार करुन चिकटकाम ( कोलाज चित्र ) ही कृती तयार करण्यात आली.

**५) पाचवा शनिवार (२९ जुलै २०२३) 3D Drawing (Indian Map) -** चित्रकलेतील एक वेगळी कौशल्य म्हणून आज थ्रीडी कृतीतून कशाप्रकारे नकाशा तयार करावा याबाबत प्रत्यक्ष कृती करून घेतली. ह्या कृतीसाठी प्रत्येकाने प्रयत्न केला.

**६) सहावा शनिवार (०५ ऑगस्ट २०२३) - Making A Dairy (Small Dictionary) -** मुलांच्याकडून स्वतःसाठी एक डायरी करण्याची कौशल्य त्यांना प्रथम समजावून दिले. त्याप्रमाणे प्रत्येकाची वेगळी डायरी तयार करण्यास संधी दिली.

**७) सातवा शनिवार (१२ ऑगस्ट २०२३) - Model of India Map -** १५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्त भारत देशाचा नकाशा स्वतःच्या कल्पनेतून व रंगसंगतीच्या माध्यमातून तयार करण्यात आला. प्रत्येकाला कृतीमध्ये वेगळे कौशल्य करण्यास संधी मिळाली.

**८) आठवा शनिवार ( १९ ऑगस्ट २०२३) - Nature Drawing -** निसर्ग चित्राचा देखावा तयार करण्यास संधी देऊन तुम्हाला जे आवडेल ते चित्र रेखाटण्यास सांगितले व चित्र काढून घेतले. त्यातून प्रत्येकाचे कौशल्य नेमके काय आहे, हे मांडण्यात आले.

**९) नववा शनिवार (२६ ऑगस्ट २०२३) Making A Paper Apple -** कागदापासून सफरचंद (Apple) बनवणे. विविध कृतीद्वारे तयार करण्यात आले. कागद कामामध्ये विविध रंगसंगती व उठावदारपणा निर्माण करण्यात आला. हे एक शैक्षणिक साहित्य म्हणून वापर करण्यात आला.

**१०) दहावा शनिवार (०२ सप्टेंबर २०२३) - Teachers Day Special Greeting Card -** शिक्षक दिनाच्या वेळी विद्यार्थ्याकडून शिक्षकबद्दल असणारे प्रेम व्यक्त करण्यासाठी भेटकार्डाची सुरेख कल्पना विद्यार्थ्यांना दिली व त्यांच्या विचारातून नक्षीद्वारे तयार करण्यात आले. त्यामध्ये विविध आकारांची भेटकार्ड दिसून आली.

**११) अकरावा शनिवार (०९ सप्टेंबर २०२३) Hand Free Drawing -** मुलांच्यामध्ये मुक्तचित्राचा वापर कसा करावा व ती कशी काढली जातात त्याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणून एका कला शिक्षकाला बोलवून मुलांना मार्गदर्शन केले. व मुलांना स्वतःच्या कल्पनेतून तयार करण्यास सांगितले. कोणी निसर्गचित्र, कोणी रात्रीचा प्रसंग, कोणी वृक्षांची महत्व, मानवी जीवन कसे आहे, विविध प्रसंगावर चित्रे काढण्यात आली.

**१२) बारावा शनिवार (१६ सप्टेंबर २०२३) - Making A Wall Hanging -** भिंतीवर लावण्यासाठी सुशोभित पॉकेट तयार करण्यात आले. वापर कशासाठी केला जातो. त्यामध्ये पेन, लहान वही, विविध कार्ड, पेन्सिल, किल्ली, हे ठेवण्यासाठी विविध आकाराची फुले व नक्षीकाम करून भिंतीवर लावण्यात आली.

**१३) तेरावा शनिवार (२३ सप्टेंबर २०२३) - Wall Hanging Craft -** स्वतः मुलांच्या कडून विविध आकाराची मिळेल त्या कागदापासून कलाकुसर तयार करून भिंतीवर लावता येईल, असे डिझाइन कार्ड तयार करण्यात आले. त्यांची कृती कशी आहे, याबाबत प्रथम सर्वाना मार्गदर्शन केले.

**१४) चौदावा शनिवार (३० सप्टेंबर २०२३) - Homan Right Poster Drawing -** आज समाजात माहिती अधिकार हा विषय मोठ्या प्रमाणात आलेला आहे. या दृष्टिकोनातून मुलांच्या मनात भिती निर्माण होवू नये, म्हणून कशाप्रकारची माहिती आपल्याकडे घेता येते किंवा मागवता येते. त्यासाठी काय करावं व कोणत्या क्षेत्रात काय आहे याबाबतची चित्राच्या माध्यमातून माहिती संकलन तक्ता तयार करण्यात आला.

## • नवोपक्रमाची कार्यवाही-

मुलांना नवनविन माहिती व अनुभव प्रत्यक्ष कामातून मिळावा म्हणून मुलांना उपक्रमातून तो प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्यांचा आत्मविश्वास वाढावा. ज्ञान, कौशल्य, आकलन शक्ती, कल्पनाशक्ती आणि अभिव्यक्तीचा विकसित व्हावी या गोष्टीचे महत्त्व लक्षात घेऊन माहे - ०१ जुलै - २०२३ ते ३० सप्टेंबर - २०२३ या तीन महिन्यात १४ आठवड्यामध्ये शाळा स्तरावरचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले. राबविण्यात आलेले नियमित उपक्रमामध्ये कृतींचे योग्य पध्दतीने नियोजन व कार्यवाही बाबत मार्गदर्शन करुन कृतींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी उपक्रमांधारित अध्यापन शास्त्राचा वापर करण्यात आला. नियमित उपक्रमाबाबतची कृती करण्यात आली. वरीलप्रमाणे नियोजनानुसार उपक्रमाचे कामकाज निश्चित केले. शाळेला भेटी देऊन कौशल्य विकास कसा साध्य करता येईल याबाबत विचार विनिमय झाला. प्रत्यक्ष चर्चा करुन कामकाज करण्यात आले.

## • नवोपक्रमाची यशस्विता -

"शनिवार माझ्या आवडीचा..." या नवोपक्रमातून आपणास काय शिकायला मिळाले. व नाविन्यपूर्ण बाबी कोणत्या आहेत. त्या प्रत्यक्ष पहाता आल्या.

०१) उपक्रमातून निरीक्षण कौशल्यांचा योग्य पध्दतीने विकास साधता आला.

०२) एकमेकाशी कृती करुन झालेल्या कृतीविषयी माहिती मिळाली.

०३) सर्व उपक्रम वयोगटाला साजेसे असल्यामुळे एकमेकाशी जवळीकता साधता आली.

०४) मानवी परिस्थितीत झालेल्या कृतीतील बदल जुळवून घेण्याविषयी उपक्रमातून शिकायला मिळाले.

०५) वेगवेगळ्या बाबीतील कृतीशील घटकाचा उपयोग करुन याबाबत चर्चा करता आली.

०६) कोणत्या कृतीला प्रथम प्राधान्य द्यावे, याबद्दलानुसार वेगवेगळ्या कृतीची कारणे जाणून घेता आली.

०७) उपक्रमातील कृती करताना शरीराचा समतोल कसा स्थिर ठेवावा यांची माहिती मिळाली.

०८) उपक्रमातील कृती करताना कोणत्या गोष्टीना महत्व द्यावे, याचे ज्ञान प्राप्त झाले. ०९) उपक्रमातील कृतीची सखोल माहिती मिळाली. व मुलांना आनंद घेता आला. १०) या उपक्रमामुळे पट वाढीला व उपस्थितीला प्रत्यक्ष चालना मिळाली.










- **संदर्भसुची**

१) कृती संशोधन व नवोपक्रम (नोव्हेंबर २००६), गाडगीळ स्वाती, सुविचार प्रकाशन पुणे.
२) ज्ञानरचनावाद ओळख, शिक्षण संक्रमण (मार्च २०१०) म.रा.मा.व उ.मा. शिक्षण मंडळ पुणे.
३) उपक्रमामुळे शाळेची ओळख, जीवन शिक्षण (जुलै २०१७) महाराष्ट्र राज्य विद्या प्राधिकरण पुणे.
४) सांगली जिल्हा परिषद सांगली आनंददायी उपक्रम कार्यक्रम रुपरेषा - २०२२.
५) सांगली जिल्हा परिषद सांगली आनंददायी उपक्रम Happiness Programme अंमलबजावणी २०२२.

**सादरकर्ता-**
**श्री. भारत चिंतामणी बंडगर**
हुद्दा- विषय साधनव्यक्ती
एन.एन.पी., जि. सांगली

# हसत खेळत पद्धतीने विद्यार्थ्यांना वृत्तपत्र वाचण्याची सवयी लावणे

- **नवोपक्रमाची गरज आणि महत्व :**

पालकांचा व्यस्त दिनक्रम, मुलांचा अभ्यास, क्लासेस विविध स्पर्धा यात पालक तसेच मुलं व्यस्त असतात. जो काही रिकामा वेळ मुलांना मिळतो त्यात खेळ, टीव्ही आणि विशेषतः सहज उपलब्ध होणारा मोबाईल ही सध्याची डोकेदुखी बनत चालली आहे, खुप मुलांच्या घरी वर्तमानपत्रच येत नाही. ज्यांच्या घरी येते ती मुलं वर्तमानपत्र वाचत नाहीत. सध्याची विभक्त आणि चौकोनी कुटुंब पद्धती तसेच सर्व वातावरण मोबाईलमय झाले आहे. सोशल मीडिया इलेक्ट्रॉनिक मिडिया यांचा प्रभाव वाढत चालला आहे. याचे फायदे आहेत तसेच दुष्परिणामही आहेत, त्यातीलच एक दुष्परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन हे अतिशय कमी होत चाललेले दिसून येते. वाचनाची आवड मुलांमध्ये रुजवणे हे अत्यंत आवश्यक आहे. तासनतास मोबाईलच्या विळख्यात अडकलेल्या मुलांना बाहेर काढण्यासाठी वाचनासारख दुसरा पर्याय नाही. वाचन जसे पुस्तकांचे असते तसे ते मासिक आणि वर्तमानपत्रांचे ही असते. वर्तमानपत्र वाचण्याची सवय मुलांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

- **उपक्रमाचे वेगळेपण :**

अवांतर वाचन म्हणून दैनंदिन वर्तमानपत्र वाचण्याची सवयी लागेल, ती आयुष्यभर टिकेल त्यामुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास होण्यास मोलाचा हातभार लागेल.

- **उपक्रमाचे क्षेत्र**

शाळेतील इयत्ता ५वी ते ७ वीच्या एकूण २७४ विद्यार्थ्यांची या उपक्रमासाठी निवड करण्यात आली. या वयातील मुलांना वर्तमानपत्रात येणाऱ्या बातम्यांचा अर्थ समजू शकतो, आणि वर्तमानपत्र वाचण्याची सवय लागण्यासाठी हे योग्य वयोगट आहे. त्यामुळे या वयोगटाची निवड केली.

- **उपक्रमाची उपयुक्तता**

**१) वाचनाची सवय लागावी :** मुलांना पाठ्यपुस्तकां व्यतिरिक्त अवांतर वाचनाची सवय लागावी. अवांतर वाचनामुळे नवीन शब्दांचा संग्रह वाढेल. त्यायोगे भाषेवरील प्रभुत्व वाढेल. वाचन वेग वाढेल. भाषा समृद्ध होईल.

२) आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांचे ज्ञान मिळेल व त्यांच्या सामान्यज्ञानात भर पडेल.

३) रोज वर्तमानपत्र वाचल्याने मुलांना मेंदूला चालना मिळेल विविध विषयांचे वाचन केल्यामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास

वाढेल. त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी खुप मदत होईल.

- **उपक्रमाची उद्दिष्टे :**

१) विद्यार्थ्यांनमध्ये दैनंदिन वर्तमानपत्र वाचनाची आवड निर्माण करणे.

२) मुलांना कृतीतून हसतखेळत शिक्षण मिळावे.

३) सामान्य ज्ञानात भर पडावी व वाचनाची गती वाढविणे.

४) नवनवीन शब्दांमुळे शब्दसंग्रहात वाढ व्हावी तसेच अभ्यासक्रमातील भाषा विषयास पुरक वाचन व्हावे.

५) वाचन या छंदाची जोपासना होईल. दैनंदिन वर्तमानपत्राचे वाचन केल्यास व्यक्तीमत्व विकास होईल. तसेच मोबाईलचा वापर थोडाफार कमी होईल.

- **उपक्रमाचे नियोजन आणि कार्यवाही :**

शाळेच्या मुख्याध्यापिका आणि भाषा शिक्षक यांच्याशी वाचना संदर्भात चर्चा करण्यात आली. उपक्रमा संदर्भात काही अडचणी संभवल्या. त्यातून या चर्चेत मार्ग काढला गेला.

उपक्रमासाठी घेण्यात येणाऱ्या कृतींचे वेळापत्रक बनवले गेले. त्यानुसार एकेक उपक्रम पूर्ण करण्यात आला.

१) उपक्रम पूर्वस्थितीची पाहणी २) न्युज पेपर फीचर अँकर चार्ट ३) व्हिजिट टू लोकमत न्यूज पेपर प्रेस ४) न्यूज़ पेपर रिपोर्ट रीडिंग अँड हायलाईट नॉन फिक्शन पार्ट ५) न्यूज रिपोर्टर टॉक (वर्तमानपत्राच्या पत्रकाराशी गप्पा) ६) न्यूज़ पेपर एडिटर टॉक ( संपादकाशी संवाद / चर्चा ) ७) न्यूज़ पेपर ट्रेजरहंट ८) हायलाईट डेली न्यूज ९) न्यूज अनालिसिस १०) ॲडव्हर्टाईझ अनालिसिस ११) हेडलाई स्क्रम्बल, हेडलाईन ट्रान्सलेशन १२) डिस्प्ले ऑफ कॉमिक्स, क्रॉसवर्ड, सुडोकू



कलेक्शन १३) न्यूज पेपर रीडिंग क्वीझ १४ ) उपक्रम पूर्ण स्थिती निरीक्षण.

उपक्रम सुरू केल्यानंतर मुलं सांगितलेल्या उपक्रमात सहभाग घेऊ लागले. सुरुवातीलाच एक अडचण निर्माण झाली की प्रत्येक मुलाला वर्तमानपत्र उपलब्ध होत नव्हते. या अडचणीवर मात करण्यासाठी वर्गातील क्लास लायब्ररीत रोज वर्तमानपत्र ठेवण्याची शाळेने जबाबदारी घेतली. मुलांनी लोकमत पेपरच्या प्रेस भेटीच्या वेळी तेथील संपूर्ण प्रक्रिया अतिशय उत्स्फूर्त पणे जाणून घेतली आणि अनेक प्रश्न तेथील कर्मचारी वर्गाला विचारले. ॲल्युमिनियम प्लेट कशी तयार होते? ती मुख्य प्रिंटिंग मशीन मध्ये कशी जाते? त्याची प्रोसेस कशी असते ? फोर कलर्स थेरपी पेपर मध्ये कशी युज करतात ? मशीन मध्ये ब्लँक पेपरचे रोल लोड केले जातात. ग्लॉसी पेपर महाग असतो. तो बाहेरच्या देशातून मागवला जातो. पेपरचे रोल क्रेन मशीन ने कसे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जातात. प्रिंट झालेला पेपर पान नंबर प्रमाणे कसे अरेंज होतात आणि डिस्ट्रीब्यूटर काउंटरवर ऑर्डर प्रमाणे कसे गठ्ठे तयार होतात ही पूर्ण प्रोसेस मुलांनी जाणून



घेतली. एका दिवसात किती लाख पेपर प्रिंट होतात. मेन पेपर म्हणजे ? काय पुरवणी म्हणजे काय ? असे सगळ्या प्रश्नांची उत्तरं त्यांना प्रिंटिंग प्रेस मध्ये मिळाली.

प्रत्यक्ष भेटीनंतर जे जे उपक्रम वाचनासंदर्भात घेतले गेले ते अतिशय आवडीने व मनापासून मुलं लागली.

शाळेमध्ये प्रभात पेपरचे संपादक आणि लोकमत पेपर चे न्यूज रिपोर्टर यांचे चर्चासत्र मुलांसाठी घेतले गेले त्या चर्चासत्रामध्ये मुलांनी संपादक आणि रिपोर्टर यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. त्यांना अनेक प्रश्न विचारले पेपरसाठी बातम्या कशा तयार मिळवल्या जातात. त्या कशा लिहिल्या जातात, कुठली बातमी कोणत्या पानावर असते ? हेडलाईन



पुणे, शुक्रवार, दि. २८ जुलै २०२३

शाळा जगत

**काका, तुमच्या पेपरच्या पानाची शाई पसरत का नाही?**

पुणे : आम्ही आमच्या वहीवर शाईपेनने काही लिहिले आणि लगेच वही बंद केली तर ती शाई समोरच्या पानावर उमटते. मग तुमच्या पेपरवर क्षणामध्ये अक्षरे फोटोसाठी शाई फेकली जाते अन् काही सेकंदात पेपरची घडी घालून तो पेपर हातात दिला जातो. मग त्या पेपरची शाई समघडी समोरच्या पानावर कशी काय लागत नाही? असे प्रश्न विचारत शालेय मुलांनी 'लोकमत' कार्यालयातील प्रिंटिंग मशीनची संपूर्ण माहिती घेतली. निमित्त होते ते सिल्व्हर क्रेस्टच्या विद्यार्थ्यांची 'लोकमत'च्या प्रिंटिंग प्रेसला झालेल्या अभ्यास भेटीचे. दररोज सकाळी आपल्या घरी येणारा पेपर तयार कसा होतो, इतक्या बातम्या पेपरमध्ये येतात कुठून आणि पुण्यामध्ये लाखोंच्या घरात भल्या सकाळी पोहोचणारा पेपर छापायला आणि पोहोचायला वेळ किती व कसा लागतो असे असंख्य कुतूहलजनक प्रश्न मुलांच्या मनात होते. त्या कुतूहलाची उकल लोकमतच्या प्रिंटिंग प्रेसमध्ये आल्यावर मुलांना आली. यावेळी लोकमतचे प्रशांत कुलकर्णी, ब्रिजकुमार, आबासाहेब महाडिक आणि बजरंग शिंदे यांनी मुलांना 'लोकमत'ची माहिती दिली. मुख्याध्यापिका ॲड. अनुजा [illegible] यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला.

म्हणजे काय? बातमी मागची बातमी काय असते? कुठल्या वाचकांसाठी कुठले सदर येतात. न्युज पेपर मध्ये जाहिराती का असतात, बातमीची विश्वासार्हता कशी ठरवली जाते? न्यूज रिपोर्टर फिल्डवर कसा काम करतो, त्याला काय अडचणी येतात, तो कशी बातमी मिळवतो, संपादकाचे काय काम असते, अशा अनेक विषयाची माहिती मुलांनी ऐकून घेतले आणि भरपूर प्रश्न त्यांना विचारले. प्रिंट मीडिया हा विद्यार्थ्यांसाठी कसा उपयुक्त आहे हे त्यांना चर्चेतून कळले. पेपर प्रेसला भेट, संपादक आणि रिपोर्टरशी चर्चा यानंतर मुलांच्या वाचनामध्ये आणि सहभागात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत गेला. १५ ऑक्टोबर हा अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस न्युस पेपर डिस्ट्रिब्युटर दिवस शाळेत साजरा करण्यात आला. त्यात मुलांनी न्युज पेपर का वाचला पाहिजे याच्यावर डिबेट केले. डिस्ट्रिब्युटर ला गुलाबाचे फुल देऊन त्यांचे स्वागत केले.

- **नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पत्ती**

वर्तमानपत्र वाचनाचे सर्व उपक्रम ही कृतीयुक्त होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना फक्त वर्तमानपत्र वाचावयाचे नसून कृतीद्वारे पूर्ण करावयाचे होते. त्यामुळे एखाद्या खेळाप्रमाणे कंटाळा न करता उत्साहाने ते पूर्ण करत होते. ट्रेजर हंट, कॅची हेडलाईन, डेली न्यूज, नॉन फिक्शन पार्ट, गुड न्यूज, बॅड न्यूज हे शोधून काढणे चॅलेंजिंग वाटत होते. त्यामुळे अतिशय चिकाटीने मुलं ही शोधा शोधीची कृती करण्यात मुलं रमून जात होती. कॉमिक वाचणे, सुडोकू सोडवणे, खेळाच्या बातम्या, इकॉनॉमिक पेज जेथे विविध वस्तूंचे बाजारभाव बिझनेस न्युज, मनोरंजनाचे पान, वेदर फोरकास्ट, युद्धाच्या बातम्या, सिनेमांच्या बातम्या ही मुलांची आवडती सदरे आहेत. हे निरीक्षणांती लक्षात आले, स्टोरी पझल, जाहिरातींचे विश्लेषण, बातमीचे विश्लेषण, हेडलाईन ट्रान्सलेशन या कृती पुर्ण करण्यासाठी देखील मुले आनंदाने सहभागी होत. काही मुलांच्या घरी पेपर येत नाही परंतु आम्हाला पेपर वाचायला आवडते असेही मुलांनी नमुद केले. वर्तमानपत्र वाचन प्रश्नमंजुषा हा सर्वाधिक आवडलेला आणि उपक्रम संपला तरीदेखील अजुनही प्रश्नमंजुषेची आतुरतेने दर महिन्याला मुलं वाट पहातात.


**सादरकर्ती- सौ.आशा रामदास थोरात**

हुद्दा- ग्रंथपाल

शाळा- सिल्वर क्रेस्ट स्कूल

मो. ९६०४७१८६७३

V

# गट-५
# अध्यापकाचार्य व पर्यवेक्षीय यंत्रणा

# चला करू प्रगत वर्ग अभियान

## • प्रस्तावना-

पालक, शाळा, शिक्षक व समाज या सर्वांनी सर्वंकष पुढाकार घेऊन राज्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या भावी शिक्षणाचा पाया मजबूत करणे गरजेचे आहे.त्यासाठी भारत सरकारने निपुण भारत (National Initiative For Proficiency In Reading With Understanding and Numeracy) अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता ३ री पर्यंत मुलभूत साक्षरता व संख्याज्ञान ७ पर्यंत प्राप्त करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. दिनांक २२ जून २०१५ च्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाचे महाराष्ट्रातील शाळांमध्ये नियमितपणे जाणाऱ्या प्रत्येक मुलाने मुलभूत अध्ययन क्षमता प्राप्त करणे, कोणतेही मूल अभ्यासात मागे न राहणे हे ध्येय होते. याकरीता अधिकाऱ्यानी शाळा व्यवस्थापनाने व अधिक महत्त्वाचे म्हणजे शिक्षकांनी या कार्यक्रमाला गती दिली.

अपेक्षित क्षमता प्राप्त न करू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी "निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यास शासन मान्यता देत असून पुढीलप्रमाणे दिशानिर्देश करीत आहे. भाषिक कौशल्ये ३ ते ९ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचा प्रारंभिक भाषा विकास होण्यासाठी मातृभाषेमध्ये मौखिक भाषा ज्ञान, समजपूर्वक ऐकणे व त्याचे आकलन, मुद्रणशास्त्र व उच्चारशास्त्र यांच्या विकासाची जाणीव व लेखन कौशल्याचा विकास होणे गरजेचे आहे. भाषिक कौशल्ये प्राप्त होण्यासाठी भाषेचे पूर्वज्ञान मदतगार ठरेल, ज्या विद्यार्थ्यांचा मातृभाषेचा पाया मजबूत असतो, ते विद्यार्थी इंग्रजी वा अन्य भाषा अधिक सहजतेने शिकू शकतात.

गेली अनके वर्षे कागल तालुका शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यात अग्रेसर आहे. जसे प्रज्ञावान मुलांसाठी शिष्यवृत्ती, जिल्हा परिषद् प्रज्ञाशोध परीक्षेत शिक्षक स्वत:ला झोकून देऊन काम करतात तसंच काम अभ्यासात मागे असणाऱ्या भाषा, गणित, इंग्रजी विषयात पायाभूत क्षमता प्राप्त नसलेल्या गतीमंद विद्यार्थ्यांसाठी देखील काम करणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२२/२३ पासून कागल तालुक्यामध्ये शिक्षणाच्या प्रवाहात असणाऱ्या अशाप्रकारच्या अभ्यासात मागे / अप्रगत असणाऱ्या विदयार्थ्यासाठी "चला करू प्रगत वर्ग" अभियानाची यशस्वी अंमलबजावणी सुरु आहे याला तालुक्यातील शिक्षकांचा उत्स्फूर्तरित्या प्रतिसाद मिळत आहे.

## • नवोपक्रमाची गरज व महत्त्व

प्रत्येक मूल ही राष्ट्राची संपत्ती आहे त्यामुळे शिक्षणात मुलाला केंद्रबिंदू मानण्यात आले आहे. याचा अर्थ प्रत्येक मूल महत्त्वाचे आहे. प्रत्येक मुलाची प्रगती झाली तर कुटुंबाची पर्यायाने राष्ट्राची प्रगती होत असते. त्यामुळे शाळेत प्रवेश घेतलेले प्रत्येक मूल शिकणे महत्त्वाचे आहे. पण आज १००% मुले शिकत नसल्याचे विविध संस्थांच्या तसेच शासन स्तरावरील

अहवालातून स्पष्ट होताना दिसत आहे. यात खालील बाबी स्पष्ट दिसून येतात एकंदरीत १००% मुले शिकण्यामध्ये खालील अडचणी दिसून येतात.

१. सक्तीच्या वयोगटातील १००% मुले शाळेत दाखल होत नाहीत.

२. शाळेत दाखल झालेली सर्व मुले टिकत नाहीत

३. शाळेत दाखल झालेली १००% मुले शिकत नाहीत १००% मुले न शिकण्या पाठीमागे महत्त्वपूर्ण कारणे आहेत. ती म्हणजे काही मुले गतिमंद असतात. तर काही मुले मतिमंद असतात. वस्तूस्थिती जाणून घेतली तर मतिमंद विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. पण गतिमंद विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे. यासाठी कोल्हापूर जिल्हा परिषद शाळासाठी विविध उपाययोजना, प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## • चला करू प्रगत वर्ग अभियानाचे वेगळेपण

१५ ते २०% इतक्या संख्येने अप्रगत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी भाषा व गणित मूलभूत क्षमता प्राप्त नसल्यास काहीतरी उपाय योजना करणे आवश्यक होते. शिवाय हे विद्यार्थी असेच अप्रगत राहिले तर त्यांच्या भावी शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होण्याची तसेच या विद्यार्थ्यांना आपल्याला काही येत नाही हा न्यूनगंड त्यांच्या मनामध्ये निर्माण होऊन ती शाळाबाह्य होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा अशा विद्यार्थ्यांकडे शिक्षकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी 'चला करू प्रगत वर्ग' या अभियानाची गरज वाटते मुळात अशा विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बहुतांशी शिक्षकांचा नकारात्मक दिसून येतो त्यामुळे काही वेळा हे विद्यार्थी वर्गामध्ये दुर्लक्षित राहू शकतात अशावेळी शिक्षकांचा या विद्यार्थ्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे प्रेरणा देणे आवश्यक होते. तथापि अप्रगत राहिले म्हणून त्यांना जबाबदार धरण्यापेक्षा त्यांचे लक्ष अशा विद्यार्थ्यांच्याकडे वेधून त्यांना प्रोत्साहित करणे संयुक्तिक वाटते माजी शिक्षण सचिव मा. नंदकुमार सर नेहमी म्हणत शिक्षक काम करतात त्यांना प्रेरणा द्या या विचारानुसार शिक्षण विभाग पंचायत समिती कागल गेली पाच वर्षे काम करत आहे शिष्यवृत्ती, जि प प्रज्ञाशोध परीक्षेत उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहित करण्यासाठी तालुका स्तरावर त्यांचा यथोचित गुणगौरव कार्यक्रम घेतला जातो. स्पर्धा परीक्षेत गुणवत्ता यादीत विद्यार्थ्यांना आणणे हे जसे महत्त्वाचे उल्लेखनीय काम आहे तसेच १००% वर्ग प्रगत करणे हे देखील उल्लेखनीय काम आहे हे त्यांच्या लक्षात आणून देणे महत्त्वाचे आहे.

## • नवोपक्रमाची उद्दिष्टे-

१) प्रत्येक विद्यार्थ्याला प्रभुत्व पातळीकडे घेऊन जाणे.

२) गुणवत्ता 'वाढीसाठी पोषक वातावरण तयार करणे.

३) तसेच संपादणूक पातळी वाढविण्यासाठी शिक्षकांना साहाय्य करणे.

४) मूलभूत क्षमतांची परिपूर्ण तयारी करून घेणे.

५) जिल्हा परिषद शाळांच्या बाबतीत समाजात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे.

६) कोणतेही अभिलेखे / दप्तर ठेवण्याची आवश्यकता नाही, फक्त विद्यार्थी गुणवत्ता तपासणे हा एकमेव उद्देश या अभियानाचा आहे.

## • नवोपक्रमाचे नियोजन

प्रशिक्षण-सदर उपक्रमाची सर्व शिक्षकांना माहिती होण्यासाठी तालुका व केंद्रस स्तरावर प्रशिक्षण व कार्यशाळा घेण्यात आल्या. तसेच मासिक शिक्षण परिषद व मुख्याध्यापक मिटिंगमध्ये सदर उपक्रमाची माहिती व कार्यपद्धती विषयी मार्गदर्शन करण्यात आली.

**समिती स्थापना-** प्रगत वर्गांची पडताळणी करण्यासाठी तालुका स्तरावर विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, तज्ञ शिक्षक

यांची समिती नेमण्यात आली.

- **मूल्यमापन कालावधी**

  **केंद्रस्तरीय मूल्यमापन :-** केंद्रस्तरीय मूल्यमापन जानेवारी २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात केले जाईल.
  **तालुकास्तरीय मूल्यमापन :-** तालुकास्तरीय मूल्यमापन जानेवारी २०२४ च्या चौथ्या आठवड्यात केले जाईल.

- **नवोपक्रमाची कार्यवाही**

वरीलप्रमाणे नियोजन केल्यानंतर तालुक्यातील सर्व शिक्षक, मुख्याध्यापकयांना सूचना देऊन फेब्रुवारी / मार्च २०२३ मध्ये पुन्हा प्रगत वर्गांची तपासणी करून प्रत्येक इयत्तेतील १००% प्रगत वर्गांची निवड करून त्या वर्गाना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा तालुका स्तरावर यथोचित सन्मान करण्याचे ठरविले. याप्रमाणे फेब्रुवारी / मार्च २०२३ मध्ये शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, तज्ञ शिक्षक यांच्या मार्फत तालुक्यातील सर्व इयत्तानिहाय वर्गांची तपासणी करून माहिती संकलित केली. सदर उपक्रम राबवण्यापूर्वीची अप्रगत संख्या व अंमलबजावणी नंतरची अप्रगत संख्या यांचा तुलनात्मक तक्ता तयार करून उपक्रमाच्या यशस्वीतेची पडताळणी करण्यात आली.


"चला करू प्रगत वर्ग" अभियान

निवडीचे निकष

**अ) चला करू प्रगत वर्ग अभियान**

१) निपुण भारतच्या धर्तीवर इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या भाषा व गणित विषयासाठी निकष तयार केले.
२) १००% विद्यार्थ्यांची अध्ययनस्तर निश्चिती.
३) उपचारात्मक अध्यापन पद्धतीचा वापर.
४) १००% विद्यार्थ्यांना इयत्ता निहाय १००% क्षमता प्राप्त झालेल्या वर्गाचे इतर केंद्रातील समितीमार्फत तपासणी.
५) प्रत्येक केंद्रातील पहिल्या आलेल्या शिक्षकामधून तालुकास्तरावर क्रमांक काढून त्यांचा सत्कार.

## चला करू प्रगत वर्ग अभियान (कागल)

| | १ ली | | २ री | | ३ री | | ४ थी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अभियाना पूर्वी | अभियाना नंतर | अभियाना पूर्वी | अभियाना नंतर | अभियाना पूर्वी | अभियाना नंतर | अभियाना पूर्वी | अभियाना नंतर |
| पट | 2180 | 2180 | 2977 | 2977 | 2490 | 2490 | 2735 | 2735 |
| प्रगत | 1920 | 2079 | 2714 | 2903 | 2114 | 2361 | 2227 | 2550 |
| अप्रगत | 260 | 101 | 263 | 74 | 376 | 129 | 308 | 185 |
| अप्रगत टक्के | 12% | 4.63% | 9% | 2.48% | 15% | 5.18% | 18.50% | 6.76% |

| | ५ वी | | ६ वी | | ७ वी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | अभियानापूर्वी | अभियाना नंतर | अभियानापूर्वी | अभियाना नंतर | अभियानापूर्वी | अभियाना नंतर |
| पट | 1950 | 1950 | 1778 | 1778 | 1675 | 1675 |
| प्रगत | 1813 | 1894 | 1641 | 1721 | 1559 | 1620 |
| अप्रगत | 137 | 56 | 137 | 57 | 116 | 55 |
| अप्रगत टक्के | 7% | 2.87% | 7.70% | 3.20% | 6.92% | 3.28% |

- **नवोपक्रमाची यशस्विता**








**सादरकर्ते- डॉ.गणपती कमळकर,**
हुद्दा- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, कागल

# केंद्रशाळा प्रशासन व केंद्रप्रमुखाची बदलती भूमिका

- **नवोपक्रमाची गरज व महत्व -**

केंद्रीय प्राथमिक शाळांची स्थापना केल्यानंतर शिक्षणाचे विकेंद्रीकरण करून त्या शाळेच्या परिसरातील प्राथमिक शाळांना केंद्रीय प्राथमिक शाळांनी शैक्षणिक मार्गदर्शन करावे असे धोरण ठरविण्यात आले. या केंद्रीय प्राथमिक शाळा एक उत्कृष्ट शैक्षणिक संकुल म्हणून सर्वांना मार्गदर्शक ठराव्यात यासाठी तेथे एक स्वतंत्र पूर्णवेळ प्रशिक्षित पदवीधर केंद्रप्रमुखाचे पद निर्माण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी किमान अध्ययन पातळी प्राप्त करण्यासंदर्भात मूल्यमापन करणे, केंद्रात चांगले शैक्षणिक वातावरण निर्माण करणे, शिक्षकांची गट संमेलने आयोजित करून नवनवीन शैक्षणिक संकल्पना शिक्षकापर्यंत पोहचविणे इत्यादि जबाबदाऱ्या केंद्रप्रमुख यांच्याकडे देण्यात आल्या.

सध्याच्या काळात केंद्रशाळा ही एक शैक्षणिक संशोधन संस्था म्हणून जबाबदारी पार पाडेल अशी अपेक्षा करण्यात आली आहे. केंद्रप्रमुख यांनी केंद्रातील शैक्षणिक समस्या संदर्भात मासिक बैठका घ्याव्यात, शाळा व्यवस्थापन समिती व स्थानिक संस्था यांच्या बैठका घेऊन शाळेची प्रगती करावी, शाळाबाह्य एकही मूल राहू नये तसेच केंद्रातील सर्व शाळांना नियमित भेटी देऊन त्यांना नियमित मार्गदर्शन करावे असे अपेक्षित आहे. यासाठी केंद्रप्रमुख यांनी कसे काम करावे यासाठी संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे -**

1. ऑनलाइन कामकाज संदर्भात वार्षिक योजना तयार करणे. शैक्षणिक वर्षात Student Portal, UDISE plus, शाळा सिद्धी इत्यादि कामकाज पूर्ण करावे लागते. या कार्यावर शिक्षकांचा जास्त वेळ जाऊ नये यासाठी कार्ययोजना तयार करणे.

2. शिक्षकांना विविध उपक्रमाची माहिती देणे, तसेच प्रशासनाला आवश्यक ती माहिती गोळा करणे यासाठी वारंवार मुख्याध्यापक सहविचार सभा घ्याव्या लागतात. त्यामुळे शिक्षकांचा वेळ वाया जातो. हे होऊ नये यासाठी आधुनिक सामग्री उदा. झूम, गूगल मिट याद्वारे ऑनलाइन पद्धतीने सभा घेऊन शिक्षकांचा वेळ वाचविणे.

3. सध्या राज्य, जिल्हा, तालुका तसेच केंद्र पातळीवर गुणवत्ता कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. याद्वारे केंद्रातील विद्यार्थ्यांची गुणवता वाढावी यासाठी केंद्रप्रमुखामार्फत प्रयत्न करणे.

4. आधुनिक साधनांचा तसेच विविध नावीन्यपूर्ण उपक्रमाद्वारे शिक्षण परिषदा आयोजनाचा हेतु यशस्वी करणे. शिक्षण

परिषदा अधिकाधिक फलदायी करण्यासाठी नावीन्यपूर्ण योजना आखणे व त्याची यशस्वी अंमलबजावणी करणे.

- **नवोपक्रमाचे नियोजन -**

जिल्हा तसेच तालुकस्तरावरून विविध माहिती मागितली जाते, तसेच जिल्हा तसेच तालुका स्तरावरून विविध उपक्रमाबाबत माहिती शाळेच्या मुख्याध्यापक तसेच शिक्षकांना देणे आवश्यक असते.

त्यासाठी वारंवार मुख्याध्यापक सहविचार सभा आयोजित केल्या जात. शिक्षकांचा वेळ वाया जाऊ नये पण शासनाचे विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले जावेत, शाळेतील विविध माहिती मात्र प्रशासनपर्यंत वेळेत पोहोचावी यासाठी एक वेगळी पद्धती राबविणे आवश्यक होते. सध्याचे युग हे ऑनलाइन कामकाजाचे युग आहे. यामध्ये शिक्षण क्षेत्र कसे वेगळे राहू शकते ? शासनाकडून शिक्षण क्षेत्रातील माहिती ही वेळेत मिळावी यासाठी विविध पोर्टल ची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये शिक्षक प्रभावीपणे काम कसा करू शकेल ? विद्यार्थ्यामधील कला व क्रीडा गुणांना वाव देण्यासाठी या स्पर्धामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यानी सहभागी होणे आवश्यक आहे. त्यासाठी केंद्रप्रमुख म्हणून काय करता येईल यावर विचार होणे आवश्यक होते.

केंद्रप्रमुख म्हणून काम करताना सुरुवातीलाच या अडचणी लक्षात येत होत्या. मग याविषयी काय करता येईल याविषयी विचार केला असता आपण या क्षेत्रातील तज्ञांचा सल्ला घेतल्यास बहुतांश अडचणी सुटतील हे लक्षात आले. यासाठी गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, ज्येष्ठ शिक्षक यांच्याशी यासंदर्भात सविस्तर चर्चा केली. केंद्रप्रमुख म्हणून कार्यरत असताना या नवपक्रमाशी संबंधित जी साधने उपलब्ध होतील त्या सर्वांचा विचार करून एक आराखडा ठरविला.

- **नवोपक्रमाची कार्यवाही-**

शिक्षक आपल्या शाळेत कार्य करत असताना त्याला विविध अडचणी येतात. त्या सर्व अडचणींची चर्चा आपण वर केलेली आहे. या समस्यांना सोडविण्यासाठी केंद्रप्रमुख म्हणून आपण काय करू शकतो याचा विविध पातळीवर मी विचार केला. शाळेविषयी जी विविध ऑनलाईन कामे करावी लागतात तसेच प्रत्यक्ष अध्यापन करत असताना शिक्षकांना ज्या अडचणी येतात या सर्वांचा सविस्तर विचार करून काही उपक्रम आणि कृती निश्चित केल्या. हे सर्व उपक्रम शैक्षणिक वर्षात कधी घेता येतील यासंबंधी सविस्तर नियोजन केले. आणि त्याची प्रत्यक्ष राबवणूक करण्यास सुरुवात केली. Student पोर्टल, UDISE +, यावर नियोजनबद्ध पद्धतीने काम करून यावरील सर्व कामकाज वेळेत पूर्ण केले.

**अ) केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्ष -**

या केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्षाच्या माध्यमातून अजूनही काही उपक्रम सुरू करण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र शासनाचा शिक्षण विभाग वेळोवेळी विविध निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, कथाकथन तसेच वक्तृत्व स्पर्धा घेत असतो. अनेक वेळा या उपक्रमांची शाळेला वेळेत माहिती मिळत नसल्याने त्यांचे विद्यार्थी या स्पर्धांमध्ये सहभाग घेत नाहीत. मात्र केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्षाच्या माध्यमातून शासनाचे जे असे नवीन विद्यार्थ्यांसाठी उपक्रम येत असतात, त्या उपक्रमांची वेळोवेळी नोंद घेतली जाते आणि यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावा यासाठी शाळांना प्रोत्साहन दिले जाते.

**ब) दप्तराविना शाळा उपक्रम -**

आपण दप्तराविना शाळा या दिवशी कोणते उपक्रम आयोजित करू शकतो याची शिक्षकांना चांगल्या पद्धतीने माहिती नव्हती. यावर्षी आम्ही सर्व शिक्षकांना दप्तराविना शाळा या उपक्रमामध्ये आपण कोणते उपक्रम आयोजित करू शकतो याची यादी तयार करण्यास सांगितले. जून महिन्याच्या शिक्षण परिषदेमध्ये याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच केंद्रीय सल्लागार समिती आणि केंद्रीय गुणवत्ता कक्ष यांच्या माध्यमातून याविषयी एक सविस्तर नियोजन करण्यात आले.

**क) केंद्रातील शिक्षकांमध्ये विद्यार्थी गुणवत्ते संदर्भात स्पर्धात्मक वातावरण -**

प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद मार्फत विविध बौद्धिक आणि क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्ष आणि केंद्रीय सल्लागार समिती तसेच शिक्षण परिषदा यामध्ये या दोन्ही स्पर्धा वर सविस्तर विचार करून या संदर्भात एक नियोजन तयार करण्यात आले. या स्पर्धांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा अशा पद्धतीचे प्रयत्न या माध्यमातून करण्यात आले. द्धिक आणि क्रीडा स्पर्धे बरोबरच ज्या शिष्यवृत्ती परीक्षा जिल्हा परिषद मार्फत आयोजित करण्यात येतात त्यांचे सुद्धा नियोजन करण्यात आलेले आहे.

**ड) शाळा भेटीवेळी केंद्रप्रमुखाची भूमिका -**

केंद्रप्रमुख ज्यावेळी शाळेस भेट देतो त्यावेळी त्याने पूर्ण वेळ, पूर्ण दिवसभर त्या शाळेमध्ये थांबणे आवश्यक आहे. यामुळे तो प्रत्येक वर्गातील मुलांची वैयक्तिक अध्ययन क्षमता याची नोंद घेऊ शकतो. केंद्रप्रमुख आणि आपल्या भेटीवर फक्त रेकॉर्डची तपासणी न करता मुलांची सुद्धा अध्ययन पातळी तपासणी आवश्यक आहे. त्यामुळे मी या वर्षीपासून प्रत्येक शाळेला भेट देताना केवळ 'भेटीसाठी भेट' असे धोरण न ठेवता आपल्या त्या शाळेतील मुलांना किमान अध्ययन क्षमता प्राप्त झालेल्या आहेत का याकडे सुद्धा लक्ष देतो.

**इ) शिक्षण परिषदा आणि केंद्रप्रमुख भूमिका -**

शिक्षण संदर्भात ज्या नवनवीन संकल्पना विकसित होत आहेत त्या संदर्भात शिक्षकांना या शिक्षण परिषदेमध्ये माहिती पुरविली जाते. शिक्षण परिषदा आयोजित करण्याची आणि त्या योग्य वातावरणात पार पाडण्याची संपूर्ण जबाबदारी ही केंद्रप्रमुखाकडे सोपवण्यात आलेली आहे.

**फ) केंद्राचे स्वतंत्र यू ट्यूब चॅनेल -**

केंद्रातील सर्व शाळा हे विविध उपक्रम राबवितात. त्या उपक्रमाचे व्हिडिओ तयार करून ते कवठे महांकाळ केंद्राच्या यू ट्यूब चॅनेल वर अपलोड केले जातात. त्यामुळे आपल्या शाळेतील उपक्रम सर्वत्र पहिले जातात. त्या उपक्रमाचा लाभ सर्वांनाच होतो. केंद्रातीलच काही तंत्ररुहेही शिक्षकांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जात आहे.

- **नवोपक्रमाची यशस्विता**

हा नवोपक्रम सुरू करण्यापूर्वी काही शिक्षक आपली शाळा सिद्धि, स्टुडन्ट पोर्टल, यु-डायस प्लस अशा विविध ऑनलाईन पोर्टलवर माहिती स्वतः न भरता इतर कॉम्प्युटर सेंटर मध्ये भरल्यामुळे शिक्षकांचा वेळ व पैसा वाया जात होता. परंतु या उपक्रमामध्ये ही माहिती शिक्षकांनी स्वतः भरावी यासाठी योग्य नियोजन आणि अंमलबजावणीसाठी माहिती पुरवण्यात आली. त्यामुळे शिक्षकांचा खूपच वेळ आणि श्रम वाचले. यामुळे शिक्षकांचा पर्यायाने विद्यार्थ्यांचा खूप फायदा झाला. विद्यार्थ्यांना हा अतिरिक्त वेळ मिळाल्याने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यास मदत झाली. गुणवत्ता कक्षाच्या माध्यमातून केंद्राची गुणवत्ता वाढावी ही अपेक्षा आहे. या गुणवत्ता कक्षाच्या माध्यमातून विविध उपक्रम आयोजित करून ते यशस्वी केले. शिक्षण परिषदा मध्ये केवळ अध्यापन न करता प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शिक्षकांना विविध विषय समजावून दिले. स्टुडन्ट पोर्टल, यु-डायस पोर्टल, शाळा सिद्धि यांच्यामध्ये काम करत असताना येणाऱ्या अडचणींची ही चर्चा या शिक्षण परिषदेमध्ये करण्यात आली. त्यामुळे दैनंदिन कामकाज करताना शिक्षकांना येणाऱ्या अडचणींची सोडवणूक वेळीच झाल्याने सर्व ऑनलाईन कामकाज वेळेत पूर्ण करण्यात सर्व शिक्षकांना यश मिळाले.

- **समारोप -**

गुणवत्तापूर्ण शिक्षण पुरविणे हे ध्येय साध्य करण्याचा प्रक्रियेतील शाळांची नियतकालिक तपासणी व पर्यवेक्षण ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. अशा प्रकारची तपासणी करण्याकरिता व त्याचबरोबर विद्यार्थी व शिक्षकांना प्रशिक्षण व मदत

पुरवण्यामध्ये केंद्र शाळा ही महत्त्वाची भूमिका बजावते. याच संदर्भात शिक्षकांमध्ये सतत व्यावसायिक सुधारणा घडवून आणण्याकरिता एक शैक्षणिक व अभ्यासक्रम विषयक सुयोग्य अशी मदत प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. केंद्र शाळा ही शैक्षणिक संशोधन संस्था म्हणून शिक्षकांसाठी काम करेल, केंद्रप्रमुखांनी केंद्रातील शैक्षणिक समस्येवर उपाययोजना करावी, यांच्या शाळा व्यवस्थापन समिती यांना भेटी देऊन शैक्षणिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा, शाळबाहय मुले केंद्रात राहू नयेत असा शासनाचा उद्देश आहे. हा नवोपक्रम आम्ही राबवल्यामुळे केंद्रातील सर्वच समस्या सुटण्यास मदत झाली आहे.

- **संदर्भसूची -**


1. केंद्रीय प्राथमिक शाळांची स्थापना करणे बाबत शासन निर्णय दिनांक 14 नोव्हेंबर 1994
2. केंद्र शाळांच्या माध्यमातून शाळांची कामगिरी सुधारण्याकरता सूचना दिनांक 20 जानेवारी 2020
3. राज्यस्तरीय कार्यक्रम सल्लागार समिती आणि जिल्हा तालुका केंद्रस्तरीय गुणवत्ता कक्ष यांची पुनर्रचना करणे बाबत शालेय शिक्षण क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडील शासन निर्णय दिनांक दहा पाच दोन हजार तेवीस
4. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009
5. जीवन शिक्षण मासिक या तर्फे प्रसिद्ध करण्यात आलेला केंद्र परिषद विशेषांक



**सादरकर्ते- संतोष पवार**

हुद्दा- केंद्रप्रमुख

शाळा- कवठे महाकाळ, जि. सांगली




# सजग व संवेदनशील नागरिकत्वासाठी शालेय विद्यार्थ्यांना संविधान शिक्षण

- **प्रस्तावना-**

'आजादी का अमृत महोत्सव' साजरा करत असताना काही दिवसाचा उत्सव साजरा करून नंतर विसरून जाण्याऐवजी भारत देशाला दीर्घकाळ उपयुक्त ठरेल असे रचनात्मक काम आपण आपल्या कार्यक्षेत्रात केले पाहिजे या जाणिवेतून आज शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमधून देशाचे भावी सजग व संवेदनशील नागरिक घडवावेत या उद्देशाने संविधान शिक्षण उपक्रम 15 ऑगस्ट 2021 पासून सुरू करण्यात आला. भोर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या 274 शाळांमध्ये शिकणाऱ्या 9741 विद्यार्थ्यांना सुरुवातीला कृतीपत्रिकेच्या माध्यमातून संविधान शिक्षण देणे सुरू केले, कारण त्यावेळी कोविड- 19 मुळे शाळा बंद होत्या परंतु घरी राहून विविध मार्गाने विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू होते. अशा स्थितीत सह्याद्रीच्या डोंगररांगेत वसलेल्या भोर तालुक्यातील दुर्गम डोंगरी भागातील विद्यार्थ्यांचे शिकणे सुरू राहावे म्हणून 'इंटिग्रेटेड लर्निंग वर्कशीट' हा मार्ग निवडला होता. या अंतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या इयत्तेच्या सर्व विषयांचे त्या-त्या महिन्यातील घटकांवर आधारित कृतीपत्रिकांची छापील प्रत घरपोच वाटप केली जात असे. या कृतीपत्रिकेमध्ये दरमहा संविधान शिक्षणावर आधारित एका घटकाचा QR कोड व त्यावर आधारित कृती दिलेल्या असत. विद्यार्थी आपल्या पालकांच्या मोबाईल वरून तो QR कोड स्कॅन करून व्हिडिओ पहात व त्यावर आधारित कृती करत. शिक्षक गृहभेटीदरम्यान विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करत असत, तसेच आवश्यक तेथे अतिरिक्त मार्गदर्शन करत असत. कृतीपत्रिकेच्या माध्यमातून दिलेल्या संविधान शिक्षण उपक्रमाचा रचना संस्था पुणे यांच्याद्वारे इम्पॅक्ट स्टडी करण्यात आला. यात यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या 10% शाळेतील 25% विद्यार्थ्यांचा तोंडी, लेखी व प्रात्यक्षिक प्रतिसाद आणि त्यासोबतच त्यांचे शिक्षक, पालक व पर्यवेक्षण यंत्रणा यांचे प्रतिसाद नोंदविण्यात आले. तज्ज्ञांमार्फत या माहितीचे विश्लेषण व पडताळणी करून अहवाल जाहीर करण्यात आला. त्यानुसार सजग व संवेदनशील नागरिक घडवण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त असून तो अधिक सुव्यवस्थितरीत्या अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करून राबवावा असे निष्कर्ष आमच्या हाती आले. त्यानुसार पेडागॉजीची उत्तम जाण असणाऱ्या 13 शिक्षकांचा संविधान शिक्षण अभ्यास गट तयार करण्यात आला. या अभ्यास गटाने सात महिने भारतीय संविधान, संविधानावर आधारित संदर्भ साहित्य, राज्यसभा टीव्ही ची 'संविधान' सिरीज इत्यादी साधनांचा अभ्यास करून संविधान शिक्षण पाठ्यक्रम तयार केला. हा पाठ्यक्रम शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये संपूर्ण वर्षभर राबविण्यात आला. त्यातून आज शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमधून देशाचे भावी सजग व संवेदनशील नागरिक घडवण्यासाठी संविधान शिक्षण हा उपक्रम उपयुक्त आहे असे सिद्ध करणा-या अनेक यशोगाथा आम्हाला आढळून आल्या.

- **नवोपक्रमाची गरज व महत्त्व-**

‘भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' साजरा करत असताना देशाला दीर्घकाळ उपयुक्त ठरतील असे सजग व संवेदनशील नागरिक घडवणे या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय 6 ऑक्टोबर 2021 यामध्ये शिक्षण विभागाने राबवायाच्या उपक्रमामध्ये 'नागरिकशास्त्र व संविधानाची तोंड ओळख करून देणारे उपक्रम राबवणे' असे उद्दिष्ट देण्यात आले होते. या उद्दिष्टाला अनुरूप-

1) आज शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमधून देशाचे भावी सजग व संवेदनशील नागरिक घडवण्यासाठी हा उपक्रम गरजेचा आहे.
2) भारतातील विविधता व बहुसांस्कृतिकतेचा स्वीकार करून राष्ट्रीय एकात्मता वाढवण्यासाठी उपक्रम गरजेचा आहे.
3) बाल संरक्षणाच्या दृष्टीने विचार करता बालकांवर होणारे अत्याचार व त्याविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी उपक्रमाची गरज आहे.
4) भारतीय लोकशाही शासनप्रणाली व विविध प्रशासकीय संस्था यंत्रणा यावरील विश्वास दृढ करण्यासाठी या उपक्रमाची गरज आहे.
5) बालककेंद्री शाळा बनवून आनंददायी शिक्षण देण्यासाठी हा उपक्रम गरजेचा आहे.

भारतीय संविधानातील मूल्य व काही बाबी सद्यस्थितीत नागरिकशास्त्र व इतर विषयांमध्ये आलेल्या आहेत. परंतु त्या केवळ एखादी यंत्रणा, तिचे कामे, पदाधिकारी निवड, अटी यापुरत्याच मर्यादित राहिलेल्या आहेत. या बाबी सुजान व संवेदनशील नागरिक घडवण्यासाठी पुरेशा नाहीत. नागरिकशास्त्र विषयाची ही मर्यादा लक्षात घेऊन संविधानातील ज्या तरतुदीने देश चालतो, त्या तरतुदींची ओळख सोप्या व रंजक कृतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करून देणे हे या उपक्रमाचे वेगळेपण आहे. तसेच विद्यार्थ्यांना समजेल अशा कृतींवर आधारित अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची निर्मिती हे उपक्रमाचे



वेगळेपण आहे. सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना समान दर्जाचा आशय व घटक परिचय उपलब्ध व्हावा म्हणून व्हिडिओची निर्मिती करून त्याचे QR कोड या पुस्तकात छापलेले दिलेले आहेत. घटक परिचय, घटकावर कृती व मूल्यमापन यासाठी क्रमबद्ध कृतींच्या पायऱ्या दिलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी करायच्या दैनंदिन कृतीसोबतच तालुक्याच्या काही सामायिक कृतींची योजना हे उपक्रमाचे वेगळेपण आहे.

- **नवोपक्रमाची उद्दिष्टे-**

1. दीर्घकाळ टिकेल अशा रचनात्मक कामाने भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करणे.
2. शालेय विद्यार्थ्यांमधून देशाचे जबाबदार व संवेदनशील नागरिक घडवणे.
3. विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करणे.
4. विद्यार्थ्यांच्या मनामध्ये लोकशाही शासन व्यवस्था व विविध प्रशासकीय यंत्रणा याबाबत विश्वास निर्माण करणे.
5. शाळा बालकेंद्री बनवणे व आनंददायी शिक्षण देणे.

- **नवोपक्रमाचे नियोजन**

कृतीपत्रिकेच्या रूपाने सुरुवातः: covid-19 दरम्यान शाळा बंद परंतु शिक्षण सुरू असलेल्या कालावधीत 'इंटिग्रेटेड लर्निंग वर्कशीट' च्या माध्यमातून दरमहा संविधान शिक्षणातील घटकावर आधारित व्हिडिओचा QR कोड व त्यावर आधारित कृतीपत्रिका यातून संविधान शिक्षण दिले.

संविधान शिक्षण अभ्यासक्रम व पाठ्यक्रम निर्मिती: पेडागॉजी व संविधानाची उत्तम जाण असणाऱ्या 13 शिक्षकांच्या अभ्यास गटाद्वारे जवळपास सात महिने भारतीय संविधान व संविधानावर आधारित संदर्भ ग्रंथ, राज्यसभा टीव्ही ची 'संविधान' सिरीज याचा अभ्यास करून संविधान शिक्षणाचा कृतीआधारित अभ्यासक्रम व पाठ्यक्रम निर्माण केला गेला.

शिक्षक प्रशिक्षण: संविधान शिक्षण उपक्रमाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी इयत्ता तिसरी ते सातवीच्या 100% शिक्षकांना संविधान शिक्षण उपक्रमाचे प्रशिक्षण प्रत्येक केंद्राच्या पातळीवर देण्यात आले. तसेच आवश्यक त्या शिक्षकांना अतिरिक्त प्रशिक्षण देण्यात आले.

केंद्र समन्वयकांची नियुक्ती : शिक्षकांना संविधान शिक्षण उपक्रम राबवताना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी प्रत्येक केंद्रातील संविधानाची उत्तम जाण असणाऱ्या एका शिक्षकाची संविधान शिक्षण केंद्र समन्वयक म्हणून नियुक्ती केली. दैनंदिन वर्ग अध्यापन करणारे शिक्षक व तालुका पातळीवरील तज्ञ संविधान शिक्षण अभ्यास गट यामध्ये समन्वय साधण्यासाठी केंद्र समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली.

**शिक्षकांसाठी स्पर्धांचे आयोजन :** संविधानाबाबत शिक्षकांचे विषयज्ञान वाढावे म्हणून प्रत्येक आठवड्याला शिक्षकांना संविधानावर आधारित संदर्भ साहित्य पुरवले गेले. त्याचा शिक्षकांनी अभ्यास केला व त्या घटकावर आठवड्याच्या शेवटी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. यामुळे शिक्षकांचे संविधानाबाबतचे विषय ज्ञान वाढण्यास मदत झाली.

विद्यार्थ्यांनी केलेल्या कृतींचे मूल्यमापन: प्रत्येक घटकावर आधारित कृती विद्यार्थ्यांनी पूर्ण केल्यानंतर त्या कृतींचे मूल्यमापन करण्याची योजना व मूल्यमापनाची तंत्रे संविधान शिक्षण पाठ्यक्रम पुस्तिकेमध्ये दिलेली आहेत. त्यानुसार शिक्षकांनी आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांचे नियमितपणे मूल्यमापन केले.

**पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत मूल्यमापन :** विद्यार्थी व शिक्षकांनी केलेल्या कामाचे पर्यवेक्षीय यंत्रणेमार्फत वेळोवेळी सविस्तर भेटी देऊन मूल्यमापन करण्यात आले.

**इम्पॅक्ट स्टडी:** रचना संस्था पुणे यांच्याद्वारे संविधान शिक्षण उपक्रमाचा इम्पॅक्ट स्टडी करण्यात आला. यामध्ये यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या 10% शाळेतील 25% विद्यार्थ्यांचे लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक प्रतिसाद, दैनंदिन वर्तनाचे निरीक्षण यासोबतच पालक, शिक्षक व पर्यवेक्षिय यंत्रणाचे प्रतिसाद नोंदवण्यात आले. याचे तज्ज्ञांमार्फत विश्लेषण व

पडताळणी करून रचना संस्था पुणे यांनी इम्पॅक्ट स्टडी रिपोर्ट जाहीर केला. त्या रिपोर्टमध्ये संविधान शिक्षण हा उपक्रम सजग व संवेदनशील नागरिक घडवण्यासाठी उपयुक्त असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

- **नवोपक्रमाची कार्यवाही-**

सुरुवातीला संविधान शिक्षण उपक्रम कृतीपत्रिकेच्या माध्यमातून राबविण्यात आला. याला विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. त्यानंतर अधिक सुव्यवस्थितपणे संविधान शिक्षण देण्यासाठी तेरा शिक्षकांच्या अभ्यासगटाद्वारे संविधान शिक्षण अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची निर्मिती करण्यात आली. याचे शिक्षकांना केंद्र पातळीवर प्रशिक्षण देण्यात आले. केंद्रातील संविधान शिक्षण उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी संविधान शिक्षण केंद्र समन्वयक म्हणून एका शिक्षकाची नियुक्ती करण्यात आली. आवश्यक तेव्हा शिक्षक व मुख्याध्यापकांचे प्रतिसाद गुगल फॉर्म च्या माध्यमातून नोंदवण्यात आले. वर्षाच्या अखेरीस उपक्रमाचा बाह्य संस्थेमार्फत इम्पॅक्ट स्टडी करण्यात आला.

- **नवोपक्रमाची यशस्विता-**

1. शाळाबाह्य मुलांना शिक्षणाचा हक्क मिळवून दिला : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कामथडी येथील इयत्ता पाचवीत शिकणारी वैष्णवी मांढरे या विद्यार्थिनीला शिक्षणाचा हक्क नीट कळाला व आपल्याच वयाच्या तीन शालाबाह्य मुलांना त्यांच्या शिक्षणाचा हक्क वैष्णवी ने मिळवून दिला.
2. दैनंदिन जीवनातील प्रश्न संवैधानिक मार्गाने सोडवले: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देगाव येथील शाळेसमोर उघडे गटार वाहत होते. त्यामुळे दुर्गंधी, मच्छर, निसरडी वाट याचा विद्यार्थ्यांना त्रास होत होता. ग्रामपंचायत हा घटक शिकल्यानंतर विद्यार्थ्यांनी गावातील ग्रामपंचायत व गटविकास अधिकारी यांना पत्र लिहून गटार बंदिस्त करण्याची मागणी केली. ग्रामपंचायतने दोन दिवसात शाळेपुढील उघडे गटार बंदिस्त करून दिले.
3. वडील घरकामात मदत करू लागले: जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोलावडे येथे शिकणारी अनुष्का कांबळे ही विद्यार्थिनी संविधान शिक्षणात शिकलेल्या घटकाबाबत आपल्या घरी चर्चा करत असे. स्त्री-पुरुष समानता या घटकावरील या चर्चेतून प्रेरित होऊन तिचे वडील तिच्या आईला घरकामात मदत करू लागले.
4. सरकारी यंत्रणेवरील विश्वास बळकट झाला : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोंडेवाडी येथील आरव सस्ते या विद्यार्थ्याने सरकारी यंत्रणा या घटकातील चर्चेतून प्रेरित होऊन स्वतः आजारी पडल्यानंतर मला सरकारी दवाखान्यातच घेऊन चला असा आई-वडिलांकडे आग्रह धरला व स्वतःचे उपचार सरकारी दवाखान्यातच करून घेतले.
5. वस्तीच्या रस्त्याचा प्रश्न सोडवला : समतेचा हक्क हा घटक शिकत असताना एका शाळेतील विद्यार्थ्यांनी आपल्याच गावातील एका वस्तीमध्ये सिमेंटचा रस्ता नाही, त्यामुळे तेथून येणाऱ्या विद्यार्थ्यांना पावसाळ्यात त्रास होतो ही बाब ग्रामपंचायतच्या लक्षात आणून दिली व त्या वस्तीमध्ये पक्का रस्ता बांधण्याची मागणी केली. यातून निधीची तरतूद नसताना ग्रामपंचायतीने संबंधित वस्तीत पक्का रस्ता बांधून दिला.

**विविध वर्तमानपत्रे व वृत्तवाहिन्यांनी उपक्रमास दिलेली प्रसिद्धी**

**1) Times of india :**

https://timesofindia.indiatimes.com/city/pune/lessons-on-constitution-for-bhor-zp-school- pupils/amp articleshow/90831742.cms

https://timesofindia.indiatimes.com/city/pune/lessons-in-democracy-for-primary-students- in-bhor-taluka-schools/amp articleshow/96825390.cms

**2) समग्र शिक्षा महाराष्ट्र, मुंबई:**

https://youtube.com/watch?v=60kAe3KaFG8&feature=shared

https://youtu.be/y_NnSz4Qq7k?si=teyk2jPJ9VXLOMrY

**3) दैनिक सकाळ:**


https://www.esakal.com/pune/todays-latest-marathi-news-pne24h71115-txt-pune-today-20240104125104

**4) E tv Bharat:**

https://www.etvbharat.com/marathi/maharashtra/state/pune/school-cabinet-election-implemented-in-bhor-taluka/mh20230121090242497497887

5) प्रभात लोकमत, इ. अनेक स्थानिक वृत्तपत्रांनी वेळोवेळी विविध उपक्रमांचे वार्तांकन केले.

**उपक्रमाचे काही छायाचित्रे:**










**सादरकर्ती - अश्विनी सोनवणे - केळकर**
हुद्दा- गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, भोर

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन 2023 -24 आयोजित करण्यात आली. प्रस्तुत स्पर्धेमध्ये राज्यातील उपक्रमशील शिक्षक व अधिकारी सहभागी झाले. जिल्हा स्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांमार्फत नवोपक्रम स्पर्धांचे आयोजन झाले. पुणे जिल्ह्यातील जे नवोपक्रम जिल्हास्तर स्पर्धेत पारितोषिक प्राप्त ठरले, अशा नवोपक्रमांचा सारांश प्रस्तुत पुस्तिकेत दिलेला आहे. शिक्षण क्षेत्रातील शिक्षक ते अधिकारी यांना प्रस्तुत पुस्तिका नवकल्पना, नवप्रेरणा प्राप्त होण्यासाठी उर्जा देईल असा विश्वास आहे.

**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पुणे**

